

२ मे १९७०

चाळीस पैसे

शुभास्ते पंथानः .... निरोप

२ मे १९७०

समग्र साप्ताहिक
# माणूस

वर्ष नववे : अंक अठ्ठेचाळीसावा

संपादक : **श्री. ग. माजगावकर**

सहाय्यक : दिलीप माजगावकर । सौ. निर्मला पुरंदरे

१०२५ सदाशिव, पुणे ३०  दूरध्वनी : ५७३५९

किंमत : ४० पैसे  वार्षिक वर्गणी : वीस रुपये  परदेशची वर्गणी : चाळीस रुपये

मी माणूसचा एक नियमित वाचक आहे. दोन मार्चच्या मुंबई बंद बद्दल आपली मते निर्भीडपणे मांडली याबद्दल माणूसचे अभिनंदन.

११ एप्रिलच्या अंकात महानगरी मुंबईचे वर्णन वार्ताहराने स्पष्टपणे उभे केले आहे. आज खरोखर मुंबईत चालताना डोळ्याला झापड लावून चालावयाला पाहिजे. आज मुंबईतल्या काही वर्तमानपत्रवाल्यांना कलकत्ता जळताना दिसतो. पण मुंबईतल्या सत्य परिस्थितीबद्दल व वाढत्या गुंडगिरीबद्दल लिहावेसे वाटत नाही.

श्री. दाभोळकरांची आधुनिक विज्ञानेश्वरी बरेच दिवसात दिसली नाही. क्रीडाक्षेत्राचा अंकात अभाव दिसतो. विजय तेंडुलकरांची रातराणी बहरते आहे.

**एप्रिल, १२, ७०**  **अनिल वाकणकर**, शीव, मुं. २२

नेहमीप्रमाणे 'माणूस'चा अंक वाचला. त्यामधील सय्यद अकबर लिखित 'पापण्यांची फुलें' ही कथा हृदयद्रावक वाटली.

अधूनमधून एखादी कविता टाकल्यास अंकाची शोभा वाढेल यांत शंकाच नाही.

**एप्रिल, १७, ७०**  **दिनकर खोगरे, ठाणे**

प्रकाशित लेख, चित्र इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मताशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.



# निरोप

शनिवार ता. १८ एप्रिल—वेळ रात्री ९ वाजता—सरदार मळेकरांच्या दुचौकी वाड्यातील प्रशस्त दिवाणखाना निमंत्रित स्त्री-पुरुषांनी भरून गेला होता. गुलाबपाणी, अत्तराचा सुगंध दरवळला होता. उदबत्त्यांचा घमघमाट सुटला होता. तंबोऱ्याच्या तारा जुळवल्या जात होत्या. सौ. निर्मला पुरंदरे वर्षभरासाठी फ्रान्सला जाणार या निमित्ताने त्यांना निरोप देण्यासाठी कौटुंबिक घरगुती कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. माणूस परिवारातील सारी मित्रमंडळी एकत्र जमली होती. प्रभाकर कारेकरांच्या सुश्राव्य गायनाचा कार्यक्रम आखला होता. त्यांच्या संगीताची मैफल लौकरच सुरू होणार होती. सूर थबकले होते. आधी शब्द नंतर सूर. माजगावकर निरोपाचे चार शब्द बोलायला माईक पुढे उभे राहिले. त्यांचा कंठ दाटून आला होता (की माइकमध्ये बिघाड होता?) की मला हा भास होत होता? एखाद्या स्वप्नासारखं हे सारं भासत होतं.

शब्दांचा कमीत कमी वापर करून माजगावकरांनी त्यांच्या भगिनीला प्रेमाचा निरोप दिला. शब्दामागील भावना उत्कट होत्या. गेल्या दहा वर्षातील अनेक प्रसंग त्यांच्या डोळ्यासमोर उभे राहिले असावेत. 'माणूस'च्या गेल्या दहा वर्षांच्या कालखंडातील अनेक सुखदुःखाच्या प्रसंगी त्यांच्या भगिनीने त्यांना साथ दिली होती. आता तिची अनुपस्थिती त्यांना जाणवणार होती. कागदोपत्री जरी हा समारंभ औपचारिक वाटला, की माणूसचे संपादक सहसंपादकाला निरोप देत आहेत—तरी तिथं जमलेल्या मित्रमंडळींना घरगुती—घरातलाच एक सोहळा चालला आहे असं वाटत होतं. आपल्या भगिनी व पूर्वाश्रमीच्या कु. कुमुद माजगावकर लग्न होऊन सासरी जायला निघाल्या आहेत आणि माजगावकर तिची पाठवणी करीत आहेत असंच ते दृश्य दिसत होतं. सरदार मळेकरांच्या प्रशस्त दिवाणखान्यात जमलेला माणूस परिवार हा सोहळा कौतुकाने पहात होता.

या 'माणूस परिवारात' मी १९६२ साली प्रथम दाखल झालो आणि तेव्हा-

पासून या मडळीचा आणि माझा स्नेह दिवसेनुदिवस वाढतच आहे. त्यावेळी माणूसचा जन्म होऊन दोन वर्षंच झाली होती. माझे परमप्रिय मित्र श्री. दादासाहेब उर्फ वि. ग. कानिटकर यानी माझ बोट धरून एक दिवस मला माणूस कार्यालयात आणून सोडल. त्याला आता आठ वर्षं झाली. त्यावेळी ते माणूसच्या सपादनाचं बरचस काम पहात असत. माणूसची कचेरी त्यावेळी ४१९ नारायण इथ होती. जिना चढून आम्ही वर गेलो. डाव्या हाताला एका छोटयाशा टेबलापाशी बसून एक बाई काम करीत-बसल्या होत्या 'या–या' म्हणून आमच स्वागत झाल. गप्पा सुरू झाल्या. याच त्या निर्मला पुरदरे. त्यानतर मी अनेक वेळा माणूस कार्यालयात गेलो. प्रत्येक वेळी या बाई टेबलाशी बसून काहीतरी काम करताना दिसत. काम करताना गाणं गुणगुणायची या बाईंना मोठी वाईट खोड आहे. आवाज गोड आहे. ते गुणगुणणं पण ऐकावस वाटत, पण म्हणून काय झाल ? अहो काम करताना कुणी गाणं म्हणतात का ? आता या बाई फ्रान्सला गेल्या की असच करणार की काय ? फ्रेंच लोकाना आपल्याकडील सगीतातल काही आवडत असल तर हातातलं काम ठेऊन याचं गाणच ऐकत बसायचे ! त्यावेळी माझा असा समज झाला होता की टेबलाशी बसून काम करायचं आणि गाणं गुणगुणायचं एवढ्या दोनच गोष्टी या बाईंना येत असाव्यात. याना स्वयपाक तरी करता येतो की नाही कुणास ठाऊक ? एकदा मी त्याना सहज म्हटलं, " एकदा तुम्ही स्वयपाक करीत असताना मला बघायचं आहे." पुढे तो प्रसग लौकरच आला. एक दिवस माजगावकरांनी घरी जेवायला बोलावल होतं, तेव्हा निर्मलाबाई स्वयपाकघरात आईला मदत करत होत्या. त्या म्हणाल्या,

" अहो मराठे, मी स्वयपाक करते आहे. तुमची खात्री नसली तर आत येऊन पहा "

माझा विश्वास बसेना. मी आतल्या खोलीत जाऊन बघून आलो. निर्मलाबाई खरोखरच स्वयपाक करीत होत्या. या बाईंना स्वयपाक करणं जितक सहज जमतं तितक्याच सहजतेने त्या आता फ्रान्सला निघाल्या आहेत.

कुठलीही अवघड गोष्ट सोपी करण्याची कला बाईंना साधली आहे. याबाबतीत त्यांना मी गुरुस्थानी मानतो. कुठलही सकट आल तरी न डगमगता ह्या शातपणे सारे व्यवहार करीत असतात. चिकाटी आणि दृढनिश्चय हे गुण याच्याजवळ असतील असं वरवर बघणाराला मुळीसुद्धा वाटणार नाही. विद्यार्थी सहाय्यक समितीच्या अनेक योजना, त्यासाठी करावे लागणारे कष्ट, इमारत निधीसाठी पैसे जमविणे, गरीब हुशार विद्यार्थ्यांची सोय करणे-सारी कामे सारखी चालू असतात, पण त्रासलेला चेहरा आणि कपाळावर आठ्या कधी दिसल्या नाहीत. चेहरा नेहमी हसरा, प्रसन्न, टवटवीत. काम करायचं पण वडबड करायची नाही. गेल्या दोन तीन वर्षापासून फ्रेंच मित्रमैत्रिणी पुण्यात येऊ लागल्या, त्याची कुणाच्या

तरी कुटुंबात राहण्याची सोय करायची. भारतीय सस्कृती, कुटुंब व्यवस्था, आचार-विचार या साऱ्या गोष्टीच परदेशी लोकांना जवळन दर्शन घडावं, त्यांच्या मनात भारतीयांबद्दल असलेले गैरसमज दूर करण्याची या बाईंची विलक्षण धडपड. पुन्हा आरडा ओरडा नाही, सार कसं शात ! हा हा म्हणता या बाईंना फ्रान्सहून ' पालखी ' आली, ' बाई चला लौकर. आम्ही तुमची वाट पहात आहोत.'

गेल्या दहा वर्षात ' माणूस ' जसजसा मोठा होत गेला तसतशा निर्मलाबाई पण मोठ्या झाल्या. माणूसच काम संभाळून विद्यार्थी-सहाय्यक समितीचं त्यांचं कार्यक्षेत्र त्यांनी हळूहळू वाढवलं. माणूसच्या जन्मापासून त्याचे रूप आणि स्वरूप अधिकाधिक चांगलं झालं. घराघरात माणूसचा प्रवेश झाला. लोक तो आवडीनं वाचू लागले. त्याकरिता या बहीण-भावडानी खूप कष्ट घेतले. माणूसच्या यशाची ही वाटचाल, मासिकातून पाक्षिकात, आता साप्ताहिकात त्याचे रूपातर. ह्या साऱ्या प्रवासात अडचणीना तोड द्यावे लागले. बहिणीची साथ नसती तर माजगावकराचा हा प्रवास अधिक कष्टाचा, काटेरी, तापदायक झाला असता.

प्रवासावरून आठवण झाली. प्रवासाची निर्मलाबाईंना भारी हौस. प्रवास म्हटला म्हणजे यांच्या उत्साहाला उधाण येते. दोन वर्षापूर्वी आम्ही सर्व मडळी दक्षिणेच्या प्रवासास गेलो होतो. मद्रास, त्रिचनापल्ली, मदुरा, कन्याकुमारी, त्रिवेंद्रम सारा प्रवास घाईघाईचा. साऱ्या गोष्टी पहायची हौस, आम्ही सारे दमलो पण निर्मलाबाईंचा उत्साह शेवटपर्यंत कायम होता. त्याच उत्साहात त्या आता फ्रान्सला जायला निघाल्या आहेत. आपल्या सर्वांना, विशेषतः बाबासाहेबांना त्यानी हे दाखवून दिले आहे, की किल्ले रायगड, किल्ले प्रतापगड, किल्ले पुरंधर, या किल्ल्यावर जाण्यापेक्षाही ' एफिल टॉवर 'वर जाण अधिक सोपं आहे.

सरदार मळेकराच्या वाड्यातील दिवाणखान्यात झालेली प्रभाकर कारेकराच्या संगीताची मैफल अतिशय रंगली. शब्द आणि सूर याचा सुंदर मिलाफ झाला. निरोपाच्या शब्दावर सुराचा साज चढला. ह्या जिव्हाळ्याच्या कौटुंबिक समारभाचा सुगंध सदैव मनात राहील. फ्रान्समधील वर्षभराच्या वास्तव्यात निर्मलाबाईंच्या मनात हा सुगंध दरवळत राहील यात शका नाही. त्या निरनिराळ्या कुटुबात वर्षभर रहाणार आहेत. त्या देशाच्या चालीरीती, तिथली रहाणी, त्याचे विचार या साऱ्या गोष्टीचा निर्मलाबाई अभ्यास करणार आहेत. या देशाची उज्ज्वल परपरा त्यांच्या पाठीशी उभी आहे. शिवशाहीर बाबासाहेब पुरदऱ्याची पत्नी, माणूसच्या सहसंपादिका, विद्यार्थी सहाय्यक समितीच्या एक प्रमुख कार्यकर्त्या ही सारी नाती बरोबर घेऊन त्या फ्रान्सला जात आहेत. माणूस परिवारातील साऱ्या कौटुबिक मित्र–मैत्रिणीच्या शुभेच्छा त्यांच्याजवळ आहेतच. त्यांचा प्रवास, त्याचं फ्रान्समधील वास्तव्य सुखाचे होवो अशी मी परमेश्वराजवळ प्रार्थना करून म्हणतो, शुभास्ते पथानः ।

– रंगा मराठे

रातराणी । रातराणी

विजय तेंडुलकर



# स्नेहसदन

सामाजिक कार्य करणाऱ्या आपल्या सस्थांचे अहवाल आणि नियतकालिके तुम्ही पाहिली असतील. नक्कीच आयुष्याला नाही– तरी समाजाला विटलेली माणसे यांचे सपादन आणि लेखन करीत असावीत, असे वाटण्यासारखे यांचे स्वरूप रुक्ष, साचेबद आणि कटाळवाणे असते. जिवत माणसाशी या अहवालाचा आणि या अहवालाना कारणीभूत असलेल्या सामाजिक कार्याचा काही सबध असेल असे चुकूनदेखील न भासावे अशीच जणू सख्त काळजी अहवाल-संपादकानी आणि लेखकांनी घेतलेली असते. हे अहवाल कोणाच्याही आयुष्याचे आणि त्यातल्या खऱ्याखुऱ्या समस्यांचे नसतातच; हे केवळ आकड्याचे अहवाल असतात. यांना पदाधिकारी असतात किंवा पदसिद्ध सभासद असतात, माणुसकीने भारलेली हाडामासाची चार माणसे यात आढळणार नाहीत. यातल्या छायाचित्रातूनसुद्धा हसणारी, जगणारी, विविध सवेदना वागविणारी माणसे सापडत नाहीत, पुतळे सापडतात– पेंढा भरलेले नाहीतर लाब दगडी मुद्राचे. याच्या डोळ्यात एक भले थोरले शून्य नाहीतर त्याच किंमतीचा अहकारी दर्प असतो. आणि आपण सामाजिक कार्य करतो वा अशा कार्याला निमित्तमात्र वा साहाय्यभूत ठरतो म्हणजे जगावर उपकारच करतो अशा आविर्भावात ते अहवालातून जगाकडे बघत असतात. बहुधा, रिकाम्या वेळी दुसरे काहीच नाही अशा अडचणीत आपण हे अहवाल जाभया दाबीत उचलून चाळतो किंवा कळत न कळत कधी याच्या कागदातून भेळ नाहीतर चणे खातो.

हे असे का, या अहवालाचे आणि सामाजिक कार्याशी निगडित नियतकालिकांचे संपादन आणि लेखन जरा आकर्षक स्वरूपात, खुबीदारपणे करावे जेणेकरून ते वाचले जाईल, असे एकाही सामाजिक सस्थेला का वाटू नये, याचे उत्तर सापडत नाही. खुद्द सामाजिक कार्यात देखील आपल्या सस्था आणि कार्यकर्ते असेच रुक्षपणे आणि वातड कर्तव्यबुद्धीने वावरताना दिसले म्हणजे मात्र असल्या कार्याचे अहवाल

आणखी कसे असणार असे वाटू लागते आणि मनोमन म्हणून होते, परमेश्वरा, आमच्या अनाथअपगांना या सामाजिक कार्यकर्त्या यत्र-मानवापासून वाचव !

याला सर्वस्वी अपवाद असे काहीतरी एकदा, दोनदा, दहादा हाती लागले म्हणजेच हे सारे प्रकर्षाने मनात येते, हे तर उघडच आहे. गेले काही दिवस माझ्याकडे टपालाने एका सामाजिक सस्थेचा नियतकालिक अहवाल येतो. तो ठरल्या दिवशी न आला तर तो का आला नाही असे विचारावेसे वाटते. अजाणता मी त्याची प्रतीक्षाच करीत असतो. तो रोजच्या टपालात दिसला की वेगळा काढतो आणि अथपासून इतीपर्यंत वाचून घेतो. नुसताच वाचून घेत नाही तर पाहून घेतो, कारण तो सचित्र असतो. चित्रे मेल्या नजरांच्या आणि दगडी लाब मुद्रांच्या छायाकृतीची नव्हेत, खऱ्याखुऱ्या माणसांची गमतीशीर. माझ्याशी बोलणारी. कोणा तरी गुणी कुंचल्याच्या सजीव रेषांनी साकार झालेली. पुनः पुन्हा पहावीत, इतकी गोड.

चित्रेच काय, हा एकूण चार पानांचा मासिक अहवालच अथपासून इतीपर्यंत आकर्षक आणि वाचनीय असतो; इतका आकर्षक आणि इतका वाचनीय की हा एका अनाथालयाचा आहे हे क्षणभर खरेच वाटू नये.

हे अनाथालय मुंबई महानगराच्या परिसरात अंधेरीला आहे असे अहवाल सांगतो. नाव स्नेहसदन. मुंबई महानगराच्या रस्तोरस्ती दिशाहीन भटकणाऱ्या सर्व जातीच्या, धर्मांच्या, पोरक्या, निराश्रित, निरुद्योगी, आजारीपाजारी, गरजू आणि गुन्हेगारदेखील मुलांसाठी हे अनाथालय आहे, असे या अहवालात नमूद असते. याचे एकूण पाच आश्रम वेगवेगळ्या जागी आहेत; प्रत्येक आश्रमात सुमारे वीस मुलाचे एक 'कुटुंब' असते, असे अहवालात म्हटलेले असते. इथे या मुलाना निवारा, अन्न, वस्त्र दिले जाते. या बरोबरच पूर्ण स्वातंत्र्य आणि आपले कुणी तरी आहे ही भावना इथे या मुलाना दिली जाते. याने या भरकटू पहाणाऱ्या आयुष्यांना एक प्रकारचा तोल यावा असा चालकाचा प्रयत्न असतो. अशा या सस्थेच्या या अहवालावर पहिल्याच पानावर अनाथ मुलाचे म्हणून जे चेहरे दिसतात ते अकालवृद्ध, रागीट, तुसडे, गंभीर, केविलवाणे नव्हते तर वाढल्या विस्कटल्या झिप्र्यांचे, खोडकर; गुंड,टारगट आणि मोठ्या मोठ्या लोभस डोळ्याचे. तोंडावर शाईबिईचे एक दोन डागबीग पाडून हसणारे. अनाथ झाली म्हणून पोरानी काय मरतमढे, लाचार आणि प्रौढ दिसावे ? स्नेहसदनच्या चित्रकाराच्या कुंचल्याने साकार केलेली अनाथ मुले अंगाला न बसणाऱ्या कपड्यातली, कधी एकाद्या शर्टाऐवजी नुसत्याच सैल गंजीमधली, अनवाणी, आणि बेंबीखाली गळू पहाणारी, चड्डी एका हाताने सावरीत बोट चोखीत जगाकडे आशेने, अपेक्षेने, सस्मित पहाणारी, विलक्षण जिवत पोरटी असतात. असे वाटते की जरा दुर्लक्ष्य झाले तर अगावर झुरळ सोडतील नाहीतर मागून एकदम मानेला लटकतील ! त्यांच्या उदरांसारख्या मुद्रावर बालिश इब्लिसपणा असला तरी डोळ्यात अनेकदा एक शहाणी चमक असते. त्याच्या पद्धतीचा

महाराष्ट्र शासन पुरस्कार

लाभलेले

आमचे एक

गौरवास्पद प्रकाशन

# व्होल्गा जेव्हा लाल होते

वि. स. वाळिंबे

अठरा रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे ३०

काही हिशेब आणि विचार असतो. कधी त्याच्या हातापायावर गमपलासच्या पट्ट्या— गुंडगिरीची ताजी खूण—असतात तर कधी नुसतेच एकाद्या विनधोक उद्योग-उपद्व्यापाचे रगीन डाग असतात. प्रथम ही मुले वाटतात आणि मग अनाथ वाटतात. आधी आपल्या काळजाला हात घालतात, मग मदतीची अपेक्षा करतात. यांच्यासाठी काही करणे हा केवळ दानधर्म नव्हे, त्यात एक चागला आनद आहे; ही मुले मदतीची याचना करीत नाही आहेत तर अशी मदत मिळणे हा त्यांचा हक्क आहे, हे सारे या चित्रातूनच उमजून जाते. मुलाची अनाथ, निःसत्व पलटण मिरवणारी ही आणखी एक धर्मादाय सस्था नाही हे काही, वेगळे आहे, हे अशा प्रकारे प्रथमदर्शनीच मनात भरवणारी या नियतकालिक अहवालाची ही अशी सजावट असते.

पहिल्याच दर्शनी पृष्ठावर मोठा घवघवीत हारत्रीर काढलेली रगीत पाटी तुम्हाला दिसेल : एस. दलाचंद याची स्नेहसदनास भेट. तुम्ही म्हणाल, वा वा, कोण हे दलाचद ? कोणी दानशूर शेठिये नाहीतर सरकारी धेंड असणार. मोठ्या पोटाचे, तुस्त. तुम्ही वाचू लागाल, परवाच एस. दलाचद यानी स्नेहसदनास भेट दिली. आम्ही त्याना आश्रम दाखविला व आमच्या मोठ्या कुटुंबातील सर्वांची ओळख करून दिली. आश्रमाची कामकाजाची पद्धती त्यास समजावून सागितली. दलाचदजी फारच खूष झालेले दिसले. इतके की आपली खुषी व्यक्त करण्यास त्यास शब्द सापडेनात. वाचकहो, हे भारदस्त नाव कोठे बरे ऐकले, असे तुम्ही एव्हाना म्हणत असाल. शेअरबाजारात ? आयात—निर्यात धद्यात ? की व्यापारात ?— तुमची खात्रीच आहे की हे गृहस्थ कोणी धनत्तर असामीच असले पाहिजेत. तुम्हाला असे वाटू लागले असेल की दलाचदजीच्या कृपेने या स्नेहसदनाचे सर्व आर्थिक प्रश्न आता लौकरच सुटणार ? परतु सबूर. आमचे दलाचदजी आहेत फक्त सात वर्षे वयाचे. त्याच्या गाठी एक नया पैसा देखील नाही. त्याना आई नाही. त्याचे वडील दुधनाथ रेल्वेत सिग्नल-मन होते. घरातल्या मोठ्या भावालाच शाळेत जाता येत होते आणि क्रमाक दोनच्या दलाचदला दोन छोट्या बहिणी साभाळण्यासाठी घरी रहावे लागे. (या बहिणीची नावे त्याला सागता येत नाहीत.) मध्यप्रदेशातल्या विलासपूर गावी छोटा दलाचद असा वाढत होता. मनात शाळेत जावे, शिकावे ही खूप इच्छा होती पण घरी भाडी घासावी लागत. काम नीट झाले नाही की इतका मार बसे की त्या माराच्या भयाने दलाचद बिचारा सारी कामे किती थकला, किती चिडला तरी विनतक्रार, मान मोडून करी.

यापुढे अहवाल, हा छोटा दलाचद घरातून एक दिवशी कसा पळाला, गावोगाव विनातिकिट निरुद्देश कसा भटकला, बोरीबदरला कसा येऊन पोचला, तिथे कसा भीक मागत होता, तिथे त्याला प्रथम प्रथम दिवसात एकादा रुपया कशी कमाई

[ पृष्ठ ६० वर ]

# बहात्तरचे वारे

१९७२ साल जवळ येऊ लागले आहे आणि पुढच्या सार्वत्रिक निवडणुकांच्या घंटा आतापासूनच वाजू लागल्या आहेत. निवडणुकीला अवघे २२ महिने उरले आहेत. आणि येती सार्वत्रिक निवडणूक अर्थातच मोठ्या चुरशीची होणार यात शंका नाही तशीच ती महत्त्वाचीही ठरणार आहे ७२ नतर देशाचे राजकीय नकाशे कशा प्रकारे बदलणार हे सागता येत नाही. पण सर्वच राजकीय पक्ष आतापासूनच ७२ च्या तयारीला लागले आहेत. सभामध्ये, परिसवादांमध्ये, संभाषणामध्ये, विधान सभा-परिषदांमध्ये नको तेवढा वेळ ७२ चा उल्लेख होतो. राजकीय पक्ष मिशीला पीळ भरीत एकमेकांना म्हणतात "बघून घेऊ. बहात्तरमध्ये बघून घेऊ," तर पुढारी लोक आपापल्या अनुयायाना सागतात, "चला, बहात्तरच्या तयारीला लागलं पाहिजे बर का." तर विचारवत लोक एकमेकाना चिंताग्रस्त मुद्रेने विचारतात, "बहात्तरच्या पोटात काय दडलं आहे कुणास ठाऊक." पैसा कमविण्यात तरबेज असलेले ठिकठिकाणचे हरहुन्नरी लोक तयारीने बसले आहेत आणि अधीरतेने बहात्तरची वाट पाहताहेत सार्वत्रिक निवडणुका ही त्यांना पर्वणी असते. उमेदवाराना जाहीरनामे लिहून देणं, त्यांची भाषण लिहून देणं, त्यांची पत्रकं काढण, त्यांची पब्लिसिटी करणं, त्यांचे फोटो छापवून आणणं वगैरे वगैरे त्याचे धंदे. दोन-तीन महिन्यात अशा लोकांना चिकार पैसे मिळतात. त्याचीही सभाव्य उमेदवारांवर मोर्चेबदी आतापासूनच सुरू झाली आहे. एकूण काय तर बहात्तरच्या निवडणुकीचे सावट सर्वत्र पसरले आहे. बहात्तरमध्ये फार मोठ काही तरी घडणार अशी हवा आहे आता जे काही आहे ते तात्पुरतं, चालवून घेण्यापुरतं; आणि बहात्तरमध्ये जे काही येईल ते यापेक्षा मोठे, अधिक महत्त्वाचं अशी एक संदिग्ध भावना राजकीय क्षेत्रात पसरली आहे, आणि सारेच लोक मोठ्या अपेक्षेने बहात्तरकडे बघत आहेत. मागच्या तिन्ही सार्वत्रिक निवडणुकांपूर्वी एवढी हवा निर्माण झाली नव्हती. परतु ६७ मधील काँग्रेसचा मोठ्या प्रमाणावरील पराभव, काही राज्यातील विरोधी दलाची सरकारे, त्याच अस्थैर्य, काँग्रेसमधील न सांधली जाणारी फूट, केद्र सरकारच लोकसभेतील अल्पमत आणि सर्वच विरोधी पक्षांची

आक्रमक धोरणं यामुळे येत्या सार्वत्रिक निवडणुकीला वेगळेच महत्व प्राप्त झाले आहे.

महाराष्ट्रापुरत बोलायच झाल तर बहात्तरमध्ये महाराष्ट्र काँग्रेस काय आकार घेते आणि शिवसेना काय करते त्याकडेच बऱ्याच जणाच लक्ष लागून राहिलं आहे. आजपर्यंत तरी कोणत्याही विरोधी पक्षाला महाराष्ट्रव्यापक स्थान नाही. काही गावं, काही तालुके आणि एखादा जिल्हा असे विरोधी पक्षाचे कुठे तुरळक चालेकिल्ले आहेत. नाही असे नाही. पण महाराष्ट्रव्यापक पक्ष म्हटला म्हणजे काँग्रेसच.

महाराष्ट्र काँग्रेसचं बहात्तरमध्ये काय होणार? एक गोष्ट स्पष्ट आहे की समाजवादाचे ढोल बडविणाऱ्या महाराष्ट्र काँग्रेसचं हृदय हे काही खास समाजवादी नाही. काही तुरळक नेते सोडता महाराष्ट्र काँग्रेसची प्रकृती ही खरी सिंडीकेटची. (अर्थात इंडिकेट म्हणजे समाजवादी आणि सिंडीकेट समाजवादविरोधक अस समीकरण नाही.) महाराष्ट्र सरकारचे बरेचसे मंत्री हृदयाने सिंडीकेटकडे आणि परिस्थितीने इंडिकेटकडे अशा त्रिशकू अवस्थेत आहेत काँग्रेस संघटनेकडे बारकाईने निरखून पाहिल तर बडे जमीनवाले आणि सहकारी कारखानदार यांचे प्राबल्य त्यात दिसेल म्हणून शेतीवर कर लादण्याच्या कोणत्याही सूचनेला याचा कडाडून विरोध. नियोजन मंडळाचे उपाध्यक्ष धनंजयराव गाडगीळ यानी शेतकी करासंबधीच्या काही सूचना मांडल्या होत्या. त्या सूचनाना सर्वांत निकराचा विरोध महाराष्ट्राने केला. अगदी आवेशाने. परवा महाराष्ट्राचे अर्थमंत्री श्री. शेषराव वानखेडे यानीच विधानसभेत अर्थसंकल्पावरील चर्चेला उत्तर देताना सांगितल त्यानी धनंजयराव गाडगीळाच नाव घेतल नाही. पण ते म्हणाले, "महाराष्ट्रातून एखादा माणूस दिल्लीत गेला म्हणजे त्याना काय वाटते कुणास ठाऊक. ते महाराष्ट्राच्याच टाळूवरून हात फिरवायला बघतात विशेषत. नियोजन-मंडळावर गेलेले ! !" अशा कोपरखळ्या मारल्यावर नियोजनमंडळात सुचवलेला शेतीकर महाराष्ट्राच्या हिताचा कसा नाही हे पटवून देण्याचा त्यानी प्रयत्न केला. महाराष्ट्राचे सध्याचे बहुतेक मंत्री बडे जमीनवाले आहेत. पूर्वीचे जमीदार. आणि जमीन धारणा कमाल मर्यादा कायदा आल्यावर कुटुंबातील प्रत्येकाला कमाल मर्यादेपर्यंतची जमीन वाटून दिलेली. कोणत्याही तऱ्हेचा शेतकीकर आला तर पहिला बोजा श्रीमंत शेतकऱ्यांवर पडणार हे उघड आहे. मग त्यानी शेतकीकराच्या कोणत्याही सुचनेला विरोध करणे हे स्वाभाविक ओघाने आलेच.

श्री. वानखेडे हे जरा कोपरखळ्या मारण्यात पटाईत आहेत. विशेषत केंद्र सरकारला. त्यामुळे उद्योगपती, कारखानदार, व्यापारी यांच्या मोठ्या सभांना त्याना नेहमी बोलावले जाते. आणि अशा सभा आपल्या स्पष्टवक्तेपणामुळे ते सहज जिंकतात. परवा एका ठिकाणी अशाच एका सभेत त्यांनी केंद्र सरकारला

कोपरखळ्या मारणारे आणि सडकन टीका करणारे असे काही जोरदार भाषण केले की तिथे हजर असलेले लोकसभेचे खासदार स्वतंत्र पक्षाचे वीरेन शाह आणि इंडिकेट कॉंग्रेसचे कमलनयन बजाज यानी पुन्हा पुन्हा वानखेड्यांचे अभिनदन केले. वीरेन शाह तर त्यांना म्हणाले, 'तुम्ही आमच्या पक्षाची बाजू लोकसभेत चागली माडू शकाल.' बजाज म्हणाले, 'मी सुद्धा एवढे बोलू शकलो नसतो.'

असो. तर वानखेडे हे स्पष्ट बोलतात. इतर मत्री स्पष्ट बोलत नाहीत. एवढच. पण बहात्तर साली एक वेळ अशी येईल की त्याना स्पष्ट बोलव लागेल. कारण बहात्तर साल इज अ मूमेंट ऑफ ट्रुथ केव्हातरी महाराष्ट्र कॉंग्रेसला समाजवादाचा बुरखा सोडून बाहेर यावेच लागेल. बहात्तर सालाची त्याचे नेते वाट पाहताहेत की अगोदरच काही करताहेत हे पुढे घडणाऱ्या घटनावर अवलंबून राहील समाजवादाचा हा व्यापक आणि पोकळ विषय सोडला तरीही महाराष्ट्र कॉंग्रेसमध्ये इतर काही बाबतीत तीव्र मतभेद आहेतच. तात्कालिक मतभेद आहेत सीमाप्रश्नावर कोणती भूमिका घ्यायची याबाबतीत महाराष्ट्र कॉंग्रेसचे अध्यक्ष श्री. वसतदादा पाटील याच म्हणण आहे निकराचा पवित्रा घेतल्याशिवाय हा प्रश्न सुटणार नाही. तर मुख्यमत्री वसतराव नाईक म्हणताहेत "जरा सबूर–सबूर. इदिरा सरकार धोक्यात येईल अस काही करायच नाही" श्री नाईक आणि श्री पाटील याची मत याबाबतीत इतकी भिन्न आहेत की त्या दोघानी एकाच वेळी या विषयावर अगदी परस्परविरोधी विधाने बातमीदाराना दिली.

महाराष्ट्र विधान परिषदेच्या द्विवार्षिक निवडणुका येत्या अठ्ठावीस एप्रिलला आहेत. अकरा जागासाठी विधानसभेतून लढत होईल. सत्ताधारी कॉंग्रेस आठ जागा लढवणार आहे. तर राज्यसभेच्या निवडणुकीत वैशपायनाना पाडण्याचा पराक्रम गाजविलेले जुन्या कॉंग्रेसचे विधानसभेतील नेते ओठ गच्च मिटून बसले आहेत. यावेळी सत्ताधारी कॉंग्रेसमधून किती मत फुटतील हे सागण्याची अद्याप त्याची तयारी नाही. पण सत्ताधारी कॉंग्रेस मात्र जोरात तयारी करीत आहे. राज्यसभेच्या निवडणुकीत जी सभाव्य मते फुटली त्यांना गाठून, "बाबारे, काय तुझी अडचण आहे, तुझ्या विभागाचे कोणते प्रश्न आहेत ते उघड साग. पण ऐनवेळी व्होटिंगमध्ये दगा देऊ नकोस" अशी चाचपणी चालू आहे पण आत्मविश्वास नाही आता विधान परिषदेची पुढची द्वैवार्षिक निवडणूक एकदम बहात्तर नंतर. तेव्हा काय परिस्थिती असेल कोणी सागावे ?

बुलढाण्याच्या लोकसभेच्या पोटनिवडणुकीचा प्रचारही जोरात सुरू आहे. सत्ताधारी कॉंग्रेसचं प्रचाराच मुख्य सूत्र हे की, ही पोटनिवडणूक १९७२ च्या सार्वत्रिक निवडणुकीची नादी ठरेल तेव्हा निकराचे प्रयत्न करून ती जागा जिकलीच पाहिजे. महाराष्ट्र कॉंग्रेसमधले अतर्गत मतभेद मात्र विधान परिषदेच्या निवडणुकीच्या वेळी थोडयाफार प्रमाणावर उघडकीला येतील असे बोलले जाते.

महाराष्ट्र कॉंग्रेसला असे संशय-पिशाच्चाने ग्रासल्यामुळे विधानमंडळ कॉंग्रेस-पक्षाच्या, पार्लमेंटरी बोर्डाच्या आणि एक्झिक्युटिव्हच्या बैठका आजकाल भलत्याच गाजू लागल्या आहेत. या बैठका गुप्त असतात. म्हणजे वार्ताहराना खुल्या नसतात. बैठक संपल्यानंतर काही सांगण्यासारखे असल्यास वार्ताहरांना अधिकृतपणे सांगितले जाते. पण जिथे पाच पन्नास माणसे जमतात तिथे घडलेल्या गोष्टी फार काळ गुप्त थोड्याच राहू शकतात. या बैठकांमध्ये कधी नव्हे अशी खडाजंगी आजकाल जुंपू लागली आहे. आरोप, प्रत्यारोप यांची फैर झडते, संशय घेतले जातात आणि बैठका एकंदर चांगल्याच गाजतात. आणि पक्षातली बेदिली उघड होते.

संशयाच्या आणि अविश्वासाच्या या वातावरणाला कंटाळून विधानमंडळ कॉंग्रेस-पक्षाच्या एका बैठकीत तर मुख्यमंत्र्यानी आपल्या पदाचा राजीनामा देण्याची तयारी दर्शविल्याचीही कुणकूण आहे. त्याचं म्हणणं असं की ' माझ्यावर पक्षाचा विश्वास नसेल तर तसं स्पष्ट सांगा. मी सरळ जागा खाली करून देईन. पण अविश्वासाचं वातावरण ठेवू नका आणि निवडणुकीत आपल्याच पक्षाच्या उमेद-वाराची पाडापाडी करू नका. वैशंपायनांच्या पराभवामुळे पक्षाची बदनामी झाली तेवढी पुरे. विधान परिषदेच्या निवडणुकीत तरी आपले सर्व उमेदवार निवडून आले पाहिजेत. म्हणजे पक्षाला ताठ मानेनं उभं राहता येईल.'

राज्यसभेच्या निवडणुकीत वैशंपायन पडले त्यामुळे महाराष्ट्र कॉंग्रेसचे सर-चिटणीस श्री. शरद पवार यानी आपल्या पदाचा राजीनामा देण्याची तयारी दाखवली होती. पण त्याची समजूत घालून त्याना राजीनामा परत घेण्यास भाग पाडण्यात आले. राज्यसभेतला पराभव, संघटनेतले अंतर्गत भेद, विभागीय मत्सर व स्पर्धा आणि यशवंतरावांच्या दिल्लीतील स्थानाची अनिश्चितता यामुळे महाराष्ट्र कॉंग्रेसची प्रकृती फारच नाजूक झाली आहे. वावड्या अशा आहेत की राज्यसभा निवडणु-कीच्या वेळी झाले गेले ते गंगेला मिळाले. पण विधान परिषद निवडणुकीत सत्ता-धारी कॉंग्रेसचा एक जरी उमेदवार दगलबाजीने पडला तरी संघटनेतून दोनचार

---


# पुरंदऱ्यांची दौलत

**नऊ पेशवेकालीन कथा**

**ब मो पुरंदरे**

**किंमत : साडेतीन रुपये**

**राजहंस प्रकाशन**


---

राजीनामे तरी येतील आणि मोठा प्रसंग निर्माण होईल. असा प्रसंग टाळण्यासाठी मोठ्या निकराचे प्रयत्न चालू आहेत. सीमाप्रश्न आणि तो सोडवण्यासाठी कोणती पावले टाकायची हा मतभेदाचा आणखी एक मुद्दा. पण हे सगळे मतभेद झाकायचे, निवडणुकावरचे लक्ष थोडेफार काढून सीमाप्रश्नाकडे वळवायचे असे सध्या धोरण दिसते. कारण सीमाप्रश्नाचा निकाल लावणे हा आपली प्रतिमा वाढविण्याचा आणि सत्ता टिकविण्याचा सध्याच्या परिस्थितीत सर्वात उत्तम उपाय आहे हे कॉंग्रेस जाणून आहे. (शिवसेना पुढे म्हणेलही 'लढनेकू हम और खानेकू तुम.' विरोधी पक्षही म्हणतील.)

सत्ताधारी कॉंग्रेसचे सत्ता टिकवण्याचे असे निकराचे प्रयत्न चालू असताना शिवसेनेने मुंबईत एक नवी आघाडी मारली आहे. मुंबईचे महापौरपद शिवसेनेच्या हातून निसटले. पण महानगरपालिकेच्या चार स्टॅच्युटरी समित्यांपैकी तीन महत्त्वाच्या समित्यांची अध्यक्षपदे शिवसेनेला मिळाली आहेत. स्थायी समितीच्या अध्यक्षपदी शिवसेनेचे महानगरपालिकेतील नेते मनोहर जोशी निवडले गेले आहेत. बेस्ट आणि सुधारसमित्याच्या अध्यक्षपदी प्रमोद नवलकर आणि वामनराव महाडीक यांची निवड झाली आहे. उरली शिक्षण समिती, तिचे अध्यक्षपद इंडिकेट कॉंग्रेस-कडे गेले आहे. महापौरपदाच्या निवडणुकीसाठी इंडिकेट कॉंग्रेस आणि शिवसेना यांच्यात समझोता होणार होता. पण दिल्लीहून स्पष्ट नकार आल्याने तो होऊ शकला नाही. तरीही या समित्यांच्या निवडणुकाच्या वेळी थोड्याफार प्रमाणात तरी या दोन गटात देवाणघेवाण झाली असली पाहिजे. त्याशिवाय हे चित्र दिसले नसते. पण त्यामुळे महापौरपद सत्ताधारी कॉंग्रेसकडे तर चारही महत्त्वाच्या समित्यांची अध्यक्षपदे विरोधी गटाकडे अशी नाजूक परिस्थिती महापालिकेच्या राजकारणात निर्माण झाली आहे. गेल्या कित्येक वर्षात महापालिकेत अशी विचित्र परिस्थिती निर्माण झाली नव्हती.

महानगरपालिकेत शिवसेना अशा प्रकारे आघाडीवर आली असता स्थानिक राजकारणाच्या बाहेर मोठ्या राजकारणाच्या रणांगणात शिवसेनेने उतरावे असा बऱ्याच शिवसैनिकांचा आग्रह आहे. १९७२ च्या निवडणुकीत उतरण्याविषयीचे निश्चित धोरण जरी शिवसेना नेते सरसेनापती श्री. बाळासाहेब ठाकरे यांनी अद्याप जाहीर केले नसले तरी वेळोवेळी त्यांनी आपल्या भाषणामधून सूचित केले आहे. आज तरी असे दिसते की शिवसेना निदान मुंबईतल्या तरी विधानसभेच्या आणि लोकसभेच्या सर्व जागा लढवील. ठाणे, कुलाबा रत्नागिरी जिल्ह्यामध्ये सध्या शिवसेनेने शिरकाव केला आहे. पण एवढा जोर शिवसेनेने धरला आहे की नाही हे सांगता येत नाही. या जिल्ह्यांमधून देखील बऱ्याच ठिकाणाहून शिवसेना स्वतःचे किंवा पुरस्कृत उमेदवार उभे करील असा रंग दिसतो. पुणे जिल्ह्यातही काही ठिकाणाहून शिवसेना उभी राहण्याची शक्यता आहे.

पण सेनेचा खरा जोर आहे मुंबईत. शिवसेनेची आजची प्रतिमा मुबईच्या मराठी लोकाच्या मनात १९७२ पर्यंत कायम राहिली तर, त्या निवडणुकीत ही सघटना बरीचशी मुबई काबीज करील यात शका नाही. जाणकाराच्या मते महापालिकेच्या निवडणुका १९६९ फेब्रुवारीच्या दगलीनतर झाल्या असत्या तर महानगरपालिकेतील कमीत कमी साठ टक्के जागा शिवसेनेने काबीज केल्या असत्या. त्या चळवळीनतर शिवसेनेची लोकप्रियता वाढली हे निश्चित. पण सध्या महापालिकेतील १४० पैकी ४२ सदस्य शिवसेनेचे आहेत आणि शिवसेनेचा गट सख्येने दुसऱ्या क्रमांकाचा आहे.

येती सार्वत्रिक निवडणूक लढवली तर शिवसेनेला मुबईतील विधानसभेच्या जागापैकी निदान पन्नास टक्के जागा तरी आपल्याला मिळतील असा विश्वास शिवसेनेला वाटतो. आणि लोकसभेच्या पाच जागापैकी दोन किंवा तीन जागा. अर्थात हे नुसते अदाज आहेत. पण एक निश्चित की काहीही झाले तरी सर्वच्या सर्व मराठी मुबईकर शिवसेनेला कधीच मत देणार नाहीत. बहुसख्य मराठी लोकाची शिवसेनेला सहानुभूती आहे हे खरे. पण मुबईतील इतर विरोधी पक्षही मराठी लोकाचेच हेही तितकेच खरे. विधानसभेतील मुबईतून निवडून गेलेले कम्युनिस्ट आणि प्रजासमाजवादी आमदार हे बहुसख्य मराठी मतदार संघातूनच गेलेले. हे सर्वच मराठी मतदार शिवसेना काही जिंकून घेऊ शकणार नाही. तत्त्वासाठी मराठी लोकच भाडतात.

आणि सध्या जवळ जवळ सर्वच विरोधी पक्ष शिवसेनेवर तुटून पडले आहेत. सुरुवातीला कम्युनिस्ट एकाकीपणे भाडत होते समाजवादी अलिप्त होते. प्रजासमाजवादी तर शिवसेनेशी मधुचद्र साजरा करण्यात दंग होते. (आता मात्र शिमगा) शेतकरी कामकरी पक्षसुद्धा सेनेशी म्होतूर लावायला अधीर झाला होता. पण पुढे समाजवाद्यानी अलिप्तता सोडली, प्रजासमाजवाद्यांचा मधुचद्र सपला आणि त्याच्या घरावर शिवसेनेचे दगड येऊ लागले, शे. का. प. ला त्याच्या ठाणे आणि कुलाबा जिल्ह्यातच शह बसायला लागला. त्यामुळे हे सर्व पक्ष आता विधानसभेत शिवसेनेवर हिरीरीने तुटून पडू लागले आहेत. जनसघाचा शिवसेनेविषयीचा प्रथमपासूनचा सदिग्ध पवित्रा कायम आहे. म्हटल तर विरोध म्हटल तर नाही. बाळासाहेब ठाकरे मात्र आपल्या भाषणामधून आणि व्यगचित्रामधून जनसघीयाची यथेच्छ टिंगल करीत असतात.

मुंबई प्रजासमाजवादी पक्षाने आपल्या कीर्तीला साजेल असे एक मासलेवाईक निवेदन नुकतेच प्रसिद्ध केले आहे. त्यात त्यानी "शिवसेनेने आमच्या पक्षाशी हातमिळवणी करण्यापासून शिवसैनिकानी आमच्या पक्षाच्या नगरपित्याच्या घरावर मोर्चे काढण्यापर्यंत" काय झाले आणि त्या सबधात पक्षाची भूमिका काय आहे हे सागणारे हे विस्तृत निवेदन म्हणजे राजकीय भोंदूगिरीचा इरसाल नमुना

आहे. केवळ निवडून येण्यासाठी हातमिळवणी करायची आणि नंतर मात्र त्याच संघटनेला....' प्रतिगामी, दहशतवादी ' अशा शिव्या मोजायच्या ! महानगरपालिके- साठी निवडणूक समझोता करण्याच्या अगोदर प्रजासमाजवाद्यांना माहीत नव्हते काय की शिवसेना प्रतिगामी आणि दहशतवादी आहे म्हणून ? की ही अक्कल उशिरा सुचली. आपली राजकीय ताकद गहाण टाकायची आणि मिथ्या काथ्याकूट करीत बसायचे ही प्रजासमाजवाद्यांची परपराच दिसते. पण हा फार मोठा आणि स्वतंत्र विषय आहे. इथेच सोडलेला बरा.

एकदर सारेच विरोधी पक्ष सध्या शिवसेनेची कोंडी करण्याच्या बेतात आहेत. इंडिकेट काँग्रेसच्या दिल्ली नेत्याचा शिवसेनेशी हातमिळवणी करण्यास सक्त विरोध आहे. पण ऐनवेळी काय घडेल ते सागता येत नाही. द्रविड मुन्नेत्र कळ्हम सारख्या पक्षाशी इंडिकेट समझोता करू शकते तर शिवसेनेशी का नाही ? शिव- सेनेची ताकद वाढू लागली तर ती गोष्ट अपरिहार्य होऊन बसेल.

दरम्यान सारेच पक्ष " आम्हीच खरेखुरे शिवसेनेशी लढणार " अशा डरकाळ्या फोडीत शिवसेनेला मदत केल्याचे एकमेकावर आरोप प्रत्यारोप करीत आहेत. मैदानात आल्यावरच लढतो कोण आणि शेपूट घालून पळतो कोण हे कळेल. तोवर नुसती गमत बघावयाची. पण ही मोठी लढाई खेळायच्या आगोदर शिवसेनेचे महा- पालिकेतील नेते आणि आता स्थायी समितीचे अध्यक्ष श्री. मनोहर जोशी यानी एक वर्षात मुंबईतील डास नेस्तनाबूत करण्याची शपथ घेतली आहे. " डासाचे कर्दनकाळ म्हणून शिवसेनेच्या नगरपित्याना मबईची जनता ओळखू लागेल " असे ते म्हणाले. आता ही मोहीम मुंबई महानगरपालिका हाती घेणार की शिवसैनिक हे अजून त्यांनी स्पष्ट केले नाही. कोणीही का हाती घेईना. पण बेत चांगला आहे. सध्या डास आणि गुंड या दोन जमातीनी मुंबईत धुमाकूळ घातला आहे. या दोघांचा जो कोणी नायनाट करील त्याला मुंबईची जनता दुवा देईल.

शिवसेना ( किंवा महापालिकेतील शिवसेनेचे नगरपिते ) डास निर्मूलन मोहीम काढणार आहे हे ऐकून तमाम मुंबईकरांना दिलासा वाटला. कारण हाती घेतलेले काम तडीला नेण्याची सेनेची ख्याती आहे. तेव्हा मुंबईतील डास एक वर्षाच्या आत काढता पाय घेतील यात सशय नाही. प्रथम डास तर डास. गुंडगिरीशी सामना नतर करता येईल. गुंडाना एकापरीने आपण समजावू शकतो. त्याच्याशी सामना करणे तसे सोपे आहे. पण डासाचे प्रकरण मोठेच कठीण आहे बोवा. आम्ही समस्त उपनगरवासीय डासांमुळे हैराण झालो आहोत. डासाचं निर्मूलन झाल्यावर यथा- वकाश गुंडगिरीचा बदोबस्त करायलाही शिवसेना पुढे सरसावेल अशी मुंबईकरांची अपेक्षा आहे !

**— वार्ताहर**

चंद्रशेखरांनी त्यांच्या 'माणूस'मधील कलकत्यावरील गाजलेल्या लेखमालेत कलकत्यातील कम्युनिस्टांना 'गुड कॉंडक्ट्'चे सर्टिफिकेट दिल्यापासून कलकत्यातील हिंसाचाराविषयीचे माझे 'कुतूहल' जास्तच जागृत झाले. कलकत्यात गुंड कोण व कम्युनिस्ट कोण हे कळतच नाही. तीच गोष्ट इतर प्रांतात कॉंग्रेस-विषयी म्हणता येतील. सत्तारूढ पक्षात शिरले की गुन्ह्यापासून अभय मिळते हा जगातील साऱ्याच गुंडांचा अलिखित कायदा आहे. अशा परिस्थितीत कलकत्याचे गुंड एकदम चांगले कसे झाले हा प्रश्न माझ्या मनास तेव्हापासून सतावून राहिला आहे.

वृत्तपत्रीय अतिशयोक्तीपूर्ण प्रचाराची मला संपूर्ण कल्पना होती व आहे. पण 'ट्रक भरून साड्या व चोळ्या (ब्रा)' असल्या जातीचा राईचा पर्वत आपल्या ज्यूट प्रेसकडून अपेक्षित नव्हता. तो मक्ता प्रखरात अमेरिकन नियतकालिकांकडे दिला आहे. त्यांनी तर फोटोही छापले आहेत ट्रकचे व (स्टुडिओत!) उघड्या नागड्या केलेल्या स्त्रियांचे.

ह्याची 'इनसाईड् स्टोरी' काय हे जाणून घेण्याच्या तेव्हापासून मी मागे लागलो. विशेषतः, गृहमंत्रालयाचे प्रचार खाते त्यात सामील तर नाही ना हा माझा होशाच इंटरेस्ट. असे घडू शकते! शेख अब्दुल्लास पकडण्याआधी त्याविरुद्ध 'कँपेन' उभी करण्यासाठी मुंबईतील एका इंग्लीश साप्ताहिकाला ऑफीशीअली किती पैसे दिले गेले ते मला माहीत आहे.

कम्युनिस्ट प्रचारात मागे नाहीत, त्यांच्याकडे तर आंतरराष्ट्रीय प्रचारतज्ञ कामावर आहेत. त्याचा प्रत्यय मला कलकत्यात पुन्हा एकदा आला. त्या रात्री काहीच घडले नाही. आम्हास बदनाम करण्यासाठी भांडवलशाही वृत्तपत्रांनी केलेल्या ह्या अपप्रचाराकडे लक्ष देऊ नका असा साळसूदपणाचा आव त्यांनी

# रसगुल्ले आणि बॉंब्स्

# दाट्टानिया

## एक

आणला. त्यासाठी पुरावा म्हणून काही प्रोफेसर्स, फोटोग्राफर्स वगैरेना त्यांनी साक्षी म्हणून पुढे केले.

त्याची चौकशी करण्यासाठी एक कमिशन नेमण्यात आले. त्या कमिशनचे काम नीट होऊ नये म्हणून साम्यवाद्यांनी केलेली कृत्ये, त्यांनी मुलींना दिलेल्या धमक्या, कलाकारांना व फोटोग्राफर्सना दिलेली दहशत, रवींद्र सरोवरच्या आजूबाजूस असलेल्या इमारतीत राहणाऱ्या लोकांना दाखविलेला धाक–हे सारे प्रकार आज उजेडात आले आहेत.

माणूस पुरा लपवता येत नाही. तो लपवितो तो फक्त पापे !

रवींद्र सरोवर प्रकरण आज इतिहासात जमा झाले आहे. त्यानंतर रोज हे हिंसाचारी प्रकार, हा दहशतवाद, ही अनीती कलकत्त्यात वाढतच आहे. रवींद्र सरोवर प्रकरण त्यामुळे आज फिक्के वाटते

वर्षापूर्वी मी ‘रसगुल्ले आणि बॉम्ब्स्’ हा लेख ‘माणूस’मध्ये प्रसिद्ध केला. त्यावेळी ह्या हिंसेचे प्रमाण गृहमंत्र्यांनी जर नीट लक्ष दिले नाही तर वाढीस लागेल असा परखड इशारा दिला होता. त्यावेळेस हिंसाचार आजच्या तुलनेने पुष्कळच कमी होता. हिंसाचाराच्या वाघाने नुकतीच कुठे एखाददोन माणसे गट्ट केली होती. त्या वाघास ताबडतोब गोळी घालून ठार मारणे आमच्या राजकारणी शिकाऱ्यांना त्यावेळी सहज शक्य होते. पण आमच्या शिकाऱ्यांचे लक्ष दिल्लीतील सत्तेवर केंद्रित झाले असल्यामुळे ही शिकार राहून गेली व हा हिंसाचाराचा बंगाली वाघ चांगलाच नरभक्षक बनला.

“आई, मी पहिली चोरी केली त्यावेळेस तू माझा कान पकडून मला शिक्षा केली असतीस तर आज ही वेळ आली नसती” असे फाशीवर चढणाऱ्या एका कैद्याने त्याच्या आईस सुनावले : ह्या अर्थाची गोष्ट लहानपणी सर्वांनीच ऐकली

असेल. तिचे जिवत उदाहरण आज आपल्याला बगालमध्ये पहावयास मिळते. हातभट्टीवाला, खिसेकापू, खूनी. आणि सर्वात मोठा गुन्हेगार–' राजकारणी माणूस '– या सर्वांशी भेटण्याची व आपुलकीने बोलण्याची सधी डॉक्टर या नात्याने मला मिळाली आहे सर्वांचे म्हणण एकच, ' आम्ही हरिश्चद्राचे बाप झालो असतो. जर आम्हाला कोणी वेळीच शिक्षा केली असती तर ! ' पहिला प्याला, पहिली चोरी, पहिला खन व पहिला राजकीय कट—

सामान्य माणूस म्हणतो आम्हाला पटते ह्या लोकांना वेळीच सावध करायला हवे, पण माजराच्या गळयात घटा बांधणार कोण ?

बंगालमध्ये हेच घडले.

बगालमध्ये आज जी अस्वस्थता दिसते, आज जे अराजक आढळते, आज जी गुंडगिरी एकू येते त्या सर्वांची सुरुवात कॉंग्रेसने केलेली आहे. अगदी नावे व वर्ष घेऊन एकेक प्रसग घडाघडा म्हणून दाखविता येतील या स्वार्थी कॉंग्रेसवाल्या राजकीय पुढाऱ्यांच्या जुलुमी राजवटीतील. दिल्लीतील कॉंग्रेस केंद्र सरकारास आज जास्त बोलता येत नाही, ते तेवढयासाठी.

बोलूनच द्या काही कमीजास्त. पटपट स्विस् बँकेत कोणाचे किती सोने व इतर पैसे आहेत ते बाहेर येईल.

लक्षात ठेवा, कलकत्ता ही एकेकाळी भारताची सर्वात श्रीमंत नगरी होती. सुरुवातीला ती भारताची राजकीय राजधानी होती. पुढे टाटा–बिर्ला व इतर ब्रिटीश व मारवाडी पेढयांच्या व बँकांच्या कृपेने ती व्यापारी राजधानी बनली. आज ही नगरी गांधीशताब्दीच्या निमित्ताने सपूर्णपणे हिंसाचारी राजधानी बनली आहे.

लोकशाहीत सत्तारूढ पक्षास आपले बळ दाखविण्याची सधी विरोधकांना फक्त निवडणुकांच्या वेळीच मिळते. त्यावेळी सत्तारूढ पक्ष साम, दाम, दड व भेद या नीतीचा उपयोग करून विरोधी पक्षास जेरीस आणतो. पण जनता फार त्रासली की ती सत्तारूढ पक्षाचे पैसे घेऊन मात्र विरोधी पक्षाच्या पेटीत टाकते. बगालमध्ये डॉ. बिधनचंद्र रॉय यांची समर्थ राजवट सपली. ए. के. सेन किंवा डॉ. घोष हे त्यामानाने छोटे कॉंग्रेस पुढारी. दिल्ली त्यांना जास्त मदत देईना. डॉ. रॉय मुख्य प्रधान नसते तर बगाल केव्हाच साम्यवादी झाला असता; डॉ. रॉय नेहरूवर दडपण आणून बगालचे आर्थिक, राजकीय, औद्योगिक व कृषिक हित साधण्यात वाकबगार होते. त्यांच्या दोघा वारसाच्या राजवटीत कॉंग्रेस पुरेशी अप्रिय झाली. ह्या अप्रियतेचा फायदा बगालमध्ये फक्त साम्यवादी मंडळींनी घेतला. याचे कारण ?

पैसा, प्रचार व संख्याबळ.

१९६७ च्या निवडणुकीत कॉंग्रेसला कॉंग्रेसनेच हारविले. थोडक्यात, इंडिकेट–सिंडीकेटची खरी सुरुवात कलकत्त्यात झाली ! इदिरा गांधीस नाहीतरी कामराज,

पाटील, अतुल्य घोष वगैरे दादागिरी करणारी मंडळी नकोच होती. त्यांच्या अप्रियतेचा धोका आपण कशाला विकत घ्या असा साळसूद विचार इंदिराजींनी केला व काँग्रेसला बंगालमध्ये मरू दिले.

दोन बैलात मारामारी लावून आपण अजिक्य राहणाऱ्या गोष्टीतल्या सिंहाची स्ट्रॅटेजी कम्युनिस्ट लढले.

बंगालमध्ये संयुक्त आघाडी सत्तेवर आली ती अशा अप्रत्यक्ष रीतीने. बाईस कम्युनिस्टांचा कावा कळून चुकला होता, पण बाई त्यांच्या ताकदीवर उड्या मारीत असल्याकारणाने कम्युनिस्टांना हात लावण्याची त्याना हिंमत होईना. त्याची जबाबदारी गृहमंत्र्यावर साहजिकच पडली. गृहमंत्र्याचा मी बचाव करीत नाही. पण, त्यांची अवस्था 'इकडे आड न् तिकडे विहीर' अशी झाली. यशवंतराव अप्रिय होऊन गृहमंत्रीपद सोडून गेले तर बाईंना हवेच आहे. ओळीने अनेकांना खूष करता येईल त्या पदावर थोडा थोडा वेळ नेमून. याचा अर्थ 'हम करेसो कायदा' हे धोरण अंमलात आणून गृहमंत्रीपद चालू ठेवणे यशवंतरावांना अशक्य होते दुसरा मार्ग म्हणजे राजकीय डावपेच लढवून आपल्या आसनास जराही धक्का न लागेल असे धोरण आणखी विरोधकांचा काटा काढणे हा होय. दोन्ही मार्गांनी अप्रियता सुटत नाही! मग आपली गादी पक्की का करू नये? आजकाल ज्यास काम करवून घ्यायचे आहे त्याला बऱ्याच जणांना दुखवावे लागते. ज्याना काम करायचे नाही त्याना जो काम करतो त्यास शिव्या देऊन, निरुत्साही करून, कामाचा वेग मंद करणे हा राजमार्ग मोकळा आहे. एफिशिअन्सी मुर्दाबाद!!

यशवंतरावांना प्रत्येक प्रांताच्या राजधानीत आपली खास माणसे नेमावीच लागतात. उदाहरणार्थ, पंजाबात पावटे, बंगालमध्ये धर्मवीर. यशवंतरावांनी धर्मवीरांच्या मदतीने पहिली संयुक्त आघाडी चक्क मोडून काढली! हे धर्मवीर नावाप्रमाणे वीर होते कम्युनिस्टांची घोषणावादी ताकद फक्त त्यांनी जोखली होती. सत्तेचा पुरा उपयोग करून त्यांनी कम्युनिस्टांचा दहशतवाद पार निकालात काढला पण कम्युनिस्ट्स् व 'खरे' कम्युनिस्ट (जनसंघ नो एंटीटी!) हालचाली ओळखण्यात महावस्ताद असतात. कोठे भिडायचे ते त्यांना बरोबर कळते. बंगाली कम्युनिस्टांनी इंदिराजींशी गुफ्तगू सुरू केले व धर्मवीरांचा काटा काढला. भारतीय इतिहासात विश्वासराव गोळी लागून पडला की पळापळी होते व शत्रू जिंकतो, असा एक अलिखित कायदा आहे. धर्मवीर गेले व बंगालच्या राजकारणात कम्युनिस्टांनी हैदोसधुल्ला घालायला सुरुवात केली.

पहिल्या संयुक्त राजवटीच्यावेळची गोष्ट. अजय मुखर्जी बांगला काँग्रेसचे पुढारी. ज्योती बसू कम्युनिस्टांचे. त्याही वेळेस कम्युनिस्टांनी अजय मुखर्जींना एवढे छळून काढले की त्यांनी गांधी जयंतीच्या दिवशी (दोन ऑक्टोबर १९६७) कम्युनिस्टांविरुद्ध चार आरोप जाहीर केले: १ कम्युनिस्टांनी औद्योगिक क्षेत्रात

अशांतता माजवली आहे. २. शेतकी क्षेत्रात त्यांनी दंगे घडवून आणले आहेत. ३. पोलीसांना 'तटस्थ बने' करून सोडले आहेत. त्यामुळे राज्यात अदांधुंदी माजली आहे ४. त्यांनी चीनी शत्रूशी हातमिळवणी करून राष्ट्रद्रोह चालविला आहे. (त्यावेळी नकसलवादी मंडळी मार्क्सिस्टांपासून वेगळी झाली नव्हती.)

मोठी मजा होती. अजयबाबू घराचे मुख्य कर्ते पुरुष. ज्योती गृहलक्ष्मी. नवऱ्याने बायको व्हाईट चालीची आहे, सारे घरातले वातावरण बिघडवून टाकले आहे, मुलांकडे (माझ्या!) बघत नाही, वगैरे तक्रारी सुरू केल्या तर जग त्याला म्हणेल, 'लेका, रडत का बसलास? सोडचिठ्ठी दे दुसरी बायको कर की"

पण अजय मवर्जी पडले गांधीवादी!

ते काही ज्योतिबाईना 'घराच्या बाहेर जा' म्हणून सांगू शकले नाहीत. त्यांना काय वाटेल? अजयबाबू हृदय परिवर्तनाची वाट पहात होते असा गैरसमज होईल तुमचा. पण तसे काही नव्हते. साऱ्या गांधीवाद्यांप्रमाणे त्यानाही खुर्चीचा मोह आवरता येत नव्हता

एक महिन्यात अजयबाबूंचे डोळे उघडले.

चार नोव्हेंबर रोजी अन्नमंत्री प्रफुल्ल घोष यांनी आपला व आपल्या १७ सदस्यांचे राजीनामे सादर केले गंभीर समस्या उभी राहिली. कॉंग्रेसचे संयुक्त मंत्रिमंडळ गडगडणार व कम्युनिस्ट गादीवर येणार अशी वेळ आली. त्याचे बहुमत चक्क दिसत होते. प्रफुल्ल घोषांना खुनाच्या धमक्या येऊ लागल्या. कमगारांच्या सभा व तप वाढू लागले. हिंसाचाराचे प्रकारही वाढले. गव्हर्नर धर्मवीर देखिल कंटाळले. बंगाल पुरा साम्यवादी होणार असे चित्र उभे राहिले धर्मवीरानी संयुक्त आघाडीस बडतर्फ केले व प्रफुल्ल बाबूंना मंत्रिमंडळ रचण्याची विनंती केली. सुदैवाने त्यांचे मंत्रिमंडळ राज्य करू शकले नाही. रोज बेबनाव! त्यामुळे धर्मवीरांनी राष्ट्रपतिशासन जाहीर केले पण राष्ट्रपतिशासन तरी किती वेळ चालविणार? म्हणून पुन्हा निवडणुका झाल्या. पुन्हा कम्युनिस्टस् निवडून आले! अर्थात् स्ट्रॅटेजी जुनीच. पुन्हा एकदा संयुक्त आघाडीची राजवट सुरू झाली

अशी राजवट जगाच्या पाठीवर इतरत्र कोठेही पहावयास वा ऐकावयास मिळणार नाही विधानसभेच्या सभासदांची सख्या दोनशेऐंशी त्यातील पक्षांचे बलाबल पुढीलप्रमाणे : डावे कम्युनिस्ट ८०, इंदिरावादी कॉंग्रेस ३४, निजलिंगप्पा कॉंग्रेस १६, स्वतंत्र पण कॉंग्रेसवाल ५. अजयबाबूंची बांगला कॉंग्रेस ३३, उजवे कम्युनिस्ट ३०, फॉरवर्ड ब्लॉक २१ क्रांतिवादी समाजवादी १२, एस. एस. पी. ९ पी. एस. पी. ५, गरखा लीग ३, लोकसेवक संघ ४, प्रागतिक १, मुस्लीम लीग ३ क्रांतिवादी कम्युनिस्ट २ कामगार पक्ष २ व इतर २०.

यांतील प्रमुख गट डाव्या साम्यवाद्यांचा. त्यांची सख्या ८०. हुकमी बहुमत

[ पृष्ठ ५२ वर ]



यहुदी मेनुहीन

# शांतीचे सूर छेडणारा कलावंत

गेल्याच वर्षीची गोष्ट. जानेवारीची पंचवीस तारीख होती. मुंबईच्या षण्मुखानंद हॉल-मध्ये यहुदी मेनुहीन यांच्या वायलीन वादनाचा कार्यक्रम होता. हॉल तुडुंब भरला होता. मोठ्या मुश्किलीनं तिकीट मिळालं होतं मला. लहानपणापासून ज्याचं नाव मी ऐकत आलो होतो त्या जगविख्यात वायलीन वादकाचं वादन ऐकायला मी उत्सुक होतो. पहिला औपचारिक समारंभ संपला आणि रंगमंचावर मेनुहिन आले. पियानोचे स्वर हवेत तरंगत होते. मेनुहीनचे मेव्हणे लुई केंटर पियानोची साथ करीत होते. मला वाटतं सीझर फ्रँक या रचनाकाराची ती रचना होती. काही क्षण गेले. मेनुहीननी वायलीन खांद्यावर टेकवलं. दुसऱ्या हातातला गज सरसावला आणि आपल्या खांद्यावरल्या वायलीनला ते त्या गजानं गोंजारू लागले. बघता बघता सारं सभागार एका तेजोमय स्वरवलयानं प्रकाश-मय झालं. ते स्वर अद्‌भुत होते, एका विलक्षण तेजानं तळपत होते.

त्यानंतर अनेक रचना त्यांनी सादर केल्या. बाख, शोपँ, बिथोव्हेन अशा विश्वविख्यात रचनाकारांच्या रचना त्यांनी आपल्या वायलीनवर वाजविल्या आणि श्रोत्यांना मंत्रमुग्ध केलं. वायलीन या वाद्याचं सामर्थ्य मला त्या दिवशी कळलं. शांतसंध्यासमयीची अनामिक हुरहूर, शरदाच्या पूर्णिमेची उत्फुल्लता, वादळी वाऱ्याचा झेपावणारा गोंगाट आणि प्रक्षुब्ध सागराच्या रौद्र लाटा या साऱ्यांना तो स्वरांचा किमयागार आपल्या

अरविंद गजेंद्रगडकर

वायलीनच्या स्वरानी स्वराकार करीत होता. अद्भुत होत. खरोखर अद्भुत !

दुसऱ्या दिवशी एका अनौपचारिक समारभात या महान कलाकाराशी बोलण्याची, त्याला जवळून पहाण्याची, त्याच्या सहवासात काही तास घालविण्याची सधी मिळाली. सौजन्य, सौहार्द आणि विनय याच प्रत्यतर मिळालं. हा केवळ मोठा कलावतच नव्हता तर एक मोठा माणूसही होता याची प्रचीती आली. तो सहवास, तो सुगधी सुस्वर क्षण मी माझ्या अत करणाच्या एका कप्प्यात अजून जपून ठेवला आहे.

यहुदी मेनुहीनच जीवन हा नादसृष्टीतला एक चमत्कार आहे. यहुदीचे वडील मोशे मेनुहीन आणि आई मरल्या हे मूळचे रशियन ज्यू. पण अमेरिकेत स्थायिक झालेले मोशे मेनुहीन हे न्यूयॉर्कला एका शाळेत शिक्षक होते. मोठे तत्त्वनिष्ठ होते ते. या तत्त्वनिष्ठेपायीच त्याना नोकरी सोडावी लागली. शाळेच्या मुख्याध्यापकांशी त्याचे मतभेद झाले नोकरी सुटली तेव्हा मग मेनुहीन कुटुंबानं कॅलिफोर्निया प्रातातल्या सॅनफ्रॅन्सिस्को शहरी जायच ठरवल. तिकिटाला सुद्धा पैसे नव्हते. पियानो विकायची पाळी आली होती. पण कोण्या एकाच्या मनात देव उभा राहिला आणि मेनुहीन कुटुव कॅलिफोर्नियाच्या उबदार हवेत येऊन पोचल. यहुदीच्या वडिलाना एका हिब्रू शाळेत नोकरी पण मिळाली. पगार चागला मिळू लागला. मेनुहीन कुटुवाला प्रिय असलेला सगीताचा छद जोपासला जाऊ लागला.

छोटा यहुदी सगीताच्या मैफली ऐकत चूपचाप बसायचा. वायलीन या वाद्याचं त्याला लहानपणापासूनच आकर्षण वाटयच. तो चार वर्षांचा असताना त्याला त्याच्या आजीन एक छोटस वायलीन भेट म्हणून दिल. त्या वायलीनवर छोटया यहुदीन गज फिरवून स्वर काढायचा प्रयत्न केला. पण जेव्हा मनासारखे स्वर निघेनात तेव्हा ते वायलीन त्यानं कोपऱ्यात भिरकावलं आणि तो रडत बसला. "हे वायलीन गात नाही. मला दुसर गाणार वायलीन आणून दे" असा हट्ट त्यानं आपल्या आईजवळ धरला. आई हसली आणि तिन त्याला त्या वायलीनवर स्वर कसे काढावे हे समजावून दिल.

सिगमंड अँकर हे यहुदीचे पहिले गुरु. त्यानी यहुदीचं सुप्त सामर्थ्य ओळखल. या मुलाला दैवी देणगी लाभली आहे हे त्यानी जाणलं. या सुप्त गुणाचा पूर्णपणे विकास झाला तर जगाला एक महान कलावत मिळणार आहे हे पण ते ओळखून होते. त्यामुळे ते यहुदीकडून अपार परिश्रम करून घेत असत. दिलेला प्रत्येक पाठ बिनचूक ततोतत वाजला जावा यासाठी ते अत्यत जागरूक असत. दोन वर्ष अशा कडक शिस्तीत त्याचं शिक्षण झालं. आणि मग एका मैफलीत यहुदीचं स्वतंत्र 'वायलीन' वादन झाल पांढरा सदरा आणि मखमलीची अर्धी विजार घातलेल्या त्या पोराचं ते अद्भुत वायलीनं वादन ऐकून लोक चकित झाले. वेडे झाले. तेव्हापासून प्रसिद्धीचं आणि कीर्तीचं वलय या कलाकारावर आजतागायत आहेच.

लुई पर्सिजर हे यहुदीचे दुसरे गुरू. त्यांच्याकडे यहुदीन मोझार्ट आणि बिथोव्हेन या प्रसिद्ध रचनाकाराच्या रचनांच शिक्षण घेतल. दोन वर्षाच्या शिक्षणानतर सॅनफ्रॅन्सिस्कोमधल्या सिंफनी ऑर्केस्ट्राच्या एका कार्यक्रमात यहुदीच स्वतत्र वायलीन वादन झाल. या कार्यक्रमात यहुदीन मोझार्टची एक अत्यत अवघड रचना अशा आत्मविश्वासान सादर केली की मी मी म्हणणारे त्या कौशल्यान चकित झाले. दुसऱ्या दिवशी सर्व वर्तमानपत्रातून एकच नाव झळकत होत. यहुदी मेनुहीन !

त्याच हे अद्‌भुत कौशल्य पाहून एका सगीतप्रेमी सधन गृहस्थानं त्याच्या उच्च शिक्षणाचा सर्व खर्च करायच कबूल केल. यहुदीन युरोपभर हिंडून श्रेष्ठ कलाकाराचे कार्यक्रम ऐकावेत आणि आपल्या कलेला अनेक पैलू पाडावेत हीच त्याची सदिच्छा होती. ही सधी घेऊन मेनुहीन कुटुब युरोपात आल.

युरोपमध्ये यहुदीन अनेक कार्यक्रम ऐकले. त्याला कशातच विशेष रस वाटला नाही. पण जॉर्ज एनेस्को या वायलीन वादकाच वायलीन वादन यहुदीन ऐकलं मात्र, तो अगदी भारावून गेला. 'बस्स् !' शिकायच तर याच्याकडेच. त्यान मनाशी निश्चय केला. पण जॉर्ज एनेस्कोला वेळ नव्हता. पण पहाटे पाच वाजता जाऊन यहुदीन आपल वायलीन त्याला ऐकवल. त्या लहान पोराच ते अजब कौशल्य पाहून एनेस्को भारावून गेला. या मुलाच्या अगुलीतून दैवी स्पर्श पाझरतो आहे हे त्या


मानवाचा जागतिक विक्रम
आयुर्वेदाचा जंगी पराक्रम ।
कितीहीं झाला अतिसार
"मस्कीनॉल"ने होई पसार ।

**"मस्कीनॉल"**

आमांश ( पोटात कळ अगर मुरडा होऊन शौचास होणे ) रक्तातिसार ( शौचातून रक्त पडणे ) हगवण, जुलाब, उलटी, कॉलेरा यावर वनस्पतीचे अनुभवसिद्ध प्रभावी औषध

**मस्कीन फार्मा, मुंबई नं. ७.**

महान कलावंतानं ओळखलं. त्यानं यहुदीला शिकवायचं कबूल केलं. एक महान स्वरशिल्प आकार घेऊ लागलं.

न्यूयॉर्क सिंफनी ऑर्केस्ट्रा या जगप्रसिद्ध वाद्यवृंदाचा कार्यक्रम न्यूयॉर्कच्या कार्नेजी हॉलमध्ये होणार होता. त्या वाद्यवृंदात स्वतंत्र वायलीन वादन करण्याचं आमंत्रण यहुदीला मिळालं. अकरा वर्षाच्या यहुदीन बिथोव्हेनची एक अवघड रचना इतक्या सफाईन आणि इतक्या सहजतेन वाजविली की सारे टीकाकार आणि समजदार थक्क झाले. त्या कार्यक्रमान यहुदी जगप्रसिद्ध झाला. जगातला सर्वश्रेष्ठ वायलीन वादक म्हणून मान्यता पावला.

दुसर महायुद्ध सुरू झाल तेव्हा यहुदी अस्वस्थ झाला. हिटलरन ज्यूचा केलेला छळ पाहून त्याच मन कळवळल. या नाझी भस्मासुराविरुद्ध आपण कस झगडावं हेच त्याला कळेना आणि मग त्याला आपल्या हातातल्या जादूची आठवण झाली. आपल वायलीन घेऊन तो तडक सैनिकाच्या छावणीकडे गेला. युद्धाच्या भयानक परिसरात सगीताच्या स्वराच कमळ फुलू लागल, डोलू लागलं. त्या नादकमळाच्या सौंदर्यान सैनिकांना जणू सजीवनी लाभली. वायलीनच्या त्या स्वरांनी त्यांना आशावाद शिकविला. ते दुप्पट उत्साहानं हिटलरच्या हुकूमशाहीवर तुटून पडले.

युद्ध सपलं. फ्रान्स स्वतत्र झाला. तिथं यहुदी मेनुहीन हजर झाले. पॅरिसच्या मुक्तिदिनादिवशी त्यानी आपल्या दिव्य स्वरानी पॅरिसच्या जनतेला धुद केलं एवढच नव्हे तर फ्रेंच राष्ट्रगीतही वाजवून फ्रेंच लोकाना आपलसं केलं.

जगातल दैन्य आणि दारिद्र्य पाहून हा कलावत कळवळतो. मग तो आपल्या वायलीन वादनाचे कार्यक्रम करतो. पैशाचा त्याच्यावर पाऊस पडतो. तो हा पैसा त्या दीनावर उधळतो. त्या पीडीताच्या चेहेऱ्यावर हास्य फुटलं की आपण हसू लागतो. जगातल्या कुठल्याही देशातल्या पीडीताचे अश्रू पुसण्यासाठी हा मानवतावादी कलावत आपलं वायलीन घेऊन सज्ज असतो.

एकोणीसशे एक्कावन्न साली मेनुहीन प्रथम भारतात आले. पं. नेहरूनी बोलवल म्हणून. त्या पहिल्याच भेटीत ते भारतावर भाळून गेले. भारतीय सगीत आणि योगशास्त्र याचा मेनुहीनवर विलक्षण प्रभाव पडला. भारतीय सगीताचा परिचय पाश्चिमात्यांना व्हावा म्हणून त्यानीच पं. रविशकर आणि उस्ताद अली अकबरखाँ याचे कार्यक्रम इग्लड अमेरिकेत घडवून आणले. योगासनांचं तर त्यांना वेडच आहे. पुण्यातले योगशिक्षक श्री. अय्यगार दरवर्षी त्यांच्याकडे जातात आणि त्यांना निरनिराळी आसन शिकवितात.

शुद्ध आणि पवित्र जीवनच सुंदर संगीत निर्माण करू शकत अशी या मानवतावादी कलावताची दृढ श्रद्धा आहे.

□ □ □

# प्रतिनिधी

विलास रुईकर

सुरेश ब्रह्मनाळकर. या गृहस्थाला मी अगदी रांगायला लागल्यापासून पाहतो आहे. म्हणजे तो आणि मी जवळजवळ एकदमच रांगायला लागलो. दोघांच्या आया एकमेकीकडे बसायला आल्या गेल्यावर दोघांना पदराआड झाकायच्या, तेव्हा-पासूनचे आम्ही सवंगडी.

सुरेश लेकाचा पहिल्यापासून अगदी 'हे' आहे. या 'हे'त मला वरंच काही म्हणायचंय. तो नंबर एकचा बावळट असूनही अत्यंत आत्मकेंद्रीत झालेला जीव आहे. हल्ली तर जसंजसं वय वाढतं आहे तसा त्याच्यातला 'रिझर्वपणा' उंच इमारतीची भिंत विटे विटेनं वाढावी तसा वाढतो आहे.

या जीवाला मित्र फक्त दोनच. एक मी आणि दुसरा शाम करंदीकर. त्याच एक कारण असं होतं की त्याला त्याच्या सरळ नावानं हाका घालणारे फक्त आम्हीच दोघं होतो. बाकीचं गावातलं यच्चयावत पोर त्याला 'सुऱ्या-चाकू' म्हणून संबोधायचं. बालपणातल्या भांडाभांडीचं हे पर्यवसान होतं. प्रथम सुरेशचा 'सुऱ्या' झाला. सुऱ्याचा 'सुऱ्या-चाकू' झाला. आणि शेवटी सुऱ्याचाकूचा 'सुऱ्या-चाकू बिब्ब घेणाऽऽर' झाला. तेव्हापासून सुरेश सदाशिव, लोकल गॅझेटमध्ये 'सुऱ्याचाकू बिब्बं घेणाऽऽर' या संपूर्ण नावानं प्रसिद्ध झाला. एकंदरीत सुरेशची आणि प्रसिद्धीची सोयरिक जुनी होती! सांगायचा मुद्दा हा की त्याला सरळ नावानं हाक मारणारी फक्त दोन तोंडं होती. मी जन्मजातच मवाळ वृत्तीचा माणूस! विकृत स्वरूप कशालाही न देण्याची माझी प्रवृत्ति! दुसरा म्हणजे शाम करंदीकर. लेकाचा तसा स्टंटच होता पण तोत्रा होता. त्यामुळं इत-रांच्या नावाची विकृती त्याच्या तोंडून नैसर्गिकरित्याच होत असल्याने सुरेशला त्याची जाणीव क्लेश देत नसे. त्यामुळंच त्याच्या स्नेही संप्रदायाच्या जोडीत शाम्याचं स्थान अबाधित राह्यलं आहे.

सुरेशचं वागणं अगदी लहानपणा-पासून प्रातिनिधिक असायचं असं मला वाटतं. आजकाल म्हणजे टंकलेखकाची सरकारी नोकरी करून संसाराच्या मिनीकारला चालती ठेवण्यापर्यंत त्याच्या सर्व कृती प्रातिनिधिक असतात.

सुरेशला अर्थातच, प्रतिनिधी, प्राति-निधिक वगैरे शब्द उशीरा ठाऊक झाले

हे एका परीनं बरच झाल. नाहीतर लहानपणी नाकातून लोंबणारी लोळी ही जगातल्या समस्त बालचमूची प्रातिनिधिक लोळी आहे, असं सांगायलासुद्धा त्यानं कमी केल नसत. सुन्याला लेकाला वाचासुद्धा उशीरा फुटली. चार-साडेचार वर्षांचं सदाशिवराव ब्रह्मनाळकराच हे लेकरू सहज सुलभ आई-बाबापर्यंतसुद्धा पोचलं नव्हत. आणि – एक दिवस तो महान् क्षण उगवला. सुन्याची जीभ टाळयाला लागली आणि उपासतापास करून आणि कुळदैवताना नवस बोलून त्याच्या आईची टाळयाला लागलेली जीभ टप्कन् खाली पडली. सदाशिवरावभाऊनी सत्यनारायण करून समस्त देवताच्या आरत्या करून टाकल्या. टाळया वाजवून वाजवून पक्तीला बसणाऱ्या मडळींची भूक शतपटीनी वाढली.

नतर बरेच दिवस ब्रह्मनाळकराच्या कक्षेतल्या दहा-पाच कुटुबात आपल बाळ प्रथम कस बोलल, सुन्यान पहिल्यादाच 'राम' कसा म्हटला; त्याच्यावेळी दिवस गेले असताना रामाची मूर्त आपण वारवार कशी पूजत असू, आपल्या पोटी रामाचा प्रसाद कसा जन्माला आला आहे; याची रसभरीत वर्णनं वरणभात भुरकल्यागत आजकालच्या विविधभारती सारखी ऐकू येत होती.

पार्वतीकाकूच्या खाती सुन्यान पहिल्यादा राम म्हटला होता. पण खरी गोष्ट अशी होती – परसदारी पतग उडवणाऱ्या पोराचा घोळका जमला असताना हा 'समाजप्रिय' प्राणी कडेच्या गटारात यथेच्छ डुबत होता. एका मोठ्या पोरानं त्याला पाह्यलं. त्याला वर काढता काढता त्यान 'च्या आयला' म्हटल. बटण दाबल्यावर दिवा लागावा तितक्या चटकन् सुन्यान 'च्या आयला' म्हटल. सुन्यानं पहिल्यादा जीभ उचलली ती कथा अशी होती. त्याला वर काढणारं पोरगं उधळलेल्या घोड्यागत ब्रह्मनाळकरांच्या घरात ओरडत घुसलं, – 'पार्वती काऽऽकू, .. पार्वतीऽऽकाऽऽकूऽऽऽऽऽऽ सुरेश, सुऽऽरेश,' एवढच तो बोलला. बिचारी पार्वती-काकू, टच्कन् डोळ्यात पाणी भरलन. धावणाऱ्या पोराच्या बकोटीला धरून म्हणाली, 'चाडाळा कायऽऽरेऽऽऽ झाल ? फुसफुस काय करतोस ? आहे कुठं तोऽऽ ?' त्या पोराचा दम काही खाली आला नव्हता. काकू त्यानं दाखवलेल्या दिशेन तीरासारखी धावली. गटारातल्या पाण्यात धुळवड खेळलेल्या पोटच्या गोळ्याला नळावरून धुऊन आणेपर्यंत पहिल्या स्वारीची छाती-पोट मूळ स्थितीत आली होती. सुन्याला ओलेता आत घेऊन येत काकू म्हणाली, 'रांडल्योका, लक्ष तरी ठेवायचा होतास जरा.'

'काकू, सुरेश बोल्ला' त्या पोराच तोंड उचकटलं.

'आँ, अरे काय, काय ? काय म्हन्तोस काय ? काय म्हणाला रेऽ ?'

त्या पोराची कुचवणा झाली. मनातल्या मनात त्यान एकवार, 'च्या आयला' म्हणून घेतल, पण प्रभू रामचद्र त्याचाही मदतीला धावले, 'राम म्हणाला.'

'खरच रे ?' भिवया भागाला भिडवत काकू म्हणाली, 'अय्या खरच का रे राम म्हणाला ?'

'हो'

'थांब हो, म्हण, म्हग बिच्चू राम म्हण,' असं काकूनं पाच दहा वेळा सुन्याला हॅमरिंग केल्यावर बिच्चूची जीभ विंचू चावल्यागत राम म्हणती झाली. त्यावेळेपासून वर सांगितलेली कथा प्रचारात आली. (परंतु सत्यशोधन ही माझी प्रवृत्ती ! शिवा:य सत्य जनतेसमोर यायलाच हव).

सुन्याच्या तोंडून पिंजऱ्यातून उदीर बाहेर पडावा तशी पहिली प्रातिनिधिक शिवी बाहेर पडली. त्यावेळेपासून तो काया-वाचा-मनेकरून प्रातिनिधिक वर्ततो आहे.

सुन्याच्या संगतीत येणार प्रत्येक माणूस पण या वेडानं पछाडत असाव. त्याच्या किशोरावस्थेतली ही कथा. एक दिवस काकूनं कासारणीकडन बांगड्या भरून घेतल्या. बांगड्या भरून झाल्यावर त्या बाईन, 'ए माझ्या मुला बाईच पाटी उचलू लाग की,' अशी सुन्याला विनवणी केली. सुन्याचा हात पुढे झाला. पण गम्मत काय झाली, बाईच्या आणि सुन्याच्या उचलण्याच्या वेगाच प्रमाण थोड व्यस्त पडल. सुन्याचा हात हवेतच राहिला. बाईच्या हातून पाटी निसटली आणि ब्रह्मनाळकराच्या ओटीवर फुटक्या बांगड्याचा खच पडला. एकूण एक बांगडीचा चुराडा झालेला बघून कासारणीन जो गळा काढला त्यामुळ पानिपतात लक्ष बांगडी फुटल्यावर काय आकांत उसळला असेल याच प्रातिनिधिक प्रात्यक्षिकच घडल. [सुन्याची लहान बहीण मात्र आता खेळायला पुष्कळ काचा झाल्या म्हणून जिन्यातल्या पायरीवर खूष होऊन नाचत होती.]

सध्याकाळी भाऊ परतल्यावर पचवीस रुपये तोंडावर टिकवल्यावर ती बाई परतली आणि सदाशिवराव भाऊनी दिल्लीच तख्त कस फोडलं असेल याचही प्रात्यक्षिक समस्त कुटुंबियांना पाहायला मिळाल. तख्ताची प्रातिनिधिक भूमिका अर्थात सुरेशची होती.

सुन्याला समजायला लागल तस हे प्रातिनिधिकपणाच खूळ बळावत चालल. प्रातिनिधिकपणाच हे खूळ हायस्कूलच्या 'त्या' वर्षीच्या गॅदरिंगपासून तर त्याच्या मुळातच हलक्या असणाऱ्या डोक्यात पक्क भिनलं. गॅदरिंगच्या अध्यक्षांनी आपल्या भाषणाच्या ओघात, 'स्वत:ची प्रत्येक कृती प्रातिनिधिक असली पाहिजे याकडे विद्यार्थीदशेपासून तुम्ही लक्ष द्या' अस आवाहन केल होतं. खरं सांगायच तर, आम्हाला त्यातल अक्षरसुद्धा समजल नव्हत, पण सुन्यानं ते भाषण विशेषत: वर दिलेलं वाक्य प्रातिनिधिक म्हणून उचलल.

ब्रह्मनाळकरांना या प्रकारची खोडच असावी. त्याच्या घराच्या चौकटीला आणि कोपऱ्याकोपऱ्याला सुभाषिताची आणि वचनाची एम्ब्रॉयडरी केलेली होती. त्याच्या घरात शिरल्याबरोबर माजघरात जाण्याच्या चौकटीवर, 'दोन परस्पर विरोधी जीवाची गाठ घालण्यातच दैवाला मजा वाटत असते' असं लिहलं होतं. डाव्या

हाताला जिन्याची चौकट होती तीवर 'भद्र सूकर गच्छ त्वम्' हे सुभाषित काळ्या शाईनं सुवाच्य अक्षरात कागदावर लिहून पुठ्ठ्यावर चिकटवून लटकवलं होतं. पूर्व, पश्चिम, ईशान्य, नैऋत्य वगैरे दिशादर्शक पत्रकं दिशेबरहुकूम लावली होती. देव्हाऱ्याच्या चौकटीवर 'श्रीराम जयराम जयजयराम'ची लाल फीत होती. एका बाजूला 'सदा सर्वदा देव सन्निध आहे, कृपाळपणे अल्पधारिष्ट पाहे' हा श्लोक होता. दुसऱ्या बाजूला 'भगवद्गीता किंचित् धीता...'हा श्लोक लिहून, 'भज गोविंद मूढतते,' असं विनवलं होतं. तथापि प्रत्यक्षात एकदा का भाऊ जपाला बसले की एक 'श्रीराम जयराम जयजयरामा'नतर हलकट, भडव्या, शिच्या, रांडेच्यानो वगैरे शिव्या आलटूनपालटून बेडकागत त्यांच्या ओठावर उड्या मारत असत. अस्तु. हे सर्व सागण्याच प्रयोजन इतकच की चांगली वचन, सुभाषित सदैव नजरेसमोर असावीत म्हणून लिहून ठेवण हा त्या घराण्याचा एक गुण होता. या परपरेला साजेस गॅदरिंगच्या अध्यक्षाच प्रातिनिधिक म्हणून वेचलेल वाक्य सुऱ्यानं प्रत्येक पुस्तक आणि वहीच्या पहिल्या पानावर लिहून ठेवलं. त्याबरहुकूम प्रातिनिधिक वर्तणूक व्हावी म्हणून 'दृष्टिपूतं पद न्यस्येत'च्या चालीवर सुऱ्याचं प्रत्येक पाऊल जपून पडू लागलं. [असा त्याचाच दावा आहे.] सुऱ्या कधीही फर्स्ट क्लासमध्ये पास झाला नाही. थर्ड क्लासातच पास व्हायचा पण म्हणायचा कसा, 'बहुसख्याकाच प्रतिनिधित्व करतोय मी.'

बहुसख्याक, अल्पसख्यांक, यूनो, शिखर परिषद वगैरे शब्द सुऱ्याला आमच्या-पेक्षा लवकर ठाऊक झाले होते. भाऊचा पेशा वकिलीचा. शब्दच्छल हा त्याचा व्यावसायिक गुणधर्म; शिवाय येणाऱ्या जाणाऱ्याची भाषा ऐकून त्यातली उचले-गिरी करायचा.

एक दिवस वर्गात इंग्रजीचे मास्तर यूनोची माहिती देत होते. किरकोळ माहिती देऊन झाल्यावर त्यानी, 'Followed,' (समजल का ?) अस विद्यार्थ्यांना उद्देशून म्हटलं. तर सुऱ्यानं उभ राहून, 'सर, यू नो नथिंग अबाऊट यूनो' असा बॉम्ब टाकला. बनहट्टी मास्तर लालबुद झाले. ऋुश्चोव्हसारखा जोडाच काढणार होते पण डस्टर हातात होता तोच त्याच्या दिशेन भिरकावला. त्याचा नेम चुकून फडणीसचं कपाळ फुटल. अक्षरशः वादग्रस्त प्रश्नावर आमसभेत खडाजगी कशी होत असेल याची चुणूक छात्रवर्गाला दिसली. सभात्याग केल्यासारखे बनहट्टी मास्तर वर्गातून ताड्ताड् चालते झाले. फडणीसच्या कपाळावरचं टेंगूळ एव्हाना दडातल्या गोटी-सारखे वर आलं होत.

मधल्या सुट्टीत सर्व विद्यार्थ्यांसमोर सुऱ्यान सरांची माफी मागावी अशी मागणी जोरानं पुढं आली. सर्व शिक्षकवर्ग व विद्यार्थी समूह मधल्या चौकात एकत्र झाला. बनहट्टी मास्तरानी स्वतःची बाजू समर्थपणे मांडली. सुऱ्याला स्टेजवर बाजूला बसवलं होतं. त्याला पुढं करण्यात आलं. बिचाऱ्याला काय झाल होतं ते अजूनी



**कसलं प्रेम आणि प्रेमभंग ! उगीच स्वप्नरंजन करू नको...**

समजलं नव्हतं. हेड मास्तरांकडे कारुण्यपूर्ण भावाने पहात स्फुंदत तो म्हणाला, ' सर, काल आमचे भाऊ कोणाला तरी जे म्हणाले तेच मी म्हणालो. यापुढं मी काही विचारणार नाही. मला समजलं नव्हतं म्हणून उभा राहिलो. यापुढं असं करणार नाही. ' एवढं बोलायला त्याला दहा मिनिटं लागली.

हेडमास्तरांनी त्याला कुरवाळत म्हटलं, ' ठीक आहे. तू इंग्रजी बोलायचा प्रयत्न केलास, उत्तम. दुसऱ्याचं ऐकून केलेला बोलण्याचा हा प्रयत्न खचितच छान आहे. तुझं इंग्रजी लवकर सुधारेल. जा. रडू नको. ' मग सर्व विद्यार्थ्यांना उद्देशून सरांनी ' फॉरिन लँग्वेज् ' आत्मसात करण्यासाठी त्याच्यासारखं प्रयत्नशील राहण्यास बजावलं आणि बनहट्टी मास्तरांनी इतक्या ' इमिजिएट स्टेप्स ' घ्यायला नको

होत्या विद्यार्थ्यांच्या प्रगतीत त्यामुळे धोंड निर्माण होते अस सर्वांसमक्ष बजावल. बिच्चारे बनहट्टी मास्तर ! !

सुन्या टायपिंग घेऊन मॅट्रिक झाला. टायपिंग घेण्यात एका विषयाच पुस्तक नजरेखालून टाळण्याचा त्याचा उद्देश होता. हाताच्या बोटानी सरावान टाईपराय-टर बडवता येतो, अशी त्याची अटकळ होती. कारण भाऊंनी आणि गुरुजनानी त्याला बडवून एकदा विषय त्याच्या खोपडीत शिरत नसे. टायपिंग घेऊन मॅट्रिक झाल्यान पुढील शिक्षणाबद्दलची बातच नव्हती. लवकरच पुण्यात भाऊच्या एका मित्राच्या रिकाम्या खोलीत सुन्याच स्थलांतर झालं. सरकारी खात्यात भाऊनी त्याना L. D. C. म्हणून चिटकवला

' आजकाल कितीजण कालेजच शिक्षण घेऊ शकतात ? निष्कारण वडलांवर भार टाकण आपल्याला नाही बुवा पसत. देवान चागली एक नाही दहा बोटं दिलीत कशाला ? त्याचा उपयोग करा. स्वतःच्या पायावर उभ राहा. बोट हलवा, पोट भरा. ' अस तो समस्त तरुण पिढीस मनातल्या मनात आणि फक्त माझ्या-पाशी उघड आवाहन करीत असे. या आवाहनाशी सुसगत वर्तन असावे, आपलं जीवन हे प्रातिनिधिक आहे. कारण बहुसख्य मध्यमवर्गीय बुद्धिजीवी, पाढरपेशा वर्ग हा क्लार्क या सज्ञेस पात्र असतो, तस्मात् मी ही नोकरी पत्करण्यात केवढं समर्पण केलं आहे, याची तो महादेवाच्या पिंडीवर सतत धार धरावी तशी समर्थनं करीत असे.

सुन्याच्या पुण्यातील वास्तव्याचा मला फार फायदा झाला. शिक्षण संपवून नोकरीच्या शोधार्थ मी पुण्यात आलो. नोकरी मिळून पाचसात महिने झाले तरी त्याच्याच खोलीवर होतो. माझ्या आगमनाप्रीत्यर्थ त्यान दोन किल्ल्याच कुलूप आणून एक किल्ली मला देऊन ठेवली. माझ्या रूपान त्याच्या जीवनात अक्षरशः वसत आला होता. महिन्याभराच्या अवधीत त्यान पुण्यातल यच्चयावत थेटर मला दाखवल होत. सकाळी ऑफीसला जाताना तो मला सागायचा, ' वश्या, लेका तुझी व्हिजीट झाली की तिकीट काढ डेक्कनची. मी करेक्ट ५-४० ला P. C. H. ला येतो. [ P C. H. = पूना कॉफी हाऊस. ] त्याच्या खोलीत ट्रॅंझिस्टर होता. मनसोक्त ऐकायचा. तो ऑफीसमधून परतताना लायब्ररीतून एका ऐवजी दोन पुस्तक आणू लागला. मला वाचायचा खर कटाळा. पण सुन्याच्या बाष्कळ समर्थना-पेक्षा पुस्तक बर वाटायची.

' हे बघ, हल्लीच्या तरुण वर्गाच प्रतिनिधित्व करायच म्हणजे चेष्टा नव्हे ! पूर्वीच्या माणसाना भरपूर वेळ होता. वेळ घालवावा कसा, हा प्रश्न असायचा त्यांना. म्हणून त्यानी अशी तशी बधन घालून घेतली. ते आता कसं शक्य आहे मिस्टर ? ' हातातल्या सिगारेटची राख अगठ्यान झाडत, डोळे खालीवर करीत तो म्हणायचा, ' सगळ विसरलं पाहिजे ते! Time is money ! माणूस चद्रावर

चाललाय, पृथ्वीच्या गाभ्यात पोचलाय. आणि तुम्ही ? (इथं क्षणैक पॉज !) अस्तित्वात नसलेल्या गोष्टी काय कवटाळता ? कृती का नाही ?' इथं सुन्या अगदी पीकला पोचलेला असतो. खोलीत अधार पडत असतो. खसकन एक काडी ओढून, 'तमसो मा ज्योतिर्गमय,' [खर म्हणजे ओठात सिगरेट असल्यानं 'टॅम समा ओति...गोमय' असा काहीसा उच्चार होतो.] सिगरेट शिलगावतो आणि दिवा दाबतो. [म्हणजे बटण दाबतो आणि दिवा लावतो.] 'Yon must be active' वगैरे वगैरे...

हॉटेलात सर्रास जाणं, सिगारेट ओढणं वगैरे मला प्रथम गैर वाटायचं. त्यामुळ मी मागासलेला आहे असा ठपका सुन्यान ठेवला होता.

'वश्या, लेका सुधार की जरा ! उद्या काय जाभळी टोपी घालून ऑफीसला जाणार आहेस ?' मी, त्याच्या अशा वाक्यानी गारद व्हायचा. सुन्या खरच सुधारला होता. तो सिगारेट ओढत असे. त्याच्या खोलीत ट्रॅन्झिस्टर होता. पावडर, स्नो, दाढीच सामान त्याचं स्वतःच होत. प्रतिदिनी त्याच्या खोलीत केसरी येऊन पडायचा. वाचनालयातून आणलेल्या कादबऱ्या वाचून त्यावर स्वतःचे शेरे पहिल्या वा शेवटच्या पानावर लिही. चागली वाटणारी वाक्यच काय, पण परिच्छेद, स्वतःच्या वहीत टिपे. अभ्यासाचं पुस्तक डोळयाआडून घालणारा हा प्राणी कादंबऱ्या आणि मासिक रात्री दोन-दोन वाजेपर्यंत जागून संपवत असे. त्याच्यातलं हे समूळ परिवर्तन पाहून तो सुधारल्याची माझी बालवाल खात्री झाली होती. शिवाय दरमहा स्वकष्टाच्या दीडशे रौप्य मुद्रिका कमवत असल्यानं माझ्या हिशोबी त्याच्यामाग फक्त तेजोवलयच काय ते नव्हत ! त्याच्या दीडशे रौप्य मुद्रिका सहस्रार्जुनाच्या हातासारख्या त्याच्याभोवती मला दिसत असत. मला, आपण खरोखरच मागासलेले आहोत याची खत, दातात अडकलेल्या काडीसारखी बेचैन करीत असे.

'तू सुधार,' या त्याच्या वारवार केलेल्या आवाहनावरून सुधारण्याची प्रातिनिधिक दीक्षा म्हणून त्याच्या पाकिटातली सिगारेट मी प्रथम ओढली. तेव्हापासून 'श्वेत-पत्रिकेचे' माझे नाते अतूट होऊन राह्यलयं. [उपकारकर्त्याची जाण असावी !]

कथा, कादंबऱ्या वाचण्याचा त्याचा वेग अफाट आहे. फडक्याच्या कादबऱ्या व त्यांची नामावली त्याच्या जिभेवर आहे. कमलाबाई फडक्याचा 'रानवारा' त्याच्या ओठावर शीळ घालत असतो. मध्यंतरी, आयुष्यात कादबऱ्यातल्या नायकासारखा एकादाही प्रसंग आजतागायत आपल्या वाट्याला येऊ नये याचा त्याला मनापासून विषाद वाटू लागला होता. 'थ्रील पाह्यजे ! – काय वर्णन आहे ! – हाय ! – प्रणयाराधन – गुलाबी झोप वगैरे शब्द त्याच्या ओठावर गोगाट करीत. त्याच्या बोलण्याचा वेगसुद्धा अति प्रचंड आहे. रस्त्यानं जाणाऱ्या

हरएक मुलीवर याची कॉमेंट्री चालूच असायची, त्याला दटावलं, तर म्हणायचा 'लेका, माणूस आहेस का कोण ? ज्या वयात जे बोलायचं तेच बोलावं. आता काय ज्ञानेश्वरी आणि भागवत सांगू तुला ? ती बघ. बघ. बघ. काय टॉप टाकलीय' एका सायकलवरून सरकत्या युवतीकडे बघून घायाळ होत्साता. मी न ऐकलेले बरेच शब्द सुन्याच्या तोंडी, मत्सालयाच्या पेटीत मासे फिरतात तसे फिरायचे. माझं अज्ञान पाहून त्याला कीव यायची. 'आजकालच्या तरुण वर्गाचं कन्व्हेंशब आहे म्हटल वस्या हे ! यू आर नॉट यङ् मॅचुअर्ड ! हाय् ऽ ऽ क्या शबाब ? मेरे मेहबूब !' सुन्याने नवा चेहरा न्याहळला असायचा.

सडसडीत बांध्याच्या, पावणे सहा फूट उंचीच्या, नाकाच्या रेखीव घाट असलेल्या सुन्याच्या मस्तकावर केसाचा सुमारे दोन इंच जाडीचा थर चापून चोपून बसवलेला असतो. सुन्याचे डोळे किंचित् घारेपणाकडे झुकले आहेत, वर्ण गौर आहे. हाताची बोटं लांबसडक आहेत, त्यांचा त्याला फार अभिमान आहे, कधीकाळी याच बोटातून काहीतरी अजरामर कलाकृती निर्माण होणार यात्राबत तो इतरांना सांगत असतो. बोटांना तो फार जपत असे. नव्हे, असतो ! मी त्याला म्हणायचा, 'लेका, तुझा काय शास्त्राखान थोडाच होणार आहे ?' तर गंभीर होऊन तो उत्तरायचा, 'हो. शास्त्राखानाचं प्राणाचं बोटावर निभावलं. मला पण माझे पण बोटावरच निभवायचे आहे बाबा. नुसत्या क्रॅरमच्या बॉर्डरची सडी जावून बोट दोन दिवस सुजलं होतं, तर कॅजुअल टाकावी लागली, महाशय !' सुन्याला अंगुली मात्राविण तरणो-पाय नाही याची नम्र जाणीव होती.

मध्यंतरी तीन-चार महिने सुन्या एकदम भूमिगत झाला. मी त्याच्या खोलीत तासन्तास जाऊन पडायचा पण स्वारीचा काही पत्ता नसायचा. एक दोनदा भेटला तेव्हा मी त्याच्यावर वैतागलो. तर मला म्हणाला कसा, 'हे बघ, तू निष्कारण वेळ घालवू नको. तूर्त मला ऑफीसमध्ये बराच वेळ थांबावं लागतं. साहेब रजेवर गेलायं. सगळा कॉरस्पॉन्डन्स वगैरे मलाच पहावा लागतो. एकदा या झंझटीतून सुटलो की तुला फोन करतो.

मी त्याच्यापुढं सिगारेट केली. 'मी सिगारेट सोडली आहे. कामाच्या रगाड्यात लक्षातसुद्धा येत नाही रे ?'

मला अक्षरशः भोवळ आली. सुन्यानं सिगारेट सोडणं म्हणजे कॉंग्रेसनं स्वतःहून सत्ता सोडण्यासारखं होतं.

अखेर एक दिवस मला त्याचा फोन आला.

'हॅलो, कोण वसंतराव का ?' (फक्त फोनवरचं संबोधन.) त्याचा आवाज किंचित कापरा वाटला,

'संध्याकाळी खोलीवर येशील ?'

'का रे, बरं वाटतंय ना ?'

'हो, तू ये. येच. मगच सांगतो काय ते. आँ ? शुअर ?' फोन बंद झाला.

संध्याकाळी त्याच्या खोलीवर गेलो. त्याचा अवतार बघून मी त्याच्या अंगाला हात लावत विचारलं, 'डॉक्टर बोलवू का ?'

'ऊऽऽहूं ! तुम्ही ने दर्द दिया, तुम्ही दवा देना ! आऽऽई' कण्हत सुन्या बरळला.

'ए लेका, काय होतंय ते नीट सांग. मी कसली दवा देऊ तुला. फार तर चहा देतो गुडलक्चा. चल उठ.'

'तुला नाही म्हटलं मी.' कातावून सुन्या खेकसला.

'मग कोणाला ?'

'शैला पित्रे ! हाय ! फसलो. फसलो. वश्या, साफ बुडालो. एका य.कश्चित् टी. ओ. कडून फसलो रे. ( टी. ओ.–टेलीफोन ऑपरेटर ) यहाँ बदला वफाका बेवफाईके सिवा क्या है ?' सुन्यानं आपलं मुखमंडल झाकून घेतलं. खदखदणाऱ्या पिठल्यासारखा तो गदगदायला लागला.

मी समजलो. त्याचा कॉरस्पॉडन्सचा बहाणा माझ्या लक्षात आला. पत्रव्यवहार संभाळायचा नसून पात्रव्यवहार होता तर !

'जिच्यासाठी सिगारेट, पान, वेलदोडा, लवंग सगळं सोडलं, ऑफीस सुटल्यावर रोज संध्याकाळी टॅक्सीतून बंडगार्डनवर जाऊन प्रणयाचे रंग उधळले, आणा–भाका दिल्या घेतल्या. सारं सारं कसं धूसर झालय. शैला ! शैला ऽऽ बंड्वरची प्रत्येक संध्याकाळ का तू विसरलीस ? माझ्याशी असं बंड करून तू काय साधलस ? या दारुण दुःखसागरात लोटण्यापेक्षा बंड्वरच्या पाण्यातच का नाही ढकललस ?' सुन्या इथं अगदी वाहवला होता. आपल्या वाटयाला यावीशी वाटणारी भूमिका त्याच्या वाटयाला आली होती. थ्रील् आल होतं. पण आज तो त्या मनःस्थितीत नव्हता. नाईट ड्रेसमध्ये तो पडवळासारखा दिसत होता. ते पडवळ प्रेमभंगाच्या वेळीवर चिरलं जात होतं.

'कसलं प्रेम आणि प्रेमभंग घेऊन बसलायस. उगाच स्वप्नरंजन करून घेऊ नये माणसानं. उगाच कुठल्याशा कादंबरीकाराच्या शैलीचे लचके तोडू नको.'

'शैली ? !!. नको, नको, तो उच्चारसुद्धा इतःपर माझ्या कर्णयुगुलांना साहवत नाही. वश्या, जखमेवर मीठ नको चोळू.' पडवळ बसल होत. माझ्या खांद्यावर हात टाकून ते पुन्हा म्हणालं, 'यू आर् नॉट यट् मॅचुअर्ड. तुला नाही समजायच त्यातलं. कागदावर रेघोटयांचे इमले बांधणारे तुम्ही ! मंदोर गिरता फिर बन जाता, दिलको कौन संभाले ?' सुन्यानं देहाची नैया पलंगावर झोकून दिली.

शैलाशी झालेल्या प्रेमभंगाचं शल्य सुन्याला नंतर बरेच दिवस बोचत होतं. एक दिवस भाऊचं पत्र आलं. पत्र वाचता वाचताच एकदम सुन्या किंचाळला, 'बघ, स्वजनसुद्धा कसे वैऱ्यागत झालेत ? वाच, वाच हे पत्र.'

भाऊनी लिहिलं होत–'आमचा उभयताचा 'श्रीशैलाची' यात्रा करण्याचा

मानस आहे. तेव्हा सध्या रोज वर्तमानपत्रातून येणाऱ्या यात्रा कंपनीच्या जाहीरातीसबंधी सविस्तर वृत्त कळव.' माझ्या हातून ते पत्र हिसकावून त्याला सुन्यान काडी लावली. त्याच काडीन सिगारेट शिलगावली.

'हा काय बालीशपणा लेका सुन्या?' मी. रुष्ट सुन्याची नजर घुरकटली होती.

भाऊना हवी असलेली माहिती शेवटी मीच पुरवली.

श्रीशैलाहून परतताना भाऊ आणि काकू चार दिवस पुण्यात थांवले. एक दिवस सध्याकाळी पर्वतीला जाता जाता सुन्याच्या लग्नाचा प्रस्ताव माडला. (काकू पर्वती चढवायची नाही म्हणून आली नव्हती.)

'छान! छान! भाऊ तुमची ही कल्पना आपल्याला एकदम पसंत आहे.' मी उत्साहाच्या भरात म्हणालो. मला उगीचच गुदगुल्या झाल्या.

'दोन-तीन वर्षं थाबलं तर चालायचं का नाही भाऊ? खरं, माझ्या मते लग्न करू नये असच आहे आणि करायचच म्हटल तर अन्य सर्व गोष्टींची जागा वगैरेची नीट व्यवस्था लावूनच कराव नाही का?' गभीर होऊन सुन्यानं तीर्थरुपांपाशी दिल खोलल.

'हे बघ, सध्याचं तुमचं वय लक्षात घेता माझा विचार पक्का आहे. गद्धे पचविशीतली पोरं तुम्ही. अरे या वयात काहीही चागलच दिसतं. गाढवीणसुद्धा!' भाऊच्या तोंडी अशी भाषा ऐकण्याची मला सवय होती.

'नाही, भाऊ, मला लग्न करायच नाही. ब्रह्मनाळकरांचा वंश खंडीत झालेला मला चालेल. समस्त स्त्रीजातीवद्दल मला कमालीचा तिरस्कार निर्माण झालाय. कृतघ्न! स्वार्थी!' शेवटचे दोन्ही शब्द सुन्याच्या ओठावर रेंगाळले. ऐकू आले नाहीत.

'हेच ते. नको तसल्या भरकटल्या विचाराना थारा देता आणि माथी भडकवून घेता. वश खडीत झालेला तुला चालेल, मला नाही चालायचा, समजलं. जास्त काही वचवच करायची नाही. सागेन तेव्हा रजा काढायची आणि बोहल्यावर उभ राहायच, आल का लक्षात? मूर्ख लेकाचे!' आरोपीला पिंजऱ्यात उभं राहायला सांगावं अशा अधिकारवाणीनं भाऊनी सुन्याच्या हातात लग्नाची बेडी अडकवायचा आपला मनसुवा जाहीर करून टाकला. दुसरेच दिवशी भाऊ आणि काकू गाडीत बसले.

खरं तर सुन्याला भाऊच्या या प्रस्तावान मनातून खूष करून टाकल होतं. शैला ही त्याच्या आयुष्यात आलेली पहिली मुलगी होती. सबंध स्त्रीजमातीची प्रतिनिधी! सुन्यानं मारे स्त्री जातीवद्दलच्या तिरस्काराची भावना भाऊपाशी व्यक्तवली होती; पण तो तिरस्कार फक्त त्या प्रतिनिधी पुरताच मर्यादित, एवंच प्रातिनिधिक होता हे मी ताडल होत.

सहा महिन्यापूर्वीच सुन्याच्या हाताच्या बोटात एका दशकाची भर पडली, लग्नात

मी आणि शाम्या, दोघही त्याचे बालमित्र हजर होतो. सुन्यान बायकोपाशो आमची उभयताची खूप स्तुती केली.

सुन्यानं बायकोच नाव ' सुविधा ' ठेवल. तादळात आगठीन कोरून त्यान नावाचा उच्चार केला तेव्हा पार्वतीकाकू एकदम नाराज झाली. तिच्या मते सरस्वती हेच नाव सुनेस शोभून दिसत होतं. पण आता इलाज नव्हता; ' मी आपल सरस्वतीच म्हणत जाईन.' अशी तिन जाहीर घोषणा माडवातच करून टाकली.

सुन्याच्या लग्नाच सूप वाजल. त्याची चागली महिनाभर रजा होती. त्याना मधुचद्रासाठी गाडीत बसवून देऊन मीपण परतलो. ' वेळ झाला तर पत्र टाक.' असं चेष्टेन त्याला वजावल होत.

महिन्याभरात त्याच्याकडून पत्र काही आलं नाही. एक दिवस फोनच आला.

' हॅलो, कोण वसतराव का ?'

' हो, हो, केव्हा आला एच्. एम्.'

' कालच आलो रात्री.'

' नुसताच मधु की चद्रही आहे बरोबर ?'

' छे रे, ' सु ' कुठली येते माझ्याबरोबर ! मगळागौर वगैरे आटपूनच पाठवते म्हणाली आई. जाऊ दे ते. सध्याकाळी P. C. H. ला ये यार. महिन्याभरात कसं चुकल्या चुकल्यासारखं वाटत होतं बघ.'

' काय लेका नाटकं करतोस !'

' तू ये रे. बद करतो मी. अच्छा.'

' हॅल्लो, हाउ इज् द मॅरीड लाईफ ?' मी त्याच्या पाठीवर थाप मारीत विचारलं. डेक्कनच्या चौकात सिगारेट ओढत माझी वाट पाहात उभा राहलेला सुन्य हेंदकळला.

' ह, विवाहिनाची दु ख तुला नाही समजायची !' सुन्या एकदम रुळावर आला, ' क्या यार, कुछ जी नही लगता. पिक्चरला जाऊया चल. त्या दिवशी पिक्चर, जेवण सुन्यान लग्नाप्रीत्यर्थ दिल.

आज ऑफीसमध्ये पोचतो न पोचतो तोच सुरेशपताचा फोन.

' हॅलो, वश्या का ? बघ, आज संध्याकाळी ' सु ' साडेपाच वाजता येते आहे. पण साडेचारलाच एका कॉन्फरन्ससाठी मला आमच्या ऑफिसचा प्रतिनिधी म्हणून जावं लागतय. प्लीज ' सु ' ला रिसीव्ह करून घरी पोचतं कर. सात वाजेपर्यंत मी येतोच म्हणून साग. प्लीज.'

मी भयंकर वैतागलो, ' अहो प्रतिनिधी, कॉन्फरन्स गेली खड्डयात. लेका वैनी काय म्हणतील ?'

' अरे लेका वश्या, तिच्याबरोबर आईपण आहे. ससार माडायला येतीय. हे बघ माझ्यासमोर कामाचा ढीग पडलाय. प्लीज माझ काम करायच हा दोस्त.' माझ्या निर्णयाची वाट न पाहता त्यान फोन बद केला.

संध्याकाळी मी स्टेशनवर गेलो. काकू आणि तिची स्नुषा दोघींनी मला पाहून चेहरे विचित्र केले. मी त्वरित खुलासा करून टाकला. त्यामुळं दोघींना अनुक्रमे मुलगा व नवरा सरकारी कामात गुतल्याचे ऐकून मठभर मास चढले.

दोघींचे चेहरे उजळले.

'काकू अग उतर की गाडीतून.'

'अरे हो. सामान बघ हो नीट. बरंच आहे. सरस्वते, जपून उतर बरं का ?' पार्वतीकाकूनं सुनेला बजावत आपल्या देहाला गती दिली.

सुन्याची 'सु' मला बरीच सुस्त वाटली. दोघी खाली उतरल्या. मी सामान उतरवून घेतल.

'काय वैनी प्रथम चहा घ्यायचा का ?' माझ्या स्वागतानं वहिनी खूश झाल्या.

'हो रे बाबाऽऽ अगदी शीण झालाय प्रवासानं.' काकूनं चहा करायला दिलेला होता.

प्लॅटफॉर्मवरच्या नळावरच पाणी दोघींनी चेहऱ्याला लावलं. प्लॅटफॉर्मवरच्याच हातगाडीवरला चहा त्यांना पाजला. दोघींना तरतरी आली. हमालाच्या डोक्यावर सामान चढवून आम्ही दादरा चढायला लागलो. माझ्या डोक्यात काहीतरी चमकत. वहिनींची चालच मला सांगत होती. माझ्या डोळ्यादेखत वझुराळकरांची दुसरी पिढी जन्माला येऊ घातली होती. त्याचं प्रातिनिधिक लक्षणही माझ्या नजरेतून सुटल नाही.

दोघींना मी घरी पोचवलं. कपडे बदलून येतो म्हणून मी तेथून सटकलो. खोलीत येऊन किचित् विसावलो तेवढ्यात सुन्याची हाक कानावर पडली. दरवाजा उघडत मी त्याला म्हटल, 'या, या, प्रतिनिधी.

माझ्या उपहासाकडं त्याच लक्षच नव्हतं.

'हे बघ, रात्री जेवायला माझ्याकडच ये असं आईनं सांगायला सांगितलं म्हणून आलोय.'

'मी येणार होतो की लेका कपडे बदलून.' थांबायचं होतंस घरीच. वहिनींशी मुलाखत घ्यायची होतीस. हसून मी म्हटलं.

'हूं' सुन्यान हुकार भरला.

'अस्सं. काँग्रेसचे प्रतिनिधी.' मी त्याच्याकडे हात करीत म्हटलं, 'या पुढं नुसते प्रतिनिधी नाही, पंतप्रतिनिधी होणार तुम्ही. अभिनंदन !'

'ये बर का लवकर. आजचा खाडा टाक अण्णाकडं.' सुन्या कोपऱ्यापर्यंत पोचला आहे. 'सु' च्या आगमनानं सुसाट वाऱ्यासारखा तो धावतो आहे. 'हं! प्रतिनिधी !!' मी मात्र आपलं खानावळीतलं जेवण—एक वेळ अण्णा चुकला म्हणून खूष होतो !

□ □ □

पुस्तके

वि. शं. पारगावकर

महाभारतातील
उत्तुंग
जीवनाचे
दर्शन

# कादंबरीमय महाभारत

२ मे १९७०

दोन दशकांपूर्वी मराठी कादंबरीने आपले रूप बदलावयास सुरुवात केली. तंत्राच्या एका ठरादिक साचातून आणि विषयाचे ठरादिक टप्पे ओलांडीतच पूर्वी हा प्रवास चालू होता. अशा या ळलेल्या प्रवाहाला वेगळे वळण नाही तरी नवे चैतन्य प्रथम दिले ते श्री. ना. पेंडसे आणि गो. नी. दांडेकर यांनी. 'गारंबीचा बापू' आणि 'शितू,' या कादंबरीतील नव्या चैतन्याच्या पहिल्या खुणा आहेत. दोन दशकांपूर्वी कादंबरीने घेतलेल्या या रूपाकडे तेव्हाच नवा वाचकवर्ग आणि नवा टीकाकार आकर्षित झाला होता.

कथालेखक गंगाधर गाडगीळ यांनी तेव्हा नव्यानेच जी वाङ्मयीन रसग्रहणे लिहिली त्यामध्ये 'हर्णेचा दीपस्तंप' हा पेंडसे यांच्या गारंबीच्या बापूवरील रसग्रहणात्मक लेख तेव्हा खूपच गाजला होता. मराठी कथेच्या रूपाला इतिहासात नवे स्थान मिळवून देणाऱ्या गाडगीळ यांना त्यांच्याच समकालीनावर लिहावेसे वाटले, उत्स्फूर्ततेने वाटले यातच पेंडसे यांनी मिळविलेल्या यशाचे रहस्य आहे असे मला वाटते. दुसऱ्या एका दृष्टीने पेंडसे यांच्या कादंबरीवर गाडगीळांनी लिहिले त्याला महत्त्व आहे. कारण गाडगीळ हे प्रथमतः ललित लेखक होत. तेही नवनिर्मितीत सर्वप्रथम असलेले नवकथा लेखक आहेत. म्हणून नवसाहित्यविषयक विचार व्यक्त करू पाहणारा त्यांचा दृष्टिकोण येथे महत्त्वाचा मानला पाहिजे. अशा रीतीने येथून कादंबरी लेखनाचा मराठी साहित्यात एक नवा टप्पाच आखला गेला.

—आणि तेव्हापासून मराठी कादंबरी ही जीवनाच्या नव्या नव्या क्षेत्रात अवगाहन करू लागली. ठराविक नीतिमूल्ये, ठराविक जीवनमूल्ये आणि ठराविक सौंदर्यमूल्ये यांच्या तोकड्या भांडवलावर आणि अनुभवविश्वावर तृप्त असणारी

मराठी कादबरी बदलली. हळूहळू तिने आपला रंग बदलला, आपले रूप बदलले, आपला आकार बदलला आणि आपल्या प्रतिज्ञाही बदलल्या. पेंडसे यांनी ' गारबीच्या बापू 'पासून आपला प्रवास सुरू केला आणि त्यानी ' रथचक्र ' आणि ' लव्हाळी ' अशा वैशिष्टचपूर्ण कादबऱ्या लिहिल्या. तसेच दांडेकरानी ' शितू 'पासून प्रवास सुरू केला आणि ' माचीवरला बुधा ' आणि ' कोणा एकाची भ्रमणगाथा ' सारख्या लक्ष्यवेधी कादबऱ्या लिहिल्या. नतर ' कोसला 'सारखी मराठीला अगदी नवीन अशी प्रयोगक्षम कादबरी प्रसिद्ध झाली. चि त्र्य. खानोलकराच्या ' रात्र काळी घागर काळी ' आणि ' कोडुरा ' प्रसिद्ध झाल्या. भाऊ पाध्ये याची ' बॅरिस्टर अनिरुद्ध धोपेश्वरकर, ' जयवत दळवी याची ' चक्र, ' ' स्वगत, ' या जशा ठराविक साच्याच्या कटाळवाण्या जीवनाची कोंडी फोडून नव्या जीवनाकडे झेपावणाऱ्या कादबऱ्या, गेल्या दशकात निर्माण झाल्या, तशाच आणखी एका जीवनाकडेही नव्या मराठी कादबरीने नव्याने आपली दृष्टी वळविली. त्या जीवनचित्रणात अग्रेसर ठरणारी रणजित देसाई याची ' स्वामी ' आहे.

## कादबरीचा प्रवास

ऐतिहासिक कादबऱ्या पूर्वी लिहिल्या गेल्या होत्या. पुढे जवळजवळ वीस एक वर्षे हा प्रवास थाबला होता. तो नव्या उन्मेशाने रणजित देसाई यांनी हाताळला, आणि मराठी कादबरीला आणखी एक नवा धुमारा फुटला. पुढे ना. स. इनामदार यांनी ऐतिहासिक कादबरीचा हाच धागा पकडला आणि ' झेप, ' ' झुंज, ' ' मत्रा-वेगळा ' सारख्या ऐतिहासिक कादबऱ्या लिहिल्या. त्र्यबकजी डेंगळे यांच्या जीवना-वरील कादबरी सोडली तर इनामदार याचे कादबरीलेखन वादग्रस्त आहे असे माझे मत आहे. शिवाय ऐतिहासिक कादबरीला इतिहासाव्यतिरिक्त लेखकाजवळ आणखी एक निराळा दृष्टिकोण असावा लागतो त्याची इनामदार याच्याजवळ वाण आहे. परतु ऐतिहासिक कादबरीवरील चर्चेचे येथे प्रयोजन नाही. येथे फक्त मराठी कादबरीच्या प्रवासाची एक दिशा एवढ्यापुरतेच निवेदन आवश्यक आहे. जशी ऐतिहासिक कादबरी, तशीच चरित्रात्मक कादबरी हाही एक नवा प्रकार डोळसपणे ' आनदी गोपाळ 'च्या निमित्ताने श्री. ज. जोशी यानी हाताळला. चरित्रात्मक कादबरीप्रमाणेच पौराणिक कादबरी मराठीत लिहिली गेली. ' ययाति ' ही वि. स. खांडेकर यानी लिहिलेली ही पहिली यशस्वी कादंबरी, नंतर शिवाजी सावत याची ' मृत्युंजय ,' आनंद साधले यांची ' महापुरुष ' या पौराणिक कादबऱ्या प्रसिद्ध झाल्या.

—आणि आज नुकतीच माधव कानिटकर याची ' कादंबरीमय महाभारत-खड पहिला ' ही कादबरी प्रसिद्ध झाली आहे. असा हा मराठी कादबरीचा गेल्या दोन दशकातील ठळक धावता इतिहास आहे.

कानिटकर यानी नाव दिले आहे त्यावरून त्याना सर्व महाभारत कादंबरीमय

करावयाचे आहे असे दिसते. आता कादबरीमय महाभारत आणि महाभारतावरील कादबरी या दोन शब्दप्रयोगात भेद आहे तो लक्षात घेतला पाहिजे. 'कादबरीमय महाभारत' असा त्यानी जो आपल्या लेखनाला मथळा निवडला आहे तो तेवढा चपखल वाटत नाही. कादबरीमय म्हणजे काय ? कादबरी आणि कादबरीमय या दोन शब्दाच्या अर्थामध्ये खूप फरक आहे. कर्णाच्या जीवनावरील कादबरी, कृष्णाच्या जीवनावरील कादबरी असे महाभारतामधील व्यक्तीच्या जीवनावर कादबरी लिहिली जाऊ शकते. तशी ती लिहिली गेलीही आहे. परतु सबध महाभारतच कादबरीमय करायचे म्हणजे काय करायचे ? असे करीत असता 'कादबरी' या कलाप्रकाराचे काय व्हायचे ?

## परिणामकारक निवेदन

कानिटकर यानी आपल्या 'कादबरीमय महाभारता'च्या पहिल्या खडासाठी जे कथानक निवडले आहे त्याची सुरुवात शातनु आणि सत्यवती याच्या मिलनापासून केली आहे. त्यानिमित्ताने भीष्माच्या उदात्त जीवनाचे प्रकर्षाने दर्शन या भागात घडते. भीष्म हा शातनूचा मुलगा. सत्यवती ही भीष्माच्या महान त्यागामुळेच शांतनूची पत्नी झाली आणि भीष्माची सापत्न माता झाली. हा प्रसग मूळ महाभारतात अतिशय महत्त्वपूर्ण आहे. कानिटकरानी आपल्या शैलीने तो परिणामकारकपणे रगविण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे. कानिटकराची भाषा महाभारताच्या कथानकाला योग्य अशी जमलेली आहे. कित्येक ठिकाणी मात्र रसभग होतो. उदाहरणार्थ पृष्ठ १६७ वर 'पाडुराजाच काहीतरी मोठच बिनसलं होतं' असे वाक्य येते. तेथे 'बिनसल' हा शब्द खटकतो. तसेच पृष्ठ ४२ वर '...पशुपक्षी त्या निबिड अधारातही कसेनुसे कुठ तरी धावत सुटले होते.' असे वाक्य आहे. त्यामध्ये 'कसेनुसे' या शब्दाचा अर्थ लागत नाही. परंतु असे काही शब्द सोडले तर वातावरण निर्मितीच्या दृष्टीने 'कादबरीमय महाभारता'चे निवेदन विशेष परिणामकारक झाले आहे असे वाटते.

महाराष्ट्र शासन पुरस्कार लाभलेले
आमचे एक गौरवास्पद प्रकाशन

**व्होलगा जेव्हा लाल होते**

वि. स. वाळिंब

अठरा रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे ३०

अर्थात निवेदनाची एक गोष्ट सोडली तर कादंबरी म्हणून जर महाभारताचे लेखन कानिटकराना अपेक्षित असले तर मात्र ते रसिक वाचकांचा अपेक्षा भग करणारे आहे. कारण येथे मी वर सागितले त्याप्रमाणे सुरुवात शांतनु आणि सत्यवतीच्या मिलनापासून होते आणि या खडाची समाप्ती पाडु अरण्यात आपल्या दोन राण्यांसह निघून जाण्यात होते. म्हणजे महाभारताच्या पूर्वार्धाचे सर्व ठळक कथानक या भागात अवतीर्ण झालेले आहे. येथे कथानक आहे पण कादंबरी नाही. गोष्टी घडतात परंतु कलेचे दर्शन घडत नाही. वेगाने कथानकाला रूप येत जाते परतु वाङ्मयीन सौंदर्याची प्रचिती येत नाही. मात्र इतके असूनही हे 'कादंबरीमय महाभारत' वाचनीय झालेले आहे. आणि ते सग्रहणीय तर नक्कीच आहे. याचे कारण महाभारताचे सपादित केलेले सुबोध कथानक येथे कानिटकर आपल्या साध्या, सोप्या आणि अकृत्रिम शैलीने सादर करतात. त्यामुळे मूळ महाभारतातील जुनेपणा, क्वचित् शब्दातील क्लिष्टता आणि निवेदनातील पाल्हाळ येथे टाळला गेला आहे. शिवाय पुस्तकात जी पानोपानी चित्रे घातली आहेत तीही परिणामकारक असल्यामुळे मूळ कथानकाला पूरकच ठरतात.

फक्त हा खड वाचीत असताना आणि वाचून सपविल्यानंतरही जे जाणवत राहते ते म्हणजे कानिटकरानी जे केले त्यापेक्षा खूपच अधिक करायला हवे होते. कारण याच खडात विशेष प्रकर्षाने जाणवतात त्या व्यक्ती म्हणजे भीष्म, धृतराष्ट्र आणि गाधारी या होत. मला वाटते ढोबळ घटनेतून त्याच्या जीवनाची कथा सागण्याऐवजी त्याच्या जीवनावरच कादबरी लिहिण्याचे आव्हान कानिटकरानी स्वीकारले असते तर ते हवे होते. सर्व महाभारताला कादबरीमय करण्यापेक्षा महाभारतातील ज्या उत्तुग व्यक्ती आहेत त्याच्या जीवनावर कादबरी लिहिणे जास्त महत्त्वाकाक्षी आहे.

भीष्माचा अलौकिक त्याग आणि तेवढाच अलौकिक पराक्रम सर्व महाभारताला उजळून काढीत आहे. तसेच धृतराष्ट्राचे अंधत्व आणि गाधारीची पतिनिष्ठा, शभर पुत्राचे मातृत्व आणि तिच्या आयुष्याची झालेली दु खातिका ! या दुःखांतिकेला—कलेच्या माध्यमातून अर्थ देणे अतिशय महत्त्वाकाक्षी कार्य म्हटले पाहिजे. कानिटकरानी ही स्वभाव-चित्रे फक्त निवेदिली आहेत. स्वतत्रपणे त्या जीवनाचा वेध त्यानी घेतला असता तर कदाचित एका निखळ कलाकृतीचे महत्त्व त्यांना लाभले असते. कुती, गाधारी आणि उत्तरा महाभारतातील अशी स्वभावचित्रे आहेत की ज्याच्या जीवनावर मोठी कलाकृती निर्माण होऊ शकेल. कानिटकराचे 'कादबरीमय महाभारत' वाचून मनात विचार येतो तो हा. □

[ कादंबरीमय महाभारत : माधव कानिटकर
प्रपंच प्रकाशन, पुणे ३० : मूल्य बारा रुपये ]

कॅप्टन मॉडला आपल्या विमानांची काळजी वाटत होती. हवामान अजूनही भयंकर होते. समुद्र अशांत होता. वादळाचे थैमान चालूच होते. परतणारी वमाने 'बिस्मार्क'च्या प्रतिकारप्रयत्नात जखमी झाली असण्याचा संभव होता. पूर्ण शाबूत असतानाही, विमानांना उड्डाण मोठ्या कष्टाने करावे लागले होते. आणि निसर्गाने तर जणु त्यांची कसोटी पाहायचा निश्चय केला होता. आपल्या इमानी विमानांच्या अवतरणाच्या नुसत्या कल्पनेने कॅप्टन मॉडचा जीव खाली वर होत होता.

नऊ वाजण्याच्या सुमारास, परतणाऱ्या पहिल्या विमानाची चाहूल लागली. डळमळणाऱ्या डेक-विमान-




तळावर ते कसेबसे उतरले. पण त्याने जणु शुभशकुन केला होता. अगदी ज्याचा वैमानिक आणि गोलंदाज जायबंदी होऊन ज्याच्या देहाची गोळ्यांनी चाळण केली होती, त्या विमान.सुद्धा सगळी विमाने सुरक्षितपणे उतरली.

प्रत्येक विमानातील माणसांची कॅप्टन मॉडने एकेकशः उलटतपासणी घेतला. हल्ल्याबद्दलच्या त्यांनी केलेल्या निवेदनांची काळजीपूर्वक छाननी करण्यात येत होती. इकडे कॅप्टन मॉडचा प्रश्नमालेचा कार्यक्रम चालू होता आणि तिकडे आर्क रॉयलवरील विमानांचा हल्ला ही 'बिस्मार्क'ला रोखण्याची अखेरची संधी आहे हे जाणणाऱ्या दर्यासारंग टोव्हींचो त्या हल्ल्याचा निकाल

अनंत भावे

सहा

कळण्याची उत्कंठा शिगेला पोहोचली होती.

आर्क रॉयलवर विमाने साडेदहा वाजेपर्यंत येतच होती. त्यानंतर थोड्या वेळाने उलटतपासणीचे काम एकदाचे संपले. प्रश्न विचारले जाणारा आणि प्रश्न विचारणारा, दोघांच्याही दृष्टीने किचकट काम होते ते. 'बिस्मार्क'वर करण्यात आलेल्या अनेक टॉर्पेडोमाऱ्याचा नेमका परिणाम अजमावणे ही मोठी कठीण गोष्ट होती. पाऊस, धुके, आणि 'बिस्मार्क'ने प्राणपणाने केलेला निकराचा प्रतिकार यांमुळे काही वेळेला तर टॉर्पेडोमाऱ्याचा परिणाम अवलोकन करणे अशक्यप्रायच होते. त्यात पुन्हा विनयामुळे आर्क रॉयलच्या या वैमानिकाकडून आपल्या कामगिरीचे यथातथ्य निवेदन झाले नव्हते. तरीही 'बिस्मार्क'वरील या हल्ल्यामुळे तिची गती मंदावली आहे याबद्दल वैमानिकांमध्ये एकवाक्यता होती, परंतु दर्यासारंग टोव्हीना याहून नेमकी बातमी हवी होती. सकाळपर्यंत 'बिस्मार्क'ला युद्धात खेचणे शक्य होईल किंवा नाही, या प्रश्नाचे नेमके निर्णायक उत्तर त्यांना हवे होते. यासाठी पुरावा बिनतोड पाहिजे, माहिती अचूक पाहिजे, हे कॅप्टन मॉंड जाणून होता. तशा माहितीच्या अभावी त्याने अहवाल सावधपणे तयार केला. परंतु अतिशयोक्ती टाळण्याच्या प्रयत्नात कॅप्टन मॉंडच्या अहवालात अपुरेपणा आला होता. या अहवालाप्रमाणे 'बिस्मार्क'ला एकच जखम झाली होती, आणि तीही फार मोठी नव्हती शिवाय जखम झाली होती मध्यभागी की जेथे बारा इंच जाड चिलखत होते. म्हणजे 'बिस्मार्क' जवळजवळ अक्षतच होती म्हणायची !

आर्क रॉयलची 'बिस्मार्क'वर टेहळणी करणारी विमाने रात्री उशीरापर्यंत तिच्यावर नजर ठेऊन होती. मध्यरात्रीपूर्वी थोडा वेळ ती आर्क रॉयलवर परतली तेव्हा त्यांनी एक महत्त्वाची बातमी आणली होती: टॉर्पेडोमाऱ्यानंतर आता 'बिस्मार्क'च्या हालचाली विचित्र होत होत्या. दिशाहीन अवस्थेत तिने दोन वर्तुळाकृती फेऱ्या मारल्या होत्या

वैमानिकांनी सादर केलेल्या अहवालांची एकीकडे छाननी करत असतानाच कॅप्टन मॉंडने पहाटे करावयाच्या तिसऱ्या हल्ल्याची योजना आखायला सुरुवात केली. 'बिस्मार्क'ला दिशाहीन अवस्थेत परिभ्रमण करावे लागत होते हे खरे; पण तिची अशी दशा आपल्या विमानांनी टाकलेल्या टॉर्पेडोच्या आघातामुळे झाली आहे, या गोष्टीची कल्पना मॉंडला आली नाही. वास्तविक टॉर्पेडोचा तो आघात निर्णायकच होता. त्याने 'बिस्मार्क'ची सुकाणू-यंत्रणाच नादुरुस्त झाली होती.

मात्र 'बिस्मार्क'वरील या निर्णायक आघाताची वार्ता जलदीने प्रसृत झाली नाही. परिस्थितीचे यथायोग्य आणि आशादायी चित्र पुढे उभे राहण्यापूर्वी दर्यासारंगांना निराशेचे काही काळेकुट्ट क्षण अनुभवावे लागले.

'बिस्मार्क'च्या तोफतडाख्यातून सुटण्यासाठी कॅप्टन लारकॉमने शेफिल्ड घाईघाईने वळवली होती मात्र त्या घाईतही लारकॉमच्या नजरेतून एक गोष्ट सुटली

नव्हती : ' बिस्मार्क ' दक्षिणदिशेचा आपला मोहरा बदलून आता उलट्या दिशेला म्हणजे पुन्हा उत्तरेकडे निघाली होती ! ही महत्त्वाची बातमी त्याने ताबडतोब टोव्हीना कळवली.

या बातमीच्या आधी काही वेळ, आर्क रॉयलच्या हल्ला करणाऱ्या वैमानिकांच्या प्रमुखाकडून " ' बिस्मार्क 'वर आम्ही आघात करू शकलो नाही " असा संदेश टोव्हीना मिळाला होता. या प्रमुखाची इतरापासून चुकामूक झाली होती; आणि टॉर्पिडोमारा करण्यात स्वतः अयशस्वी झाल्यामुळे आणि इतराची बहुधा तशीच स्थिती झाली असणार असे मानल्यामुळे त्याने आपला " ' बिस्मार्क 'वर आम्ही आघात करू शकलो नाही " असा संदेश टोव्हीकडे पाठवून दिला होता !

आता दर्यासारंगांना कसलीही आशा उरली नव्हती सारे संपले होते ' बिस्मार्क 'ला युद्धात खेचण्याला ते असमर्थ ठरले होते. सावज हातातून निसटून चालले होते. त्यामुळे आता लारकॉमकडून ' बिस्मार्क 'ने आपला मोहरा अकस्मात उलट्या दिशेने वळवला असून सावज जणू जाळ्यातच उडी घालते आहे, अशी बातमी आली तेव्हाही निराश झालेल्या दर्यासारंगाना वाटले की ' बिस्मार्क 'च्या आघाडीला पिछाडी समजण्याची चूक कॅप्टन लारकॉमकडून होत असून ' बिस्मार्क ' निश्चतपणे सुरक्षित दक्षिणेकडेच जात असावी !

या एका वेळी टोव्हींचा आपल्या सहकाऱ्यांवरील विश्वास ढळल्यासारखा झाला होता. असा काही वेळ गेला. आणि हल्ल्यानंतरही ' बिस्मार्क 'वर नजर ठेऊन असणाऱ्या एका टेहळ्या विमानाकडूनदेखील ' बिस्मार्क ' उत्तर दिशेला मार्गक्रमण करू लागली असल्याची बातमी आली.

टोव्ही चमकले. अचानक शिकारीला नवा अर्थ आणि महत्त्व प्राप्त झाले होते; कारण शफिल्ड आणि ते टेहळे विमान या दोघाकडून निरीक्षणाचा सारखाच प्रमाद घडण्याची शक्यता नव्हती. तेवढ्यात आणखी एका टेहळ्या विमानाकडूनही तसाच संदेश आला. शेफिल्डवरून पुन्हा तीच बातमी आली. ' बिस्मार्क ' निश्चितच उत्तरेकडे प्रयाण करत होती. पण याची संगती लावणे कठीण होते. सुरक्षिततेचे नंदनवन दृष्टिपथात आले असता त्याकडे पाठ फिरवून ' बिस्मार्क ' आपण होऊन मृत्यूच्या खाईत कशाला जाते आहे, याचा उलगडा दर्यासारंगाना होईना. आर्क रॉयलचा कॅप्टन मॉड हा उलगडा करू शकेल अशी आशा त्याना होती; पण मॉडने पाठवलेल्या हल्ल्याच्या अहवालावरून उलगडा काही झाला नाही.

अकस्मात उत्तरेकडे निघालेल्या ' बिस्मार्क 'ला गाठणे टोव्हीना सहज शक्य होणार होते. म्हणून किंग जॉर्ज द फिफ्थवर पुन्हा उत्साहाचे वारे संचारले. ' बिस्मार्क 'सारखे मौल्यवान पारितोषिक टोव्हींच्या हाती आपण होऊन सुपूर्द करण्यासारखे काय घडले होते, याविषयी फक्त काही तर्क करणे शक्य होते. परंतु त्यावेळी ते तर्क बाजूला ठेऊन, पारितोषिकाचा स्वीकार करण्यासाठी टोव्हीनी

कमाल वेगाने सरळ ‘ बिस्मार्क ’च्या रोखाने कूच केले.

पुन्हा पुन्हा ‘ बिस्मार्क ’च्या या शिकारमोहिमेत वर उल्लेखिल्यासारख्या सावध आणि चुकीच्या अहवालांचा परिणाम मात्र धाडसी आणि अचूक निर्णय घेण्यात झाला होता. याचे श्रेय अर्थात काही कर्णधारांच्या स्वत्व जपण्याच्या वृत्तीला होते. तसल्या अहवालांनी हिंमत कोणाचीच हरली नाही. प्रत्येक वेळी जबाबदारी घ्यायला कोणीतरी पुढे सरसावे आणि ‘ बिस्मार्क ’च्या सुटकेच्या प्रयत्नाला शह देण्यात येई.

एडिंबरा या क्रूझरच्या कर्णधाराने–कमोडोर ब्लॅकमनने–हेच केले. ‘ बिस्मार्क ’-वरील हल्ला फसल्याचा, मॉडच्या त्या वैमानिक-प्रमुखाने टोव्हींना पाठवलेला संदेश ब्लॅकमनने मध्येच टिपला होता. त्यानंतर त्याने ब्रिटनला परतण्याचा विचार चालवला होता. कारण ‘ बिस्मार्क ’ निसटणार हे आता जवळजवळ ठरल्यासारखेच होते. शिवाय त्याच्या जवळच्या तेलसाठ्याची स्थिती अशी होती की त्याने खरोखर आधीच ब्रिटनला परतणे शहाणपणाचे ठरले असते...इतक्यात कॅप्टन मॉडचा संदेश आला : ‘ बिस्मार्क ’च्या मध्यभागी एक आघात झाला आहे. हा आघात, मागे सांगितल्याप्रमाणे, फारसा विघातक असण्याची शक्यता नव्हती. पण ब्लॅकमनने या आघाताची बिस्मार्क ’च्या गूढ उत्तरदिशागमनाशी सांगड घातली; आणि ‘ बिस्मार्क ’ला गाठण्याची आशा त्याला नव्याने वाटू लागली. ‘ बिस्मार्क ’वर आघात झाला होता; आणि फ्रेंच बंदरांचा सुरक्षित आसरा सोडून उलट दिशेला ती खुल्या सागरात चालली होती, याला तसेच काही कारण असले पाहिजे : ब्लॅकमनने त्या कारणाचा शोध घेण्याचे ठरवले. तेलसाठ्याची पर्वा न करता शत्रूवर तुटून पडण्याचा प्रकार बिस्मार्क ’च्या शिकारीत पुन्हा पुन्हा घडलेला दिसतो.


लहान मुलांसाठीं उत्कृष्ट औषध।

डोंगरे बालामृत

के. टी. डोंगरे अँण्ड कं. प्रा. लि. पणजी-१.

उत्तरेला थोड्या अंतरावर नॉरफोकचीही तेलसाठ्याची परिस्थिती गंभीर होती. तरी तिने वेगाने मोर्चा शत्रूकडे वळवला होता. वेकवॉकरची प्रतिक्रिया कमोडोर ब्लॅकमनसारखीच झाली होती. या निर्णायक प्रसंगी शिकारीतून अंग काढून घेण्याची कल्पना वेकवॉकरला सहन झाली नसती.

ब्लॅकमन आणि वेकवॉकरच्या प्रकृतीचा तिसरा कर्णधार आपल्या क्रूझरनिशी 'बिस्मार्क'ला तोंड द्यायला पुढे सरसावला होता. या क्रूझरने 'बिस्मार्क'च्या शिकारमोहिमेत पुढे मोठी नाट्यपूर्ण कामगिरी बजावली. ज्या त्वरेने या शिकारीत पुढारीपण बदलत राहिले तिला नाविक युद्धाच्या इतिहासाला तोड सापडत नाही.

सिएरा लिओनहून ब्रिटनला जाणाऱ्या अन्नवाहू नौकांच्या एका काफिल्याला संरक्षण देणाऱ्या डॉर्सेटशायर या क्रूझरने त्या दिवशी—म्हणजे सव्वीस मे रोजी—सकाळी अकरा वाजता विमानदलाच्या कॅटलिना जातीच्या विमानाने 'बिस्मार्क' सापडल्याबद्दल पाठवलेला अमूल्य संदेश मध्येच टिपला. आपण 'बिस्मार्क'-पासून दक्षिणेला अवघ्या तीनशेसाठ मैलांवर आहोत हे कॅप्टन मार्टिनच्या लगेच लक्षात आले. कॅप्टन मार्टिनने अधिक चिकित्सा केली नाही. पूर्वी नॉरफोक आणि सफोकने केलेले 'बिस्मार्क'वर पाळत ठेवण्याचे काम आता आपल्याला करणे शक्य आहे हे पाहताबरोबर आपल्या अंतर्यामी तीव्र काफिल्याला लढाऊ वाणारी क्रूझर व्युलोली हिच्या स्वाधीन करून मार्टिनने डॉर्सेटशायर उत्तरेच्या दिशेला वळवली. 'बिस्मार्क' अकस्मात पुन्हा दक्षिणेकडे धाव घेण्याची शक्यता अगदीच नष्ट झाली नव्हती. तसे झाले असते तर अवघ्या बारा तासात डॉर्सेटशायर तिला आडवी येऊ शकणार होती. येणप्रमाणे वरिष्ठांच्या हुकुमापेक्षा आपल्या अंतःकरणाच कौल अधिक प्रमाण मानणाऱ्या आणखी एका कर्णधाराने आपल्या ताब्यातील अन्नवाहू काफिला सोडून 'बिस्मार्क'वर चाल केली होती.

दैवाचे वारे आपल्याला अनुकूल वाहू लागले आहेत असे आता टोव्हीना वाटू लागले होते. फ्रेंच बंदराचा स्वर्गीय आसरा सोडून 'बिस्मार्क' उत्तरेला यमलोकीच्या मार्गाने निघाली होती : तिची सुकाणू-व्यवस्थाच तर निकामी झाली नसेल ना, असा विचार आता टोव्हीच्या मनात आला.

अत्यंत नाट्यपूर्ण रीतीने सुदैव आता टोव्हीना सर्व बाजूंनी साथ देत होते. आर्क रॉयलची विमाने, शोध पुन्हा लागल्यापासून, यशस्वी हल्ल्यानंतरही 'बिस्मार्क'वर पाळत ठेऊन होती. पण आता अंधार पडू लागला होता. थोड्याच वेळात अंधारा-मुळे हवाई पाळत ठेवणे अशक्य होणार होते. मग पाळत ठेवण्याचे काम कोण करणार होते? का त्या अभावी 'बिस्मार्क' पुन्हा निसटणार होती? —प्रार्थनेला प्रतिसाद मिळावा तसे व्हायनच्या विनाशिकांच्या काफिल्याचे आगमन क्षितिजावर झाले. व्हायन अगदी वेळवर येऊन पोचला होता. कोझॅक, माओरी, झुलू, शीख आणि कमांडर प्लावस्की या पोलिश कर्णधाराची पिओरन, असा व्हायनचा काफिला

होता. 'पिओरन 'च्या निमित्ताने झुजार पोलड राष्ट्राला अभिवादन करणे अनाठायी होणार नाही. जर्मनांनी पोलडची धूळधाण केल्यावरही पोलिश सैनिक नात्झींविरुद्ध अन्य ठिकाणी लढत राहिले उत्तर आफ्रिकेमध्ये कार्पाथियन तुकडी लढत होती; शाही विमानदलात पोलिश सैनिकानी मर्दुमकी गाजवली होती; आणि 'बिस्मार्क 'च्या शिकारीत अगदी मोक्याच्या वेळी पिओरन प्राप्त झाली होती.

दहा वाजायच्या आधी थोडा वेळ व्हायनच्या काफिल्याची शेफिल्डशी भेट झाली होती. शेफिल्डने 'बिस्मार्क 'च्या ठिकाण्याची नेमकी कल्पना व्हायनला दिली होती.

तोपर्यंत प्रत्येक ब्रिटिश नौकेला पुढील महत्त्वाचा सदेश पाठवण्यात आला होता: 'फ्रेंच बदराची वाट सोडून 'बिस्मार्क ने उत्तरेचा आत्मघातकी मार्ग पत्करलेला दिसतो. या मार्गबदलाची कारणे मात्र अज्ञात आहेत.' अटलांटिक महासागराच्या प्रचड विस्तारावर विखरलेल्या गेलेल्या नौकावर वरील सदेश प्रसृत होताच, एकच उत्साहाचे वारे संचारले एका बिकट, प्रदीर्घ शिकारीचा शेवट नजरेत आल्यावर त्यांची अंत:करणे उचंबळून आली.

आर्क रॉयलवर उशीरा परतलेल्या टेहळणी विमानांनी आणलेली महत्त्वपूर्ण वार्ता कप्टन मॉडने दर्यासारगाना कळवली होती. तिचा तात्पर्यार्थ असा होता की उत्तरेकड कूच करण्यापूर्वी 'बिस्मार्क' दिशाहीन झाल्यासारखी दोनदा गोलाकार फिरून उफळत्या सागरात स्तब्ध झाली होती. त्यानतर मोठ्या कष्टाने, सावकाश ती उत्तरेकडे वळली होती.

या वार्तेमुळे टोव्हीच्या अंदाजाला दुजोरा मिळत होता. नि:सशयपणे 'बिस्मार्क 'ची सुकाणू-व्यवस्था निकामी झाली होती. ब्रिटिशांच्या हातावर तुरी देऊन निसटण्याचा 'बिस्मार्क 'चा प्रयत्न किती थोडक्यात हुकला, किंवा आर्क रॉयलच्या विमानांनी केलेल्या हल्ल्यावर ब्रिटिश नौदलाच्या साऱ्या आशा कशा टांगून राहिल्या होत्या, याची कल्पना मूठभर वरिष्ठ अधिकाऱ्यांवाचून इतरांना कशी असणार ?...पण तो हल्ला अनपेक्षितपणे यशस्वी झाला होता. आता व्हायनच्या विनाशिकाचा ताफा रात्रभर 'बिस्मार्क 'च्या पाळतीवर राहून सकाळी तिला टोव्हीच्या काळसापळ्यात आणणार होता. कोसळणारा पाऊस, दाटलेले धुके, चद्रविहीन आकाश, खवळलेला समुद्र याच्याशी मुकाबला करत हिकमती 'बिस्मार्क '-वर पाळत ठेवण्याचे जोखमाचे काम करणाऱ्या व्हायनला रात्र वैऱ्याची आहे याची याद ठेवणे भागच होते

आर्क रॉयलच्या दृष्टीने तो अखरचा हल्ला एक अभिमानास्पद घटना होती. या विलक्षण शिकारीतील निर्णायक आघात आर्क रॉयलवरील विमानानी केला होता. नाविक युद्धतंत्राच्या दृष्टीने ही क्रातिकारक घटना होती. त्यानंतरच्या काळात, विमानवाहू नौकाना, नाविक युद्धात, असाधारण महत्व प्राप्त झाले.

सर जेम्स सॉमरव्हिल यांच्या आधिपत्याखालील एच् विभागाच्या, या शिकारीतील कामगिरीबद्दल, दर्यासारंग टोव्हीनी म्हटले : "या मोहिमेत एच् विभागाचे संयोजन अत्यंत कौशल्याने करण्यात आले. मोहीम यशस्वी करण्यात त्या दलाचा फार मोठा वाटा आहे."

आर्क रॉयलवरील सोर्डफिश जातीची ती विमाने दिसण्यात अगदीच बेंगरूळ होती. 'स्पिटफायर'मध्ये असणारा कररी डौल, आत्मविश्वासाचा दिमाख त्यांच्यात नव्हता. आणि त्यांचा वेग हा एक मोठाच विनोद होता. पण त्यांच्यामुळेच, या वेळी, शिकाऱ्याला सावजाची कोंडी करणे शक्य झाले होते.

'बिस्मार्क'च्या पिछाडाला व्हायनच्या विनाशिका एकमेकामध्ये दोन मैलाचे अंतर ठेऊन आडव्या रेषेत येत होत्या. एकमेकात जादा अंतर ठेऊन 'बिस्मार्क'-वरील पकड अधिक व्यापक करणे, बेमान दर्या, घनदाट काळोख आणि परस्पर-संपर्क तुटण्याची भीती यांमुळे शक्य नव्हते. मध्यभागी कोसॅक होती. तिच्या डाव्या अंगाला पिओरन, मावरी आणि उजव्या अंगाला शीख व झुलु होत्या.

साडेदहा वाजता प्रथम पिओरनला 'बिस्मार्क'चे दर्शन झाले. 'बिस्मार्क' अवघ्या नऊ मैलावर होती. आता तिचा रोख ईशान्येकडे होता. मात्र हा मार्ग-बदल 'बिस्मार्क'वर चाललेल्या दुरुस्तीच्या हातघाईच्या प्रयत्नाचे फलित नव्हते. एव्हाना वारा, दर्या आणि निकामी झालेली सुकाणू-व्यवस्था यांच्या हातातील खेळणे बनली होती 'बिस्मार्क.'

तिकडे बिस्मार्क'वर धाईगर्दीची एकच धमाल उडाली होती. युद्धाचे वारे आता साफ फिरले होते. कमाल आत्मविश्वासाने सुरू झालेल्या, प्रथम विजयाचा शुभशकून झालेल्या या महत्त्वाकांक्षी जर्मन नाविक मोहिमेचा रंग अकस्मात पालटला होता. आता 'बिस्मार्क' एकाकी, जखमी आणि दिशाहीन झाली होती. भोवतीचा महासागर खवळलेला होता, आणि ब्रिटिश शिकारी नौका अगदी समीप आल्या होत्या. हूडच्या सर्वनाशामुळे गर्वोद्धत झालेले 'बिस्मार्क'चे अधिकारी आणि नाविक आता उदास झाले होते. हूड ही ब्रिटिश नौदलाचा अभिमानविषय होती. 'बिस्मार्क'ने पहिल्या झगाटयातच हूडला गारद करून आपल्या मोहिमेची सुरुवात तर मोठ्या दिमाखात केली होती. त्या कर्तृत्वाबद्दल हिटलर आणि ग्रँड ॲडमिरल रेडरकडून गौरवपर संदेश आले होते. लटयेन्सने आपल्या नाविकांना शाबासकी दिली होती. अटलांटिकमध्ये घुसलेल्या 'बिस्मार्क'पुढे बळी जाण्या-साठीच जणू ब्रिटिश अन्नवाहू नौकांचे काफिले तिला सामोरे येणार होते. 'बिस्मार्क'च्या भाग्याची कमान चढत चालली होती.

परंतु प्रिन्स ऑफ वेल्सच्या एका तोफगोळ्याने भाग्य पालटले. दुर्दैव आणि महासागर या जोडशत्रूंनी 'बिस्मार्क'शी दावा मांडला तेलटाकेवर एकच प्रहार झाला आणि लटयेन्सला, जर्मनीकडे परत जाणे किंवा फ्रेंच बंदरात जाऊन दुरुस्ती करून घेणे याशिवाय तिसरा मार्गच उरला नाही.

येथे 'बिस्मार्क'च्या हालचालींचे विश्लेषण करणे उद्बोधक ठरेल. हॉलंडच्या युद्धनौकेशी चोवीस मे रोजी झालेल्या चकमकीत यश मिळाल्यावर पुढे कोणता पवित्रा घ्यावा, याबाबत कॅप्टन लिंडमान आणि ॲडमिरल लटयेन्स यांच्यात मतभेद झाले होते 'बिस्मार्क'ने जर्मनीला परतावे, असे कॅप्टन लिंडेमानचे मत होते. कदाचित आपल्या पहिल्याच मोहिमेत, ब्रिटिश नौदलातील हूडसारख्या बलाढ्य नौकेचा चुराडा करणाऱ्या 'बिस्मार्क'चे जर्मनीत होणारे वैभवशाली स्वागत अनुभवायला तो आतुर झाला असावा: हिटलर मोठी मोठी भाषणे देणार होता. जर्मन नौदलाची प्रतिष्ठा भलतीच वाढणार होती. नौदलप्रमुख ग्रँड ॲडमिरल रेडरला हिटलरचा अनुग्रह लाभणार होता आणि त्याला पाण्यात पाहणारे हिमलर, हेड्रिश आणि गोअरिंग शर्मिंदे होणार होते. 'बिस्मार्क'च्या विजयाचा राजकीय फायदा तर होताच; पण शिवाय जर्मन जनतेची मने उल्हसित होणार होती, हा फायदा फार मोठा होता. ग्रँड ॲडमिरल रेडर नौदलविकासासाठी अनेक वर्षे झटून प्रयत्न करत होता. हिमलर, गोअरिंग, गोबेल्स, हेड्रिश यांच्यासारख्या मूर्ख प्रतिस्पर्ध्यांमुळे त्याच्या प्रयत्नांना म्हणावे तसे यश लाभले नव्हते म्हणूनच 'बिस्मार्क'च्या नेत्रदीपक विजयाने रेडरच्या नौदलाच्या सामर्थ्याची नौबत वाजवली जाणार होती. ती नौबत ऐकण्यासाठी जर्मनीला जायलाच हवे, अशी लिंडेमानची भूमिका होती.

ॲडमिरल लटयेन्सदेखील कॅप्टन लिंडेमानप्रमाणेच कट्टर नाझी असता तर हूडवरील विजयप्राप्तीमुळे जर्मनीत लाभणाऱ्या मानसन्मानाच्या आशेने 'बिस्मार्क' डेन्मार्क-सामुद्रधुनीमधून कधीच जर्मनीला सुखरूप परत गेली असती परंतु लटयेन्स एक स्वाभिमानी, निष्ठावान दर्यावर्दी होता. सन्मानापेक्षा कर्तबगारीचे आकर्षण त्याला अधिक होते. लिंडेमानची सूचना धुडकावून लावण्याचे कारण लटयेन्सच्या वृत्तीत सापडू शकेल. काही महिन्यांपूर्वी, एका मोहिमेच्या संदर्भात लटयेन्सच्या धैर्यशाली नेतृत्वाबद्दलच शंका व्यक्त करण्यात आली होती: खरे म्हणजे त्या

स्वादिष्ट मिठाईसाठी
आम जनतेची निवड

शर्मा स्वीट मार्ट

दत्त मंदिराशेजारी, मंडई रस्ता, पुणे २.

मोहिमेला लटयेन्सने केवळ वस्तुनिष्ठ दृष्टिकोनातून विरोध केला होता. तरीही 'कातडीबचाऊ' असा हीन, अपमानास्पद आरोप त्याच्यावर करण्यात आला. या अपमानाचे शल्य त्याच्या मनात सलत होते. प्रत्यक्ष कृतीनेच त्या आरोपाचे निराकरण करण्याचा मोह त्याला झाला असावा. लटयेन्सने मोठ्या उल्हासाने आणि आत्मविश्वासाने 'बिस्मार्क' या मोहिमेसाठी हुकारली होती; ब्रिटिश गृहसंरक्षक दलाला न जुमानता, वाटेत एक नेत्रदीपक विजय संपादन करून तो अटलांटिकमध्ये घुसली होती; आता मागे परतण्यात सावधानता असली तरी वीरोचितता नव्हती. म्हणून लटयेन्सने आपला मोहरा सेंट नाझेर बंदराकडे वळवला, आणि जणु स्वतःच्या दुर्भाग्यावर शिक्कामोर्तब केली.

'बिस्मार्क'वरील वाचलेल्या खलाशांच्या मते ब्रिटिश नौदलाचा चिवट पाठलाग किंवा नौदलाच्या मध्यवर्ती कार्यालयाने समुद्रसंचारी नौकांशी, नौदलाच्या हवाई शाखेशी आणि किनारदलाशी सतत ठेवलेला चतुर संपर्क यांमुळे नव्हे तर 'बिस्मार्क'चा पाठलाग करणाऱ्या ब्रिटिश नौकांबद्दल चुकीची माहिती पुरवणाऱ्या जर्मन टेहळ्या विमानांच्या अक्षम्य अपराधामुळे अखेर 'बिस्मार्क' युद्धात खचली गेली. त्याउलट 'बिस्मार्क'च्या मार्गक्रमणाचे बारकाईने विश्लेषण केले तर असे आढळून येते की सुकाणू-व्यवस्थेवर निर्णायक प्रहार होईपर्यंत 'बिस्मार्क'चा मोहरा सतत ब्रेस्ट वा सेंट नाझेर बंदराकडेच होता; त्यामुळे जे घडले ते अटळच होते. परंतु पराभवाच्या या विनाशाच्या वेळी शत्रूला श्रेय देण्याऐवजी दुर्दैवाला दोष देणाऱ्या जर्मन मनोवृत्तीचाच पडताळा वरील कारणमीमांसेत पहायला मिळत असावा. ज्याच्या अनेक गुणांबद्दल निश्चित आदर वाटावा तो ग्रँड ॲडमिरल रेडरदेखील त्या मनोवृत्तीचाच गुलाम होता की काय असा संशय येतो उदाहरणार्थ, आपल्या स्मृतिचित्रात 'अल्टमार्क' नौकेची कहाणी सांगताना त्याने व्हायनलाच दोष दिला आहे. 'अल्टमार्क' या नौकेवर तिच्या कप्तानाने बेकायदेशीरपणे तीनशे ब्रिटिश नाविकांना कैद करून ठेवले होते. तटस्थ (?) नॉर्वेजियन फियोर्डमध्ये व्हायनने मोठ्या धाडसाने 'अल्टमार्क'ची झडती घ्यायला लावून त्या अभागी कैद्यांची मुक्तता केली. पण आंतरराष्ट्रीय कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या व्हायनला तत्परतेने दोष देणारा ग्रँड ॲडमिरल रेडर, पुरेशा अन्नाशिवाय, कोंदट जागेत, गुरांसारखी तीनशे माणसे डांबून माणुसकीचे मूलभूत तत्त्वच आपण पायदळी तुडवले होते हे सोयिस्करपणे विसरतो.

तोच व्हायन आपल्या विनाशिकांच्या ताफ्यासह आता 'बिस्मार्क'च्या पाठीमागे हात धुवून लागला होता. व्हायनचा स्वभाव धाडसी आणि आक्रमक होता. त्यामुळे कसलाही धोका पत्करण्याची त्याची तयारी असे. त्याच्या हाताखालचे लोक त्याच्या विलक्षण नेतृत्वाच्या कितीतरी चित्तथरारक कथा सांगू शकत होते. त्या बिचाऱ्यांची अवस्था मोठी चमत्कारिक होत असे. अर्थात त्याच प्रमाणात शत्रूची

देखील भेघातिरपीट उडत असे. 'बिस्मार्क'लासुद्धा व्हायनची दखल घेतल्याचाचून गत्यतर नव्हते. तिची अवस्था जखमी होऊन जीवाच्या आकांताने धावणाऱ्या, शिकारी कुत्र्यानी पिच्छा पुरवलेल्या, एखाद्या काळवीटासारखी झाली होती.

एका बाबतीत मात्र 'बिस्मार्क'वरून वाचलेल्या नाविकांनी स्वतच्याच युद्धयंत्रणेला दिलेला दोष युक्त वाटतो : 'बिस्मार्क'च्या हालचालीचे नियंत्रण पश्चिम विभागाचे सरसेनापती ॲडमिरल कर्ल्स आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या हाती होते. त्यांनी दिलेल्या आश्वासनाप्रमाणे काही विमाने आणि पाणबुड्या आपल्या मदतीला येतील अशी रास्त अपेक्षा लटयेन्स आणि लिंडेमान यांनी बाळगली होती. प्रत्याक्षात मात्र दोहोंचाही पत्ता नव्हता. 'बिस्मार्क' रसातळाला गेली तेव्हा कोठे एकुलत्या एका जर्मन विमानाचे दर्शन झाले. त्या एकाकी विमानाने ब्रिटिश नौकांवर काही बॉम्ब टाकले; पण ते अगदीच फुसके होते पाणबड्यादेखील कोठेतरी गडप झाल्या होत्या. सत्तावीस मे रोजी दुपारी एक वाजून चाळीस मिनिटांनी, व्हायनच्या भेदक टॉर्पेडोमाऱ्यामुळे विद्ध होऊन जवळजवळ तासभर एका जागी कण्हत बसलेल्या 'बिस्मार्क'ला ॲडमिरल कार्ल्सने संदेश पाठवला होता. त्यात विमानाचा आणि पाणबड्यांची मदत त्वरेने येत असल्याचा दिलासा होता. त्या विमानाना मुळी 'बिस्मार्क' सापडलीच नाही. आणि सापडली असती तरी तोपर्यंत ती मदतीच्या पलीकडच्या अवस्थेला पोचलेली असती.

पाणबुड्यांपैकी दोघीनी औपचारिक हजेरी लावली. 'बिस्मार्क'च्या अंतकाळचे करुण दृश्य पाहण्याचे दुर्भाग्य पहिल्या पाणबुडीच्या वाट्याला आले. त्याच दिवशी तिलाही ब्रिटिश विनाशिकानी 'बिस्मार्क'च्या सोबतीला पाठवून दिले. तिच्यावरील वाचलेल्या नाविकांनी एक मोठी चित्तथरारक हकीगत सांगितली : ॲडमिरल कार्ल्सच्या हुकुमाप्रमाणे म्हणे ही पाणबुडी 'बिस्मार्क'च्या मदतीला येत होती. वाटेत एके ठिकाणी दर्यासारंग टोव्हीची ध्वजनौका किंग जॉर्ज द फिफ्थ तिच्यापासून अवघ्या दोनशेअठरा फुटांवर होती ? इतक्या जवळ, मोक्याच्या ठिकाणी असूनदेखील किंग जॉर्ज द फिफ्थवर तिने हल्ला चढवला नाही, कारण तिच्याजवळ मुळी टॉर्पेडोच शिल्लक नव्हते ! ... जर्मनांच्या कार्यक्षमतेला काय झाले होते कोणास ठाऊक ! (सत्तावीस तारखेला पहाटे पाच वाजता नॉरफोकने पाहिलेली पाणबुडी ती हीच असावी )

दुसरी पाणबुडी सत्तावीस तारखेला सकाळी सहा वाजता रणक्षेत्रावर दाखल झाली. पण ब्रिटिशांच्या माऱ्याने त्यापूर्वीच ती इतकी विकलांग झाली होती की तिचा काहीच प्रभाव पडणे शक्य नव्हते.

जखमी आणि पांगळ्या झालेल्या 'बिस्मार्क'सारख्या अद्वितीय युद्धनौकेला कुमक देण्याचे प्रयत्न याहून जारीने का झाले नाहीत, का होऊ शकले नाहीत, हे एक कोडेच आहे. ते कोडे कोणीच उलगडू शकलेला नाही. आणि हिटलर व त्याचे

निकटचे सहकारी यांनाच केवळ त्याचे उत्तर माहीत असल्यामुळे जगाला त्या कोड्याचा उलगडा कधीच होणार नाही

पहिल्या जर्मन पाणबुडीकडे जर टॉर्पेडो असते तर अवघ्या दोनशे फुटावर असलेल्या किंग जॉर्ज द फिफ्थचे काय झाले असते याची कल्पनाही करवत नाही. तसे झाले तर ही शिकारकथा आहे त्याहून कितीतरी वेगळी झाली असती. टोव्हीचा दैवावर विश्वास होता. ' बिस्मार्क 'च्या दीर्घकालीन शिकार मोहिमेत या दैवगतीचा प्रत्यय त्यांना अनेकवार आला होता. आणि किंग जॉर्ज द फिफ्थ दोनशे फुटावर असताना, ' बिस्मार्क 'च्या मदतीला येऊ पाहणाऱ्या जर्मन पाणबुडीकडे मारा करण्यासाठी मुळी टॉर्पेडोच शिल्लक नव्हते. ही अद्‌भुत कथा कळल्यानंतर तर टोव्हींचा दैवावरील विश्वास अधिक दृढ झाला असेल यात नवल नाही.

(क्रमशः)


# उत्कृष्ट इंग्रजीने उत्कर्ष

मातृभाषेतून शिक्षण सोपे आणि आवश्यक आहे. पण अधिक विस्तृत उत्कर्षासाठी इंग्रजी हवे, अशी समजूत असलेल्यांना असंस्कारी माध्यमातून इंग्रजी शिकावे लागते. तरुण पिढी, अधिकारी, व्यवसायिक, महिला, महत्वाकांक्षी व्यक्ती यांची डौलदार इंग्रजीची गरज सोप्या आणि सस्कारी माध्यमातून भागविण्यासाठी 'पत्रव्यवहाराने डौलदार सस्कारशील इंग्लिश'. एकच विचार, व्याकरण व भाषा यांच्या शभरावर वैशिष्टयाने सादर करण्याचा अपूर्व, उपयुक्त उपक्रम या अभ्यासवर्गात समाविष्ट आहे. त्यामुळे कोणतेही वाक्य तुम्ही ८०० वर तऱ्हेने लिहू शकाल. पुस्तिका मूल्यासह अभ्यासवर्ग दरमहा फक्त ५ रु. याशिवाय 'पत्रव्यवहाराने मनःशांती अभ्यासवर्ग' हा दुसरा उपयुक्त वर्ग (बुद्धिवर्धन, स्मरणवर्धन प्रयोग यात समाविष्ट).

दुःखमुक्ती, शिक्षण, मनःशांती, तत्वज्ञान इत्यादि अनेक लेखात ६०७ वर प्रयोग. स्वामी विज्ञानानंद (लोणावळा) कृत पाच भाषातील चाळीसावर संच. बुद्धिनिष्ठ विवेचन, माहितीसाठी स्वतःच्या पत्त्याचे पाकीट तिकीट लावून पाठवा.

न्यू वे आश्रम, बॉम्बे-पूना रोड, लोणावळा

मिळविण्यासाठी त्यांना ६१ सभासद पाहिजेत. बांगला कॉंग्रेस ३३, उजवे कम्युनिस्ट ३०, व फॉरवर्ड ब्लॉक २१ मिळून हे ८४ होतात. डाव्या कम्युनिस्टांचे ८० व यांचे ८४ असे या संयुक्त आघाडीचे मजेत राज्य होऊ शके. समजा अजयबाबूंचा ३३ चा गट बाहेर पडला तर मुस्लीम लीग व इतर सभासद मिळून १५–२० मंडळी आपल्या कच्छपी सहज लागतील व अल्प बहुमत मिळून आपण सत्तेवर सहज राहू असे डाव्या कम्युनिस्टांचे आधी पहिल्यापासून सरळ गणित होते इंदिरा गांधी गटाचा संख्या ३४ आहे. त्या गटाचा पाठिंबा ज्योति बसूंच्या मनात असावा. हे गणित एवढे पक्के होते की त्यांनी 'दादागिरी' न केली तरच नवल.

ज्योति बसू 'कुश्चेव्ह' व अजय मुखर्जी 'बुल्गानिन' झाले. सत्तेवर येताच बसूंनी आपण केंद्र सरकारशी लढाई खेळणार, असे सूचित केले. कॉसीपूर येथील शस्त्रास्त्रांच्या कारखान्याजवळ गोळीबार झाला ते अनायासे त्यांच्या पथ्यावर पडले तिकडे केरळात इ. एम. एस. नंबुद्रीपादांची 'आपण केंद्र सरकारला' नमवू अशी गर्जना चालू होती. डी. एम. के. च्या गटात तसे मनोरथ नव्हते असे नाही. पण जमले तर काहीही किंमत देऊन मद्रास प्रांताचे हित पहाणे ही प्रांतीय दृष्टी तेथे होती. उलट या दोघांजवळ फक्त पक्षीय हित एवढीच आस्था शिल्लक होती. पक्षाय नमो नमः! त्यामुळे नक्षलाईट मंडळी नाराज झाली. सारे श्रेय तुम्ही उपटता काय? लढनेकु हम और खानेकु तुम काय? आपल्याकडे जसे उजव्या कम्युनिस्टांविरुद्ध समाजवादी, हिंदुमहासभा, शे. का. प. वगैरे मंडळी लढल्या ना, त्यातला हा प्रकार.

या नक्षलाईट मंडळींचा रोष ज्योति बसूंनी ओढवून घेतला नसता तर निश्चित बसूंना विजय मिळाला असता. तेवढ्यात बसू गेले त्यांना मस्का लावायला! त्यांनी कनु संन्याल या राजकीय दरोडेखोराला सोडले. त्यांना वाटले, आता सारे श्रेय आपण उपटू! नक्षलाईटस् आपोआप आपल्या मागे येतील! झाले उलटे चिडलेले नक्षलाईटस् अधिकच चेकाळले. कनु सन्यालने सुटल्यावर पहिल्यांदा जनतेला कोणती केली माहिती आहे? 'बसूंच्या मेहेरबानीने मी सुटलो नाही. संयुक्त आघाडीच्या कोणत्याही मंत्र्याच्या मेहेरबानीमुळे माझी सुटका झालेली नाही. मी सुटलो याचे कारण जनतेने माझ्या सुटकेची मागणी केली होती.'

हे 'जनता' आजकाल और प्रकरण झाले आहे. इंदिरा गांधी तेच आज म्हणते. पूर्वीच्या काळी पटील वगैरे लोकांना ही 'जनता' स्टंटजी का जमली नाही ते कळत नाही. सुटल्याबरोबर कनु संन्यालने 'माव झिंदाबाद'च्या घोषणा सुरू केल्या.

कनु संन्यालचे भूत बाटलीबाहेर येऊन आपल्याच मागे लागले हे पाहून बसूंचा मिजास गला. नक्सलाईट समाजविरोधी तत्व आहे व लोकांनी त्यांच्यामागे जाऊ नये असा फतवा ज्योति बसूनी काढला.

बंगाली पुढाऱ्यात उतावाळपणा हा सर्वात मोठा दुर्गुण आहे. बंगाली क्रांतिकारकांचे बंड नेहमीच उतावीळपणाने दोन दान दिवस आधीच उत्तड झाले होते. मराठी माणसाप्रमाणे बंगाली माणूस मलताच अहंकारी! या उतावळपणा व खोटा अहंकार यांना बळी पडून ज्योति बसूनी आपल्यासमोर दोन शत्रू निर्माण करून घेतले.

नक्सलाईट आणि केंद्र सरकार.

बंगाली आधीच जहाल. जगात 'क्रांती' घडवून आणण्याची त्यांना कोण घाई झालेली.

नक्सलाईट म्हणजे त्या जहालपणाचा डबल डोस.

मात्र या दोघांच्या संयुक्त चाळ्यानी अजयबाबू आठ-नऊ महिन्यातच घाईस आले विधानसभेच्या बैठकीतच अजय मुखर्जीनी जाहीर केले, 'संयुक्त आघाडी सरकार असंस्कारी व जंगली (uncivilised and barbarous) आहे. प्रजेने त्या सरकारास एकतर सुधारावे किंवा खतम् करावे."

हा कम्युनिस्टांवर अॅटम बाँब होता!

मुख्य मंत्र्याने आपल्या सरकाराविरुद्ध असा फतवा काढण्याचे दुसरे उदाहरण मला माहीत नाही.

त्याचाच अर्थ, अजय मुखर्जी लाचार झाले होते, असहाय्य होते, एकाकी पडले होते

प्रश्न असा होता, तरीही अजयबाबू खुर्चीस घट्ट का चिकटून होते?

राजकारणांत हा प्रश्न विचारायचाच नसतो. गांधीजींनी फाळणीस संमती न देता काँग्रेसचे विसर्जन करून राजकीय संन्यास का घेतला नाही? नेहरूंनी १९६२ साली पराभव पत्करल्यानंतर राजीनामा का दिला नाही? ताष्कंद येथ जिंकलेला भाग पाकिस्तानला न देता शास्त्रीबुवानी राजीनामा का ठेवला नाही? मला वाटते, एवढी उदाहरणं बस्स आहेत. अजयबाबूंनी मुख्य मंत्री राहयचे म्हणून चालू ठेवले.

आणि ते मार्क्सिस्ट कम्युनिस्ट मंत्र्यांनी राजनिष्ठेची व भारतनिष्ठेची शपथ घेऊनसुद्धा कर्तव्यपालन न करण्याचे जाहीर केल्यावर! फार काय, भारतीय संहिता ही बूर्झ्वा भांडवलशाही आहे व त्या संहितेने कामगार, शेतकरी व इतर श्रमजीवी वर्गाचे भले होणार नाही असेही या पक्षाने जाहीर केले! बंगाली राजवट उलथवून पाडण्याचा कट रचला जात आहे, या राजवटीस आर्थिक मदत न देता बंगाल मागासलेला रहावा, आपल्या ताब्यात रहावा त्यासाठी केंद्र सरकार सारे डाव खेळत आहे असा आरोप मार्क्सिस्टांनी केला.

नाचता येईना अंगण वाकडे.

या मार्क्सिस्टांना बंगाल प्रांतासाठी, बंगाली जनतेसाठी, फार काय पक्षासाठी काहीही करायचे नव्हते. म्हणून हे वरील विध्वंसक मुद्दे त्यांच्या डोक्यातून निघाले असावेत

तुम्ही विध्वंस काय करता, त्यापेक्षा आम्ही जास्त विध्वंस करून दाखव, असे आव्हान करून सन्याल आणि कंपनीने स्वीकारले

एक मे १९६९ रोजी त्यांनी नव्या पक्षाची जाहीर घोषणा केली. शब्दजंजाळ इतर कम्युनिस्ट घोषणेप्रमाणे : Today the basic task is to liberate the rural areas through revo uti nary armed agrarian revolution and encirle the cities, and finally to liberate the cities and thus complete the revolution throughout the country." आपले कनुभाई कामगारांना विसरलेले नाहीत. मात्र त्याचे तत्त्वज्ञान उघडपणे चिनी आहे : The party's task among them will be to build up class struggles and to organize mass movements; but all these will be done to support the armed agrarion revolution which is the principal task of the People's Democratic Revolution under the banner of the thought of Chairman Mao "

ह्या मान्य स्फूर्तीचे उगमस्थान समजण्यासाठी १९२६–२७ सालची चिनी राजकीय पार्श्वभूमी समजून घेणे आवश्यक आहे. तो लाल रक्षकाच्या हुनान चळवळीचा रोमहर्षक इतिहास आज सन्यालांच्या भक्तांची 'गाता' बनलेला आहे १९२७ साली माओने विरोधी सत्ताधीशांची राजकीय व सामाजिक इभ्रत संपूर्णपणे धुळीस मिळविण्याचा आदेश दिला व जनतेत जागृती आणण्याची अभिनव स्ट्रॅटजी जगापुढे मांडली Parading the opponents through the villages. माओ गहेबाचे तार्किक विश्लेषण पण असे आहे . This form of punishment more than any other makes the local tyrents and evil gentry tremble.

मस्त आहे की नाही कल्पना ?

हुनान चळवळीमुळे चिनी ग्रामीण जनता एवढी कोपली की जुने पुढारी च ठचळा कापू लागले. ते पाहून क्रांतिकारकाचे पुढारीदेखील ' हा प्रकार भयंकर आहे!' असे म्हणू लागले.

माओ उद्गारला, 'कशी गंमत आहे !'

अशिक्षित शेतकऱ्यांचा घोषणा करणारा गट विरोधकांची झोप उडविण्यास समर्थ आहे हे लक्षात येताच माओला हर्षवायू होण्याची वेळ आली. सारे दाणे ज्याप्रमाणे गरिबांचे बदाम होतात, त्याप्रमाणे घोषणा गरीब अज्ञ जनतेचे

सर्वांत मोठे 'शस्त्र' होते हा माओने लावलेला शोध विसाव्या शतकातील सर्वांत मोठा शोध होय. नक्सलाईट जनतेने या शोधाचा पूर्ण लाभ घेतलेला आहे.

माओला चिनी सदाशिव पेठी बुद्धिवाद्यांचा त्रास झालाच. या तथाकथित बुद्धीवाद्यांना उत्तर काय देणार अडाणी शेतकरी? त्यासाठी माओने लहान लाल पुस्तके (Little Red Books) लाखाच्या संख्येने छापून घेतली व खेडेगावातून वाटली. त्याची पुनरावृत्ती आज पश्चिम बंगालमध्ये धडाक्याने होऊन राहिली आहे.

पण ही लाल पुस्तके भक्तानी वाचली तर पाहिजेत! समजा वाचली, तरी त्यांना समजतील का आतले विचार?

खरं सांगा, गांधी टोपी का घालायला शिकविली गेली? नेहरू जाकीट प्रचारात का आले? कारण, 'सत्याचे प्रयोग' किंवा 'भारताचा शोध' हे सामान्य माणसाच्या डोक्यावरून जातात.

'संपूर्ण सावरकर,' खरं सांगा, वाचणाऱ्यांची संख्या किती? ते सोडा ऑर्गनायझरचे जुने अंक जपून त्याची फाईल बांधून ठेवून ती वाचणारे दहा लोक मला दाखवून द्याल काय? दोन रुपयांचे मधू लिमयाचे 'पॉलिटीक्स् इन् ट्रांझीशन्' किती जणांनी वाचले आहे, नव्हे किती जणांना ते आहे हे माहीत आहे?

म्हणून अध्यक्ष माओने फर्माविले, माओचे भले मोठे फोटो गावातून मोक्याच्या जागांवर लावा व लोकांना उठवा, जागृत करा व शत्रूच्या मनात धडकी भरवा!

हेच टेकनिक नक्सलाईटांनी प. बंगालमध्ये लाल गार्डांनी केरळात व गिरीजन सशस्त्र क्रांतिदलने श्रीकाकुलम् या आंध्रातील जिल्ह्यात आत्मसात् केले आहे. ह्या लोकांच्या साहित्यात माओच्या 'मॉब ॲक्शन्'च्या मंत्रास प्राधान्य दिलेले आढळते. या धरणीकंपाचे धक्के बंगाल, आंध्र व केरळ येथे बसत असले तरी त्याचे 'एपिसेंटर' चीनच्या ग्रामीण विभागात आहे.

अरेरे, हिंदूमहासभावाद्यांनी व संघीयांनी 'माओ' वाचला नव्हता!

का गांधीजींना शिव्या देत देत तेही तितकेच 'अहिंसावादी' झाले होते?


(क्रमशः)


# मुजऱ्याचे मानकरी

ब. मो. पुरंदरे

तीन रुपये

राजहंस प्रकाशन



# अंदाज

पंडित वि. म. जोशी
ज्योतिष विशारद

२ ते ८ मे १९७०

**मेष :** या सप्ताहातील ग्रहमान मेष राशीला शुभफलदायक आहे. रवी-बुध-शनी पहिले, शुक्र-मंगळ दुसरे, राहू अकरावा व गुरू सातवा असे सर्व ग्रह शुभ स्थानातून आहेत. चंद्राचे भ्रमण १२।१।२ या स्थानातून आहे. ता. २।३ ला घरात अस्वस्थता निर्माण होईल. राहत्या घराबद्दल चर्चा होईल. फौजदारी कामात यश मिळेल. संततीकडून त्रासदायक वागणूक होईल. धनलाभ चांगला होईल. अचानक धनलाभाला मंगळवार व शुक्रवार चांगले आहेत. विद्याभ्यासात आळसटपणा नुकसान करील. ता. ५ ला अमावास्या आहे. सर्वच अमावास्या वाईट जात नाहीत. आपल्या राशीत होणारी अमावास्या यशदायी असते. दृढनिश्चयाने हातात घेतलेले काम पुरे होते ज्या व्यक्तींची अगर संस्थांची नावे च, ल, र, त, अ ह्या अक्षरांनी सुरू असतील त्यांनाही वरीलप्रमाणेच फळे मिळतील. शुभ तारखा ५।६।७।८

**वृषभ :** या सप्ताहातील ग्रहमान वृषभ राशीला सुखदायक आहे. रवी-बुध-शनी बारावे, मंगळ-शुक्र पहिले, राहू दहावा व गुरू सहावा असे सर्व ग्रह शुभ स्थानात आहेत. सहावा गुरू धनस्थान व दशम स्थानावर पाहतो. तो चांगले फळ, मानमान्यता व धनाच्या बाबतीत देतो. वाईट फल–जरा अपचनाचा अगर आतड्याचा रोग होतो. चंद्राचे भ्रमण ११।१२।१ या स्थानातून आहे, ते अत्यंत चांगले आहे. हातून पराक्रम घडेल. ता. २।३ ला प्रवास योग होईल. त्यात निश्चित फायदा होईल. बाराव्या घरातले चंद्रभ्रमण सरकारी कामात संपूर्ण यश देईल. ७।८ तारखेला मामांकडून अगर सासऱ्यांकडून अचानक सर्व प्रकारची–सांपत्तिक अगर शारीरिक मदत मिळेल. विवाहाचे बेत जमण्याचा उत्तम योग आहे. साहित्यक्षेत्रातील व्यक्तींना दिवस बरे नाहीत. त्रियेत अपयश येईल. ज्या व्यक्तींची अगर संस्थांची नावे न, य, व, ब आणि सर्व स्वर ह्या अक्षरांनी सुरू असतील त्यांनाही वरीलप्रमाणेच फळे मिळतील. शुभ तारखा २।३।७।८

**मिथुन :** या सप्ताहातील ग्रहमान मिथुन राशील सौख्यकारक आहे. रवी-बुध-शनी अकरावे, शुक्र-मंगळ बारावे, राहू नववा व गुरू पाचवा असे शुक्र-मंगळाखेरीज सर्व ग्रह शुभ स्थानातून भ्रमण करीत आहेत. चंद्राचे भ्रमण १०।११।१२ या स्थानातून आहे, ते बरे आहे. ता. २।३ ला धनलाभ चांगला होईल. पराक्रमाने मानमान्यता मिळेल. सरकारी कामात संपूर्ण यश मिळेल. मित्रांनो केलेला फस-

वणुकीचा प्रयत्न त्यांच्यावरच उलटेल. विद्याभ्यासात यश व संततीकडून उन्नती-कारक वागणूक होईल. मेडिकल व्यवसायातील लोकाना अमाप पैसा व मानमरातब प्राप्त होईल. ४२ वर्षांपुढील वयाच्या डॉक्टरना हा अनुभव जास्त येईल. प्रेम-प्रकरणातून अनवस्था प्रसग निर्माण होण्याचा योग आहे. भागिदारीत लॉटरी तिकीट घेतल्यास फायदा होईल. ज्या व्यक्तीची अगर सस्थाची नावे क, प, द, ध, च, फ, झ, ज्ञ, भ, घ, छ, थ ह्या अक्षरानी सुरू असतील त्यानाही वरीलप्रमाणेच फळे मिळतील. शुभ तारखा २।३।४।५।६

**कर्क :** या सप्ताहातील ग्रहमान कर्क राशीला उन्नतीकारक आहे. रवी-बुध-शनी दहावे, मगळ-शुक्र अकरावे, राहू आठवा, गुरू चौथा असे सर्व ग्रह शुभ स्थानातून भ्रमण करीत आहेत. धदा-व्यवसाय उत्तम चालेल. सरकारी कत्राटे घेतल्यास त्यात यश येईल. चद्राचे भ्रमण ९।१०।११ घरातून आहे ते फारच चागले आहे. भागि-दारीत व मित्राकडून पैशाची कामे पूर्ण होतील. स्त्रीमित्र मदतीला धावतील. आई-वडिलाकडून कौतुक केले जाईल. स्थावरात भर पडेल. जागा-जमीन खरेदीला दिवस फार चागले आहेत. धार्मिक कामाकरता प्रवास घडेल. फौजदारी कामे करणाऱ्या वकिलाना ता. ५।६ फारच चागल्या जातील. गुन्हे सापडतील. वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्याना दिवस चागले आहेत. वडील मेव्हणा व बाप आजारी पडण्याचा योग आहे. ज्या व्यक्तीची अगर सस्थाची नावे ज, स, ख, ह, ड ह्या अक्षरानी सुरू असतील त्यानाही वरीलप्रमाणेच फळे मिळतील. सर्वच आठवडा शुभफलदायी आहे.

**सिंह :** या सप्ताहातील ग्रहमान सिंह राशीला शुभ फलदायक आहे. रवी-बुध-शनी नववे, मगळ-शुक्र दहावे, सातवा राहू व तिसरा गुरु असे सर्व ग्रह शुभ स्थानातून भ्रमण करताहेत. चद्राचे भ्रमण ८।९।१० स्थानातून आहे; ते चागले आहे. उद्योग धद्यात भरभराट. फॅन्सी वस्तूच्या व्यापारात फायदा. विद्येत यशप्राप्ती होईल. ता. ४।५।६ रोजी भाग्योदयकारक गोष्टी होतील. विवाहाबद्दल वाटाघाटी यशस्वी होतील. हातून कायम स्वरूपाच्या आर्थिक व्यवस्था घडतील. मान्यमान्यता वाढेल. स्त्रीसमाजाकडून गौरव केला जाईल. नोकरीत मनाजोग्या जागी बदली होईल. नोकरी कायम होईल. ज्या व्यक्तीची अगर सस्थाची नावे ग, श, म, ट, आणि ठ ह्या अक्षरानी सुरू असतील त्यानाही वरीलप्रमाणेच फळे मिळतील. मानसिक यातना फार होतील. त्याकरता शकराचे दर्शन घ्यावे. शुभ तारखा ४।५।६।७।८

**कन्या :** या सप्ताहातील ग्रहमान कन्या राशीला धनलाभ करून देणारे आहे. रवी-बुध-शनी आठवे, मगळ-शुक्र नववे, राहू सहावा व गुरु दुसरा असे रवी-शनी-शिवाय बाकी ग्रह शुभस्थानात आहेत. धनलाभ चागला होईल. विद्याभ्यासात अपयश येईल. सततीकरता खर्च करावा लागेल. सततीच्या वागणुकीमुळे त्रास होईल. इभ्रतीला कमीपणा येईल. पैसा अनाठायी खर्च करावा लागेल. मगळ-शुक्र-

भाग्यात, धनेश-भाग्येश व तृतीयेश-अष्टमेश आहेत. ते अचानक भाग्यदायक घटना घडवून आणतील. स्वभाव चैनी होईल. चागल्या मौल्यवान वस्तूची ता. ७।८ ला खरेदी होईल. वडील भावडाशी वाकडे येईल, ज्या व्यक्तीची अगर सस्यांची नावे क, प, द, ध, च, फ, झ, ज्ञ, घ, भ, थ, छ ह्या अक्षरानी सुरू असतील त्यानाही वरीलप्रमाणेच फळे मिळतील. शुभ तारखा २।३।७।८

**तूळ :** तूळ राशीला या सप्ताहातील ग्रहमान धनलाभकारक आहे. रवी-बुध-शनी सातवे, मंगळ-शुक्र आठवे, पाचवा राहू आणि पहिला गुरु असे सर्व ग्रह सेवेला तयार आहेत. शिवाय चद्राचे भ्रमण ६।७।८ या घरातून आहे. पति-पत्नीनी सामाईक केलेल्या अचानक लाभाच्या धंद्यात फायदा होईल. लॉटरीत धनलाभ चागला होण्याचा योग आहे. १।२।७।८ या आकड्यानी बनलेल्या सख्येचे तिकीट घेतल्यास निश्चित फायदा होईल. भागीदारीचे व्यवहारात यश आणि पैसा मिळेल. व्यवसायाला सरकारी भाडवल थोड्या श्रमात प्राप्त होईल. मिथुन-कुंभ राशीचे भागिदार असल्यास सर्व आशा-आकाक्षा पुऱ्या होतील. विद्याभ्यासात अपयश. सततीकडून मन स्ताप करण्याजोगी कृत्ये केली जातील. ज्या व्यक्तीची अगर सस्थांची नावे च, ल, र, त, आणि अ ह्या अक्षरानी सुरू असतील त्यानाही वरीलप्रमाणेच फळे मिळतील. शुभ तारखा २।३।७।८

**वृश्चिक :** या सप्ताहातील ग्रहमान वृश्चिक राशीला पीडादायक आहे. रवी-बुध-शनी सहावे, शुक्र-मगळ सातवे, राहू चौथा व गुरु बारावा असे शुक्र-मगळाखेरीज सर्व ग्रह अशुभ स्थानातून भ्रमण करीत आहेत. चद्राचे भ्रमण ५।६।७ ह्या घरातून आहे, ते बरे आहे आहे. गृहसौख्य चागले आहे. घरात एकादा समारभ होईल. विवाह जमण्याची शक्यता आहे. विद्याभ्यासात अपयश येईल. पैसा अतोनात खर्च होईल. आई मात्र आजारी पडण्याचा योग आहे. सरकारी कामात अपयश येईल. शत्रूचा नाश होईल. प्रवासात नुकसान होईल. मातुल घराण्याकडून मदत मिळेल त्यामुळे सर्व अचडणीतून सुखरूप पार पडाल. पोटाचे विकार होतील. खाण्यापिण्यात सयम राखावा. ज्या व्यक्तीची अगर सस्थाची नावे न, य, व, ब, आ, इ, उ, ओ ह्यांनी सुरू असतील त्यानाही वरीलप्रमाणेच फळे मिळतील. शुभ ता. ४।५।६।७

**धन :** या सप्ताहातील ग्रहमान धन राशीला सौख्यकारक आहे. रवी-बुध-शनी पाचवे; शुक्र-मगळ सहावे, राहू तिसरा आणि गुरू अकरावा असे सर्वच ग्रह शुभ-फलदायी आहेत. चद्राचे भ्रमण ४।५।६ या स्थानातून आहे, ते फार चागले आहे. २।३ तारखाना घरात आनंदी वातावरण राहील ता. ४।५।६ ला प्रवासयोग आहे. विद्याभ्यासात यशप्राप्ती होईल. मित्राकडून चागली मदत होईल. याच वेळी विवाहाबद्दलची शुभ वार्ता मिळेल. हातून पराक्रम घडेल. प्रेमाच्या भानगडीत सापडण्याचा योग आहे. ४।५।६ या तारखाना हा योग जोरदार आहे. अचानक धनलाभ चार आकड्यापर्यंत होईल. मानमरातब वाढेल. सरकारी कामात सपूर्ण यश मिळेल.

ज्या व्यक्तीची अगर सस्थाची नावे क, प, द, ध, भ, य, घ, थ ह्या अक्षरांनी सुरू असतील त्यांनाही वरीलप्रमाणेच फळे मिळतील. शुभ तारखा २।३।६।७।८

**मकर :** या सप्ताहातील ग्रहमान मकर राशीला सौख्यदायक आहे. रवी-बुध-शनी चौथे, मगळ-शुक्र पाचवे, राहू दुसरा व गुरू दहावा असे राहू खेरीज सर्व ग्रहाचे भ्रमण शुभ स्थानातून आहे. शनी-बुध केद्र त्रिकोणाधिपती केद्रात आहेत. गृहसौख्य लाभेल. सरकारी कामात यश येईल. अचानक नोकरी लागण्याचा योग आहे. शुक्र दशमेश पंचमेश पचमात मंगळाबरोबर आहे व गुरू शुक्राच्या घरात आहे. शास्त्रीय विद्याभ्यासात यशप्राप्ती होईल. संततीकडून सुख दिले जाईल. वैद्यकीय व्यवसायातील लोकाना अनेक प्रकारांनी लाभ होईल. चंद्राचे भ्रमण ३।४।५ या स्थानातून आहे, ते चागले आहे. ता. २।३ ला प्रवासयोग आहे. प्रवासात फायदा होईल. पत्नीकडून मदत होईल. विवाह जमण्याचा योग आहे. सरकारी कामात यश मिळेल. ज्या व्यक्तीची अगर सस्थाची नावे ज, स, ख, ह, ड, ह्या अक्षरानी सुरू असतील त्यांनाही वरीलप्रमाणेच फळे मिळतील. शुभ तारखा २।३।५।६।७।८

**कुंभ :** *या सप्ताहातील ग्रहमान कुभ राशीला पीडादायक आहे.* राहू पहिला, रवी-बुध-शनी तिसरे, शुक्र-मगळ चौथे व गुरू नववा असे राहू खेरीज सर्व ग्रह शुभ स्थानातून भ्रमण करीत आहे. भावडाकडून, त्रास होईल. पराक्रमाला कमीपणा येईल. मानसिक यातना होतील. त्याकरता दररोज १०८ गायत्रीजप करावा. चद्राचे भ्रमण २।३।४ *स्थानातून आहे ते चांगले आहे.* शुक्र-मगळ केद्राधिपती केद्रात आहेत. शुक्र स्वगृहीचा व मंगळ स्वगृहावर पाहणारा. मानमान्यता वाढेल. घरासबधीचे प्रश्न चांगल्या रीतीने सुटतील. धनलाभ चांगला होईल. कायम स्वरूपाचे काम पदरात पडेल. मित्राकडून धनप्राप्तीचे नवे नवे मार्ग दिसतील. ह्या भाग्योदय विद्येच्या जोरावर होईल. ज्या व्यक्तीची अगर सस्थांची नावे ग, श, म, ट, ठ यानी सुरू असतील त्यानाही वरीलप्रमाणे फळे मिळतील. शुभ तारखा ४।५।६।७।८

**मीन :** या सप्ताहातील ग्रहमान मीन राशीला शुभफलदायी आहे. रवी-बुध-शनी दुसरे, शुक्र-मंगळ तिसरे, राहू बारावा व गुरू आठवा असे सर्व ग्रह शुभयोगात आहेत, पण त्याना स्थानबल नाही. चंद्राचे भ्रमण १।२।३ या स्थानातून आहे, ते अत्यंत चांगले आहे. ता. २।३ ला शत्रूकडूनसुद्धा मदत होईल. ता. ३।४।५ ला अचानक भरपूर धनयोग देणाऱ्या घटनाचा पाया मजबूत केला जाईल. पोझिशनला थोडासा कमीपणा येईल. सरकारी कामात यश येईल. शत्रूचा नाश होईल. अध्यात्मविषयाबद्दल ओढ लागेल. विद्येत भरघोस यश येईल. सततीकडून त्रासदायक घटना घडतील. मीनराशी स्वभावत: दुसऱ्याकरता जास्त काळजी करते, पण ज्याचे बरे करावे तेच त्याचेवर उलटतील. ज्या व्यक्तीची अगर सस्थाची नावे क, प, द, ध, च, फ, झ, ञ, घ, छ, भ, थ ह्या अक्षरानी सुरू असतील त्यांनाही वरीलप्रमाणेच फळे मिळतील. सबंध आठवडाच शुभ आहे.

¤ ¤ ¤

होई, पुढे मोठ्या हॉटेलामागच्या खरकट्या पेटया धुंडाळण्याची वेळ त्याच्यावर कशी आली, बोरीबदरच्या एका कोपऱ्यातल्या दगडी फरशीवरच तो कसा अंगाची जुडी करून झोपत असे, अशा प्रकारे या चिमुरड्या आणि दुर्दैवी पोराची हकीकत सागून, त्याचे आता आश्रमात आगमन झाले असून तो आश्रमात कसा बघता बघता रुळला आहे, मधूनमधून थोडी मारामारी त्याला आवडते आणि झाडावरून वारंवार पडण्याचीही त्याला खोड आहे तरी पण आता शाळेत जाऊन शिकायला मिळते याने स्वारी कशी आनदी आहे त्याचे वर्णन करून अहवाल विचारतो, आमच्या या दलाचदला अर्थशास्त्रातली एकादी छोटी शिष्यवृत्ती कोणी देईल काय ?

अनाथ मुलाच्या प्रश्नाबद्दलची या प्रत्येक शब्दामागली भूमिका इतकी हळुवार, निकोप, प्रसन्न आणि सहतुकपणे वा अहेतुकपणे भावनेचे कढ काढण्याच्या प्रवृत्तीपासून इतकी अलिप्त आहे की हा मजकूर वाचून सपला तरी दलाचदची छोटुकली, अगावर दोन चार जागी खरचटलेली हाडकुळी, आनदी, तरतरीत मूर्ती नजरेपुढून हलणार नाही. त्याला शिक्षण आणि निवारा देणाऱ्या आणि पुन्हा याचे उपकारी भाडवल न करणाऱ्या स्नेहसदनाविषयी आपोआप आदर वाटेल.

एकाद्या अहवालात स्नेहसदनाच्या '(फाटके) कपडे-खात्या'विषयी मजकूर असेल : 'आश्रमातला जरा मोठा, लगडा सपत जॉर्जबरोबरीने शिपीकाम करू लागल्याने आमच्या एकुलत्या एका छोटया शिप्यावरचा फाटके कपडे शिवण्याचा ताण जरा हलका झाला असून फाटके कपडे आता भरभर शिवून होऊ लागले आहेत; पण तरी ज्या प्रचड वेगाने ते फाटतात त्या वेगाने मात्र अद्याप आम्ही ते शिवू शकत नाही.' बस्स. हे एवढेच. पण एवढयानेच, आश्रमातल्या मुलाना कपडयाची गरज आहे हे आपोआप आणि किती हळुवारपणे स्पष्ट होते, पहा.

एक बातमी असते : सर्कसयोग्य पराक्रम ! यदा आमच्या वीस मुलानी सर्कसयोग्य पराक्रम करून दाखविला. म्हणजे वर्गात त्याचे नबर पहिले–दुसरे राहिले. याबद्दल बक्षीस तर दिलेच पाहिजे म्हणून आम्ही त्याना नॅशनल सर्कस दाखवण्याचे ठरवले. सर्कस पाहून ते आले ते चित्तथरारक वर्णने करीतच. आता आणखी मुले पुढल्या वर्षी 'या सर्कसवाल्या'च्यात सामील होण्यासाठी कमरा कसून तयार झाली आहेत.

एका अहवालात शीर्षक आढळते : आता आम्हाला पाण्याचे पण दुर्भिक्ष्य ! सार्वजनिक नळाचे पाणी कमी झाल्याने आश्रमाच्या वाटयाला आधीच जेमतेम पुरेल इतके येत असे ते पाणी आणखीच कमी झाले असून गावकरी उदारपणे जादा पाणी देतात त्याने मुलागणिक एक बादली पाणी तरी मिळते. अर्ध्या बादलीत मुले कपडे



आता पाण्याचेही दुर्भिक्ष्य !

धुतात, अर्घ्या बादलीत अंघोळ करतात. कोणी एक दिवसाआड सबंध बादली पाण्याची अंघोळ करतात. पाणी–परिस्थिती लौकरच सुधारेल अशी आशा अहवाल तक्रारीचा सूर न लावता व्यक्त करतो.

असेच आणखी एक वृत्त असते: आमच्या काही आश्रमात अजन वीज पोचलेली नाही. त्यामुळे होते काय की संध्याकाळी मुलांची अभ्यासाच्या बाबतीत अडचण होते आणि सर्व कामातून संध्याकाळीच काय तो त्यांना अभ्यासाला सोयिस्कर वेळ उरतो. आज एका कंदिलाभोवती नाहीतर पेट्रोमॅक्स भोवती (ही आमची एक चैनच !) वीस वीस मुले डोळे ताणून अभ्यासात गढलेली दिसतील. आश्रमात वीज येण्याला वेळ (आणि काही खर्चदेखील) लागणार आहे.

एकादी जाहिरात असते : वाँटेड–पाहिजेत. जुने कपडे. खेळणी. जुने बूट–वहाणा आणि मुलांच्या खेळांचे साहित्य. पावसाळयात यात पावसाळी टोप्यांची भर पडते तर एरवी एकादे वेळी 'रिकाम्या पिंजऱ्यांसाठी पक्षी' पाहिजे असतात.

एका अहवालात मिस्टर सँटा क्लॉज मोदी यांची विलक्षण माहिती मिळते. हे उण्यापुऱ्या सत्तर वर्षांचे भले गृहस्थ स्नेहसदन धरून एकूण सदतीस धर्मादाय संस्थांचे काम हौसेने करतात. या संस्थात इस्पितळे आहेत, अनाथगृहे आहेत, वृद्धाश्रम आहेत, आंधळ्या–पांगळ्यांच्या शाळा आहेत. सत्तर वर्षांचे मोदी सर्वभर भिरीभिरी फिरतात आणि जातात तिथे निकामी कपडे, खेळणी, पाळीव प्राणी,



मिस्टर सांताक्लॉज मोदी

खाद्य पदार्थ, जे काय मिळेल ते गोळा करून आपल्या सदतीस संस्थात त्याचे मोठ्या प्रेमाने वाटप करतात. एकदा त्यांनी ३,४०० आंबे वाटले होते. एकदा खाऊची ८००० पाकिटे स्वत: रात्रंदिवस तयार करून वाटली होती. हे सर्व काम त्यांना गेली पंधरा वर्षे, त्यांच्या उतार वयात, कोण करायला लावते ? अहवाल सांगतो, मोदींचे एकुलते एक मूल केव्हा तरी वर्षाचे होऊन गेले नि तेव्हापासून मोदी आपले उन्ह नाही, पाऊस नाही. भटकताहेत आणि आपल्या सदतीस संस्थांचा प्रतिपाळ करताहेत.

असे चटका लावणारे काही ना काही दर अहवालात इतक्याच अकृत्रिम, प्रसन्न, हळुवार शैलीत वर्णन करून सांगितलेले असते. आश्रमातल्या इतर मुलांबरोबर शाळेला जायला मिळत नाही म्हणून मुसमुसून रडणारा बाबू मोरे एका अहवालात भेटतो. आश्रमाने आता त्याला अंधशाळेत पाठवणे सुरू केले आहे कारण छोटा बाबू जन्मापासून आंधळा आहे आणि आता तो खुषीत असतो असे अहवाल सांगतो तेव्हा ते सहजासहजी मनाबाहेर टाकता येत नाही. हा आंधळा, पोरका, खुषीत अंधशाळेत जाणारा बाबू मोरे आपल्यामागून येतच रहातो. एअरकंडिशण्ड खोलीत मुक्काम टाकलेला (अर्थात इस्पितळाच्या.) आणि लंगड्या पायावरच्या मोठ्या

प्लॅस्टिक सर्जरीची वाट पहात नर्स-डॉक्टरांशी खट्याळपणा करणारा अकरा वर्षांचा अनाथ हसरा पीर महमद, हर्नियाच्या शस्त्रक्रियेसाठी सोबत देऊन लोकलने इस्पितळाकडे धाडलेला आणि पोटातल्या शस्त्रक्रियेच्या धास्तीने लोकलमधून उडी टाकून पळालेला दुसरा एक पोरका छोटा मुलगा (अहवाल म्हणतो, तो लौकर आमच्यात परतावा म्हणून आम्ही त्याची वाट पहात आहोत.) हे सारे या अहवालात जणू प्रत्यक्षच भेटावेत तसे आपल्याला भेटवण्यात येतात—मदतीच्या प्रचारकी आवाहनाशिवाय, शासनाविषयीच्या आणि धनिकाविषयीच्या प्रेमळ कुरकुरीशिवाय आणि वातड लाचारीशिवाय. एका निकोप माणुसकीच्या दृष्टिकोनातून.

एकेका अहवालातून स्नेहसदन नामक एका जगाचे हे असे दैनंदिन आणि नैमित्तिक दर्शन घडत असते, तेथली सुखदुःखे क्षणिक आपली होत असतात, तेथली फुलती कोवळी आयुष्ये आपल्या अगदी जवळच फुलत असावीत तसे वाटते. मी तर या जगात एव्हाना या सुंदर अहवालामधून पुरता रुळलो आहे आणि कधी अहवाल न भेटला तर अस्वस्थ होऊ लागलो आहे, थोडा चिडचिडू सुद्धा लागलो आहे. या स्नेहसदनाने मला नकळत आपलेसे केले आहे आणि त्याचे श्रेय सर्वस्वी हे अहवाल लिहिणारे, सजवणारे जे कोणी असतील त्याना आहे. ते काळीज आणि बुद्धी ओतून हे काम करीत असले पाहिजेत. ती मन पूर्वकता, अकृत्रिमता, समाजकार्यात क्वचित भेटणारी अव्वल सौंदर्यदृष्टी, सभ्यता आणि सुसंस्कृतता मला मोह घालते.

एक अखेरचा तपशील राहिला : हे स्नेहसदन नावाचे अनाथालय फादर जी. रल्-लान म्हणून एक स्पॅनिश धर्मगुरू चालवतात आणि या अहवालाचे संपादन व लेखनदेखील तेच स्वतः करीत असतात. ◻ ◻ ◻


# शिलंगणाचं सोनं

## आवृत्ती : तिसरी

ब. मो. पुरंदरे

किंमत : तीन रुपये

राजहंस प्रकाशन

पूज्य कैलासवासी जे. बी. सावंत यांनी अगदी तुटपुंज्या भांडवलावर छोटा कारखाना काढला. आणि अवघ्या काही वर्षातच हा वटवृक्ष फोफावला. स्वतः सतत उद्योगी राहून त्यांनी तरुण पिढीला कृतिशीलतेचा संदेश दिला. आज या भावबळावरच कारखान्याचा विस्तार झाला. या प्रसंगी त्यांचे पुण्यस्मरण करून त्यांचे स्वप्न साकार करीत असल्याचे आम्ही कृतज्ञतापूर्वक जाहीर करीत आहोत.

सावंत बंधु

---

आज महाराष्ट्रराज्य दिनाच्या सुमुहूर्तावर आमच्या
कारखान्याचा नवा विभाग 'वागळे इंडस्ट्रियल इस्टेट,, ठाणे'
येथील अद्ययावत आणि स्वतःच्या भव्य इमारतीत
थाटत आहोत.

महाराष्ट्राचे महसूलमंत्री ना. बाळासाहेब देसाई यांच्या शुभहस्ते
उद्घाटन समारंभ

अध्यक्ष : माननीय श्री. चिं. वि. जोग, कस्टोडियन
बँक ऑफ महाराष्ट्र, पुणे

# जे. बी. सावंत इंजिनियरिंग प्रा. लिमिटेड

**रजि. ऑफिस :**

युनिट नं. १, उद्योग नगर, गोरेगाव (पश्चिम) मुंबई ६२. फोन – ६९२४०७

**कारखाना :**

वागळे इस्टेट, प्लॉट नं. A–३१६, रस्ता न. २२, ठाणे. फोन – ५९१७७३

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून, १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर

MANOOS (Weekly) : 40 Paise : Regd. No. M-H 649

हंसाबाईंच्याजवळ विद्वत्ता नाही.
आपल्या जीवनकथेला गोंडस रूप देण्यासाठी
आवश्यक असलेली वाङ्मयकलाही नाही.
त्यांच्याजवळ आहे ते
जे जाणतेपणे, अजाणतेपणे
डोळे उघडे ठेवून व आंधळेपणाने
अनुभवले, उपभोगले, सोसले ते ते.
त्याची ही कहाणी आहे.

—वा. ल. कुलकर्णी

हंसा वाडकर

# सांगत्ये ऐका

किंमत : आठ रुपये

राजहंस प्रकाशन